## महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई

## महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज दराच्या अटी व शर्ती) विनियम, २०१०


| | | |
|---|---|---|
| १ | संक्षिप्त शीर्षक, व्याप्ती आणि प्रारंभ | १ |
| २ | व्याख्या | २ |
| | भाग-एः सर्वसाधारण | १५ |
| ३ | विनियमांची व्याप्ती | १५ |
| | भाग- बी : सर्वसाधारण तत्त्वे | १६ |
| ४ | बहु-वर्षीय वीज दराची चौकट | १६ |
| ५ | नियंत्रण कालावधी | १८ |
| ६ | व्याप्ती | १८ |
| ७ | व्यवसाय आराखडा | १८ |
| ८ | पूर्व-अनुमान | १९ |
| ९ | काही घटकांसाठी विशिष्ट मार्गदर्शिका | २१ |
| १० | कामगिरीचा मध्यावधी आढावा | २१ |
| ११ | नियंत्रणाधीन असलेले आणि नियंत्रणाधीन नसलेले घटक | २३ |
| १२ | नियंत्रणाधीन नसलेल्या घटकांमुळे झालेला फायदा किंवा तोटा ग्राहकांना लागू करण्याचे सूत्र | २४ |
| १३ | नियंत्रणाधीन असलेल्या घटकांमुळे झालेला फायदा किंवा तोटा ग्राहकांना ग्राहकांना लागू करण्याचे सूत्र | २९ |
| १४ | पर्यायी अटी आणि शर्ती | ३० |
| भाग -सी : वीज दराच्या निश्चितीकरणाची कार्यपद्धत | | ३० |
| १५ | वीज दराच्या निश्चितीकरणासाठी अर्ज करण्याची कार्यपद्धत | ३० |
| १६ | वीज निर्मितीच्या दराचे निश्चितीकरण | ३१ |
| १७ | पारेषण, वितरण वायर व्यवसाय आणि किरकोळ पुरवठ्यासाठी वीज दराचे निश्चितीकरण | ३२ |
| १८ | वीज दराच्या निश्चितीकरणासाठी अर्ज करण्याची कालमर्यादा | ३५ |
| १९ | वीज दराचा आदेश | ३५ |

| | | |
|---|---|---|
| २० | वीज दराच्या आदेशाचे पालन | ३६ |
| भाग - डी : वीज खरेदी आणि प्राप्त करुन घेणे | | ३७ |
| २१ | व्याप्ती | ३७ |
| २२ | वीज प्राप्त करुन घेण्यासाठी मार्गदर्शक सूचना | ३७ |
| २३ | वीज प्राप्तीची योजना | ३७ |
| २४ | वीज खरेदी करारास/ व्यवस्थेस मान्यता | ४१ |
| २५ | अतिरिक्त अल्प-कालीन वीज प्राप्ती | ४२ |
| भाग-ई : वित्तीय तत्त्वे | | ४३ |
| २६ | भांडवली खर्च आणि भांडवल रचना | ४३ |
| २७ | अतिरिक्त भांडवलीकरण | ४६ |
| २८ | ग्राहक वर्गणी, डिपॉझिटची कामे आणि अनुदान | ४७ |
| २९ | गुंतविलेल्या भांडवलावर परतावा | ४८ |
| ३० | घसारा | ५० |
| ३१ | खेळते भांडवलावरील व्याज | ५१ |
| ३२ | आकस्मिक राखीव निधीत समायोजन | ५६ |
| भाग- एफः निर्मिती | | ५६ |
| ३३ | व्याप्ती | ५६ |
| ३४ | वीज निर्मिती कंपनीच्या वीज दराच्या निश्चितीकरणासाठी याचिका | ५७ |
| ३५ | वीज दराचे भाग | ५८ |
| ३६ | वार्षिक स्थिर आकार | ५९ |
| ३७ | भांडवली खर्च | ५९ |
| ३८ | अनिश्चित विजेची विक्री | ६४ |
| ३९ | वीज दरा व्यतिरिक्त उत्पन्न | ६४ |
| ४० | औष्णिक विद्युत निर्मिती केंद्राच्या कामकाजाचे निकष | ६५ |
| ४१ | संचालन व देखभाल खर्च | ७३ |
| ४२ | नवीन निर्मिती केंद्रे | ७४ |
| ४३ | जल-विद्युत केंद्राच्या कामकाजाचे निकष | ७५ |
| ४४ | जल-विद्युत निर्मिती केंद्राकरिता संचालन व देखभाल खर्च | ७७ |
| ४५ | औष्णिक निर्मिती केंद्रांकरिता वार्षिक स्थिर आकार आणि उर्जा आकार यांची परिगणना करणे व भरणा करणे | ७८ |

| | | |
|---|---|---|
| ४६ | जल-विद्युत निर्मिती केंद्रांसाठी क्षमता आकार आणि ऊर्जा आकार यांची परिगणना करणे व भरणा करणे | ८१ |
| ४७ | घोषित क्षमता सिध्द करुन दाखविणे | ८४ |
| ४८ | देयक तयार करणे आणि आकारांचा भरणा करणे | ८४ |
| भाग- जी : पारेषण | | ८४ |
| ४९ | व्याप्ती | ८४ |
| ५० | वीज दराचे भाग | ८५ |
| ५१ | बहु-वर्षीय वीज दर | ८८ |
| ५२ | वित्तीय तत्त्वे | ८९ |
| ५३ | व्यवसाय आराखडा | ८९ |
| ५४ | भांडवल गुंतवणूक योजना | ८९ |
| ५५ | भांडवली खर्च | ९० |
| ५६ | काम करण्याचे निकष | ९० |
| ५७ | एकूण महसूली गरजेची परिगणना | ९१ |
| ५८ | वीज दरा व्यतिरिक्त उत्पन्न | ९५ |
| ५९ | अन्य व्यवसायापासूनचे उत्पन्न | ९५ |
| ६० | राज्यांतर्गत पारेषण दर निश्चितीकरण | ९५ |
| ६१ | दीर्घ-कालिन पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्यामध्ये एकूण पारेषण यंत्रणा आकारांची विभागणी | ९९ |
| ६२ | राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचा वापर | १०० |
| ६३ | भरणा करण्याची पध्दत | १०१ |
| ६४ | पारेषण हानि | १०१ |
| ६५ | रिॲक्टींव्ह ऊर्जा आकार | १०२ |
| भाग- एचः वितरण वायर व्यवसाय | | १०४ |

| | | |
|---|---|---|
| ६६ | लेख्यांचे अलगिकरण | १०४ |
| ६७ | व्याप्ती | १०४ |
| ६८ | वितरण वायर व्यवसायाकरीता लागणाऱ्या एकूण महसूली गरजेचे भाग | १०४ |
| ६९ | बहु-वर्षीय वीज दर | १०५ |
| ७० | व्यवसाय आराखडा | १०५ |
| ७१ | भांडवल गुंतवणूक योजना | १०५ |
| ७२ | भांडवली खर्च | १०६ |
| ७३ | एकूण महसूली गरजेची परिगणना | १०६ |
| ७४ | वीज दरा व्यतिरिक्त उत्पन्न | १०९ |
| ७५ | अन्य व्यवसायापासून उत्पन्न | १०९ |
| ७६ | वहन आकारांचे निश्चितीकरण | |
| ७७ | अतिरिक्त अधिभारामुळे जमा होणा-या रकमा | ११० |
| ७८ | वहन हानि | ११० |
| ७९ | वायर्सची उपलब्धता | ११० |
| भाग- आयः किरकोळ विद्युत पुरवठा | | १११ |
| ८० | व्याप्ती | १११ |
| ८१ | वीज दराचे भाग | १११ |
| ८२ | बहु-वर्षीय वीज दर | ११३ |
| ८३ | व्यवसाय आराखडा | ११३ |
| ८४ | भांडवल गुंतवणूक योजना | ११३ |
| ८५ | भांडवली खर्च | ११३ |
| ८६ | विक्रीचे पूर्व-अनुमान | ११४ |
| ८७ | एकूण महसूली गरजेची परिगणना | ११४ |
| ८८ | वीज दरा व्यतिरिक्त उत्पन्न | ११७ |
| ८९ | अन्य व्यवसायापासून उत्पन्न | ११७ |

| | | |
|---|---|---|
| ९० | क्रॉस सबसिडी अधिभारामुळे जमा होणाऱ्या रकमा | ११८ |
| ९१ | वितरण हानि | ११८ |
| ९२ | वीज पुरवठ्याची उपलब्धता | ११८ |
| भाग-जे : राज्य शासनाने सबसिडी देणे बाबत | | ११९ |
| ९३ | राज्य शासनाने सबसिडीसाठी तरतूद करण्याची पद्धत | ११९ |
| भाग-के : संकीर्ण | | १२० |
| ९४ | दुरुस्ती करण्याचे अधिकार | १२० |
| ९५ | अडचणी दूर करण्याचे अधिकार | १२० |
| ९६ | अपवाद आणि रद्द करणे | १२० |

## महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई
## प्रारुप
## महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीज दराचे) विनियम, २०१०

### विद्युत अधिनियम, २००३

क्रमांक (मविनिआ/ ) - विद्युत अधिनियम, २००३ (२००३ चा ३६) च्या कलम १८१ च्या उप-कलम (२) मधील खंड (एच), (आय), (जे), (एल), (एम), (ओ), (वाय), (झेडडी), (झेडइ), (झेडएफ), (झेडजी), (झेडएच) आणि (झेडपी) सह कलम ३६ च्या उप-कलम १ चे परंतुक, कलम ३९ च्या उप-कलम (२) मधील खंड (डी)चा उप-खंड (२), कलम ३९ च्या उप-कलम (२) मधील खंड (डी) च्या उप-खंड (२) चा दुसरा परंतुक, कलम ४०च्या खंड (सी) चा उप-खंड(२), कलम ४०च्या खंड (सी) च्या उप-खंड(२) चा दुसरा परंतुक, कलम ४१ चा पहिला परंतुक, कलम ५१चा पहिला परंतुक, कलम ६१, कलम ६२चे उप-कलम (२) आणि (५), कलम (६४) चे उप-कलम (१) आणि (३), कलम ६५, आणि कलम ८६ च्या उप-कलम (१) च्या खंड (बी) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा तसेच या संबंधात त्यास समर्थ करणा-या अन्य सर्व अधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग खालीलप्रमाणे विनियम करीत आहेः-

### १ संक्षिप्त शीर्षक, व्याप्ती आणि प्रारंभ

१.१ या विनियमांना "महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीज दराचे) विनियम, २०१० " असे म्हणावे.

१.२ हे विनियम सबंध महाराष्ट्र राज्यात लागू राहतील.

१.३ (अ) हे विनियम, या विनियमांखाली समाविष्ट असलेल्या ज्या प्रकरणांचे वीज दर निश्चित करावयाचे आहेत अशा सर्व प्रकरणांना १ एप्रिल २०११ पासून आणि पुढे आर्थिक वर्षे २०१५-१६ पर्यंत (म्हणजेच ३१ मार्च, २०१६ पर्यंत) लागू राहतील.

(ब) हे विनियम, सध्या अस्तित्वात असलेल्या आणि सर्व भावी विद्युत निर्मिती कंपन्या, पारेषण परवानेधारक व वितरण परवानेधारक आणि त्यांचे वारसदार, असल्यास, यांना लागू राहतील.

१.४ हे विनियम दिनांक १ एप्रिल, २०११ पासून अंमलात येतील.

## २ **व्याख्या**

२.१ या विनियमांत, संदर्भानुसार वेगळा अर्थ अपेक्षित नसेल तरः -

(१) **"लेखा विवरणपत्र"** म्हणजे प्रत्येक आर्थिक वर्षाकरिता, खालील विवरणपत्रे म्हणजेच -

(एक) वेळोवेळी सुधारणा केलेल्या कंपनी अधिनियम, १९५६ च्या अनुसूची ६ च्या भाग १ मधील नमुन्याप्रमाणे तयार केलेला ताळे-बंद;

(दोन) कंपनी अधिनियम, १९५६ च्या अनुसूची ६ च्या भाग २ मधील गरजांची पूर्तता करणारा नफा-तोटा लेखा;

(तीन) भारतीय सनदी लेखापाल संस्थेच्या रोकड आवक (कॅश फ्लो) विवरणपत्रासाठी असलेल्या लेखा मानकां (एएस-३) नुसार तयार केलेले रोकड आवक विवरणपत्र;

(चार) वैधानिक लेखापरिक्षकांचा अहवाल;

(पाच) कंपनी अधिनियम, १९५६ च्या कलम २०९ (१) (डी) खाली केंद्र शासनाने विहित केलेले खर्चाचे अभिलेखे.

यासह त्यासंबधीच्या टिपण्या व आयोग वेळोवळी निर्देश देईल त्यानुसार इतर पुष्टी देणारी विवरणपत्रे व माहिती.

परंतु असे की, वीज वितरणाचा व्यवसाय कोणत्याही स्थानिक प्राधिकरणातर्फे करण्यात येत असेल तर, लेखा विवरणपत्रे यांचा अर्थ अशा स्थानिक प्राधिकरणाने, त्यास लागू असलेल्या संबंधित अधिनियम किंवा संविधीनुसार, वर उल्लेखलेल्या बाबींच्या संदर्भात तयार केलेली व ठेवलेली माहिती.

परंतु आणखी असे की, स्थानिक प्राधिकरणाने अधिनियमाखली ठेवावयाचे नियामक लेखे आयोग वेळोवेळी विनिर्दिष्ट करु शकेल.

(२) **"अधिनियम"** म्हणजे विद्युत अधिनियम, २००३ (२००३ चा ३६), त्यात वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणांसह;

(३) **"वाटप विवरणपत्र"** म्हणजे प्रत्येक आर्थिक वर्षासाठी निर्मिती कंपनी किंवा पारेषण परवानाधारक किंवा वितरण परवानाधारकाच्या प्रत्येक स्वतंत्र व्यवसायाचे तयार करण्यात आलेले एक विवरणपत्र जे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

(माहिती नोंदणी व ठेवणे आणि अहवाल पाठविणे) विनियम, २००९ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या वाटप तत्त्वांच्या आधारे करण्यात आले असेल;

(४) **"अर्जदार"** म्हणजे निर्मिती कंपनी किंवा पारेषण परवानाधारक किंवा वितरण परवानाधारक ज्याने वीज दर निश्चित करण्यासाठी अर्ज केला आहे किंवा अधिनियम आणि या विनियमांनुसार वार्षिक कामगिरीचा मध्यावधी आढावा घेण्यासाठी अर्ज केला आहे व त्यात निर्मिती कंपनी किंवा पारेषण परवानाधारक किंवा वितरण परवानाधारक यांचाही समावेश असेल ज्यांच्या वीज दराचे, आयोगाकडून स्वतःहून किंवा स्वारस्य असलेल्या किंवा बाधित व्यक्तीने केलेल्या अर्जांमुळे किंवा कामगिरीच्या मध्यावधी आढाव्याचा एक भाग म्हणून करण्यात येणारे, पुर्नविलोकन हा आयोगापुढील एक विषय आहे.

(५) **"एकूण महसूलाची गरज"** म्हणजे या विनियमांतील तरतूदींनुसार पारेषण परवानाधारक किंवा वितरण परवानाधारकाच्या परवानाप्राप्त व्यवसायाशी संबंधित अनुज्ञेय खर्चाची आणि भांडवलावरील परताव्याची एकूण रक्कम जी वीज दरातून वसूल होऊ शकेल.

(६) **"सहाय्यकारी ऊर्जा वापर"-** एका ठराविक कालावधीच्या संबंधात सहाय्यकारी ऊर्जा वापर म्हणजे, विद्युत निर्मिती केंद्राच्या सहाय्यकारी उपकरणांनी ठराविक कालावधीत वापरलेले ऊर्जेचे परिमाण आणि जे विद्युत निर्मिती केंद्राच्या सर्व युनीटसच्या जनरेटर टर्मिनल्सनी निर्मिती केलेल्या एकूण ऊर्जेच्या बेरजेच्या टक्केवारीत व्यक्त करण्यात येईल.

परंतु असे की, या विनियमांच्या प्रयोजनार्थ, औष्णिक विद्युत निर्मिती केंद्राच्या सहाय्यकारी वापरात निर्मिती केंद्रामध्ये झालेल्या ट्रान्सफॉर्मर गळतीच्या युनिटसचा समावेश असेल;

परंतु असे की, या विनियमांच्या प्रयोजनार्थ, निर्मिती केंद्राचा **कॉलनी** वापर सहाय्यकारी वापराचा एक भाग म्हणून समाविष्ट करण्यात येणार नाही.

(७) **"उपलब्धता"**- औष्णिक विद्युत निर्मिती केंद्राच्या संदर्भात कोणत्याही कालावधीकरिता उपलब्धता म्हणजे त्या कालावधीतील सर्व दिवसांकरिता महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राने प्रमाणित केल्यानुसार दैनंदिन घोषित सरासरी क्षमतांची सरासरी जी, विद्युत निर्मिती केंद्राच्या स्थापित क्षमतेमधून, या विनियमात विनिर्दिष्ट केल्यानुसार, मेगावॅटमधील मधील प्रमाणकानुसारी (normative) सहाय्यकारी वापर वजा केल्यावर येणा-या वजाबाकीच्या टककेवारीत, दाखविण्यात येईल व तिची परिगणना खालील सूत्रानुसार करण्यात येईलः

$$उपलब्धता = 10000 \times \sum_{i=1}^{N} DC_i / \{ N \times IC \times (100-AUX_n) \} \%$$

जेथे -

N = दिलेल्या कालावधीतील वेळेच्या गटांची संख्या

DC = अशा कालावधीतील $i^{th}$ वेळेच्या गटाची घोषित सरासरी क्षमता

IC = विद्युत निर्मिती केंद्राची मेगावॅटमधील स्थापित क्षमता

AUX = मेगावॅटमधील मधील प्रमाणकानुसारी सहाय्यकारी वापर, जो एकूण वीज निर्मितीच्या टक्केवारीत दाखविण्यात येतो

(८) **"उपलब्धता"** पारेषण यंत्रणेच्या संदर्भात एका ठराविक कालावधीसाठी उपलब्धता म्हणजे त्या कालावधीतील तासांतील वेळ ज्यामध्ये पारेषण यंत्रणा तिच्या प्रमाणित दाबाने विजेचे पारेषण करु शकते, जी त्या ठराविक कालावधीतील एकूण तासांच्या टक्केवारीत व्यक्त करण्यात येईल व जिची परिगणना या विनियमांतील परिशिष्ट- २ मधील तरतूदीनुसार करण्यात येईल.

(९) **"संतुलन व हिशोबपूर्तीची संहिता (Balancing and Settlement Code)"** म्हणजे आयोगाने ठरवून दिलेली किंवा महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राने प्रसिध्द केलेली आणि आयोगाने मान्यता दिलेली अशी संहिता जिच्यानुसार महाराष्ट्र राज्यांतील ग्रीडचा वापर करणा-यांच्या ऊर्जेच्या लेख्यांमध्ये आवश्यक अशी देवाण-घेवाण करण्यात येईल व त्यांच्या करारांतर्गत ऊर्जा व प्रत्यक्ष वापरलेली ऊर्जा यांच्यातील फरकाचा हिशोब पूर्ण करण्यात येईल;

(१०) **''लाभधारक''** निर्मिती केंद्राच्या संबंधात लाभधारक म्हणजे ज्या केंद्राचे विजेचे दर या विनियमानुसार निश्चित करण्यात येतात अशा निर्मिती केंद्रापासूनची वीज खरेदी करत असलेली संस्था/व्यक्ती.

(११) **"गट (ब्लॉक)"** कम्बाइन्ड सायकल औष्णिक विद्युत निर्मिती केंद्राच्या संबंधात गट म्हणजे ज्यामध्ये Combustion turbine- generators, associated waste heat recovery boilers, connected steam turbine- generators and auxiliaries, यांचा समावेश होतो.

(१२) **“ठोक वीज पारेषण करार”** म्हणजे **केलेला** असा करार ज्यातील अटी व शर्तीमुळे पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्यास, पारेषण परवानाधारकाच्या राज्यांतर्गत-पारेषण यंत्रणेमध्ये प्रवेश करण्याचा, हक्क प्राप्त होतो;

(१३) **“आयोग”** म्हणजे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग;

(१४) **“कामकाज प्रचालन विनियम”** म्हणजे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (कामकाज प्रचालन) विनियम, २००४, वेळोवेळी केलेल्या सुधारणांनुसार;

(१५) ''**करारबद्ध क्षमता**'' म्हणजे दीर्घ-कालीन पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याने त्याच्या दीर्घ-कालीन वीज खरेदी योजनेचा एक भाग म्हणून वीज खरेदी कराराच्या माध्यमातून करारबद्ध केलेली मेगावॅट मधील क्षमता आणि ही क्षमता, वेळोवेळी सुधारणा केलेल्या मविनिआ (पारेषण मुक्त प्रवेश) विनियम, २००५ च्या विनियम ५.२ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याच्या मानीव पारेषण क्षमता हक्कांच्या सममूल्य असेल;

(१६) **“नियंत्रण कालावधी”** म्हणजे या विनियमांच्या भाग ‘सी’ नुसार पूर्व-अनुमान सादर करण्यासाठी १ एप्रिल २०११ ते ३१ मार्च, २०१६ दरम्यानचा पाच (५) वर्षांचा कालावधी आणि जो आयोगाद्वारे वाढविला जाऊ शकेल.

(१७) **“मर्यादा- दिनांक (कट-ऑफ डेट)”** म्हणजे प्रकल्पाचे वाणिज्यिक कामकाज सुरु झाल्याच्या वर्षाच्या दोन वर्षानंतर संपणा-या वर्षातील ३१ मार्च आणि प्रकल्पाचे वाणिज्यिक कामकाज वर्षाच्या शेवटाच्या तिमाहीत घोषित करण्यात आले असेल तर, वाणिज्यिक कामकाज सुरु झाल्याच्या वर्षाच्या तीन वर्षानंतर संपणा-या वर्षातील ३१ मार्च, हा मर्यादा दिनांक राहील.

(१८) ''**दिवस**'' म्हणजे रात्री बारा (०००० वाजता) पासून सुरु होणारा २४ तासांचा कालावधी;

(१९) **“वाणिज्यिक कामाकाजाचा दिनांक”** म्हणजे -

ए. औष्णिक निर्मिती केंद्राच्या युनिटच्या किंवा गटाच्या संबंधात वाणिज्यिक कामकाजाचा दिनांक म्हणजे कमाल अखंडित वीज निर्मिती क्षमतेचे प्रमाण (एम सी आर) किंवा स्थापित क्षमता (आय सी) लाभधारकांना पूर्व-सूचना देऊन यशस्वी चाचणीत, सिद्ध केल्यानंतर निर्मिती कंपनीने ०००० वाजल्यापासून घोषित केलेला

दिनांक ज्यामध्ये शेड्यूलिंग प्रोसेस भारतीय विद्युत ग्रीड संहिता (आय इ जी सी) प्रमाणे पूर्णपणे कार्यान्वित झालेली असेल;

बी. जल-विद्युत निर्मिती केंद्राच्या युनिटच्या संबंधात, लाभधारकांना पूर्व-सूचना दिल्यानंतर निर्मिती कंपनीने ०००० वाजल्या पासून घोषित केलेला दिनांक ज्याची शेड्युलिंग प्रोसेस भारतीय विद्युत ग्रीड संहितेप्रमाणे पूर्णपणे कार्यान्वित झालेली असेल, आणि संपूर्ण निर्मिती केंद्राच्या संबंधात, लाभधारकांना पूर्व-सूचना दिल्यानंतर यशस्वी चाचणी द्वारे निर्मिती केंद्राच्या स्थापित क्षमतेशी अनुरुप पीकिंग **समर्थता** सिद्ध केल्यानंतर निर्मिती कंपनीने घोषित केलेला दिनांक;

टिपणी -

एक. जर जलाशय किंवा साठवणूकीच्या पद्धतीवर चालणाऱ्या विद्युत निर्मिती केंद्राला स्थापित क्षमतेशी अनुरुप पीकिंग **समर्थता** सिद्ध करणे पाण्याच्या अपुऱ्या साठ्यामुळे किंवा जलाशयाच्या पातळीमुळे शक्य झाले नाही तर, निर्मिती केंद्राच्या शेवटच्या युनिटच्या वाणिज्यिक कामकाजाचा दिनांक हा संपूर्ण निर्मिती केंद्राच्या वाणिज्यिक कामकाजाचा दिनांक म्हणून विचारात घेण्यात येईल; परंतु असे की, जेव्हा पाण्याच्या साठ्याची/ जलाशयाची पातळी साध्य करण्यात येईल तेव्हा अशा जल-विद्युत निर्मिती केंद्राला, निर्मिती युनिटच्या किंवा निर्मिती केंद्राच्या स्थापित क्षमतेशी अनुरुप पिकिंग **समर्थता** असल्याचे सिद्ध करुन दाखविणे बंधनकारक राहील;

दोन. पूर्णतः नदीच्या पाण्यावर चालणाऱ्या जल-विद्युत केंद्राच्या बाबतीत, जर पाण्याचा पुरवठा कमी असतानाच्या कालावधीत, जेव्हा अशी **समर्थता** सिद्ध करण्यासाठी पाणी पुरेसे नसते अशा कालावधीत, जर युनिट किंवा निर्मिती केंद्राचे वाणिज्यिक कामकाज सुरु झाल्याचे घोषित करण्यात आले तर, जेव्हा पाणी पुरवठा पुरेसा उपलब्ध होईल तेव्हा अशा जल-विद्युत निर्मिती केंद्राला किंवा युनिटला स्थापित क्षमते इतकी पीकिंग **समर्थता** असल्याचे सिद्ध करुन दाखविणे बंधनकारक राहील.

(२०) **“घोषित क्षमता”** म्हणजे -

ए. औष्णिक विद्युत निर्मिती केंद्राकरिता घोषित क्षमता म्हणजे, दिवसाच्या कोणत्याही कालावधीसाठी किंवा सबंध दिवसाकरिता, विद्युत निर्मिती केंद्राने, इंधनाची उपलब्धता यथोचितपणे विचारात घेऊन, अशा विद्युत निर्मिती केंद्राची एक्स-बस मेगावॅटमध्ये वीज पुरविण्याची घोषित केलेली **समर्थता**;

परंतु असे की, गॅस टर्बाइन विद्युत निर्मिती केंद किंवा कम्बाइन्ड सायकल विद्युत निर्मिती केंद्राच्या बाबतीत, विद्युत निर्मिती केंद्र वायू इंधन व द्रव इंधनावरील युनिटस व मॉड्युलची क्षमता वेगवेगळी घोषित करेल व त्यांचे निर्धारण स्वतंत्रपणे करण्यात येईल. उपलब्धता आणि संयंत्र भार घटक (प्लँट लोड फॅक्टर) यांची अनुक्रमे परिगणना करण्याच्या प्रयोजनासाठी, विद्युत निर्मिती केंद्रासाठी एकूण घोषित क्षमता व एकूण निर्धारित विद्युत निर्मिती ही, वायू इंधन व द्रवरुप इंधनांसाठीची घोषित क्षमता आणि निर्धारित विद्युत निर्मिती यांच्या बेरजे इतकी असेल.

बी. जल विद्युत निर्मिती केंद्राकरिता, महिन्याच्या $i^{th}$ दिवसाकरिता विद्युत निर्मिती केंद्राकडून उपलब्ध होऊ शकणारी अपेक्षित विजेची मेगावॅटमधील एक्स-बस क्षमता, जी केंद्राकडून, महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राने प्रमाणित केल्याप्रमाणे दिवस संपल्यानंतर, पाण्याची उपलब्धता विचारांत घेऊन, कमीत कमी ३ दिव्स तरी पुरविता येईल.

(२१) **“डिझाइन ऊर्जा”** जल विद्युत निर्मिती केंद्राच्या संबंधात डिझाइन ऊर्जा म्हणजे, ऊर्जेचे परिमाण जे, ९० टक्के **भरवशाच्या** वर्षात ९५ टक्के स्थापित क्षमता असलेल्या विद्युत निर्मिती केंद्राकडून, निर्मिती होऊ शकेल.

(२२) **“वितरण व्यवसाय ”** म्हणजे वितरण परवानाधारकाच्या पुरवठ्याच्या क्षेत्रात विजेचा पुरवठा करण्याकरिता वितरण यंत्रणा उभी करण्याचा व चालू ठेवण्याचा व्यवसाय;

(२३) ''**वितरण वायर व्यवसाय**'' म्हणजे वितरण परवानाधारकाच्या पुरवठ्याच्या क्षेत्रात विजेच्या वहनाकरीता वितरण यंत्रणा उभी करण्याचा व चालू ठेवण्याचा व्यवसाय;

(२४) **"वितरण मुक्त प्रवेश विनियम"** म्हणजे महाराष्ट विद्युत नियामक आयोग (वितरण मुक्त प्रवेश) विनियम,२००५, वेळोवेळी केलेल्या सुधारणांनुसार;

(२५) ''**वीज दर आणि आकारांपासून अपेक्षित महसूल**'' म्हणजेच निर्मिती कंपनीला किंवा पारेषण परवानाधारकाला किंवा वितरण परवानाधारकाला विनियमित व्यवसायपासून प्रचलित वीज दराने प्राप्त होऊ शकणारा अंदाजित महसूल;

(२६) **"अस्तित्वात असलेले निर्मिती युनिट/केंद्र"** म्हणजे हे विनियम अंमलात येण्याच्या दिनांकापूर्वी वाणिज्यिक कामकाज सुरु झाल्याचे घोषित केलेले विद्युत निर्मिती युनिट/केंद्र;

(२७) ''**घटना** '' म्हणजे राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेमधील पूर्व-निर्धारित किंवा पूर्व-नियोजित नसलेले प्रसंग ज्यात दोष, **घटना** व बिघाडांचा समावेश असेल;

(२८) **"शुल्क व आकार विनियम"** म्हणजे महाराष्ट विद्युत नियामक आयोग (वितरण शुल्क व आकार प्रवेश) विनियम, २००५, वेळोवेळी केलेल्या सुधारणांनुसार;

(२९) **"दैवी आपत्तीची घटना"** कोणत्याही व्यक्ती/संस्थेच्या संदर्भात दैवी आपत्तीची घटना म्हणजे, कोणतीही घटना किंवा परिस्थिती जी त्या व्यक्तीच्या वाजवी नियंत्रणाखाली नसते किंवा त्या व्यक्तीने एखादी कृती केल्यामुळे किंवा न केल्यामुळे होत नाही आणि जी, त्या व्यक्तीला योग्य काळजी घेऊन किंवा **तत्परता** दाखवूनही टाळता येणे शक्य होत नाही व जी उपरिनिर्दिष्ट बाबींच्या सर्वसाधारणतेपुरती मर्यादित न राहता त्यात खालील घटनांचाही समावेश असेलः-

ए. दैवी प्रकोप ज्यांत पुढील बाबींचा, परंतु केवळ त्यांचाच नव्हे, समावेश असेल- वीज, वादऴ, पंच-महाभूतांपैकी कोणाचाही प्रकोप, भूकंप, पूर, मुसळधार पाऊस, दुष्काळ, आणि नैसर्गिक अनर्थ;

बी. संप, टाळेबंदी, आस्ते-कदम काम करणे, बंद किंवा कोणत्याही पक्षाने चिथावणी न दिलेली इतर औद्योगिक अशांतता;

सी. जनतेच्या शत्रूंच्या कारवाया, युध्द (घोषित किंवा अघोषित), नाकेबंदी, बंडाळी, दंगल, क्रांती, घातपात, गुंडगिरी आणि नागरी अशांतता;

डी. टाळता न येण्याजोगा अपघात ज्यांत पुढील बाबींचा, परंतु केवळ त्यांचाच नव्हे, समावेश असेल- आग, स्फोट, किरणोत्सर्जित प्रदूषण आणि धोकादायक विषारी रासायनिक प्रदूषण;

इ. ग्रीडमध्ये कोणताही बंद किंवा व्यत्यय, जो राज्य किंवा केंद्र शासनास, किंवा आयोगास किंवा महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राला पाहिजे असेल किंवा त्यांनी निर्देशित केला असेल; आणि

एफ. कोणताही बंद किंवा व्यत्यय, जो संयंत्र किंवा साधनांमध्ये होऊ घातलेल्या महत्वपूर्ण बिघाडाचा गंभीर व तांतडीचा धोका टाळण्यासाठी आवश्यक असेल;

(३०) **“वीज निर्मिती व्यवसाय”** म्हणजे (एक) कोणत्याही जागेस विजेचा पुरवठा करण्यासाठी किंवा पुरवठा शक्य करण्यासाठी, (दोन) अधिनियम आणि त्याखाली करण्यात आलेल्या नियम व विनियमांनुसार कोणत्याही परवानाधारकाला विजेचा पुरवठा करण्याच्या प्रयोजनासाठी आणि (तीन) कलम ४२ च्या उप-कलम (२) अंतर्गत करण्यात आलेल्या विनियमांना अधीन राहून, कोणत्याही ग्राहकाला विजेचा पुरवठा करण्याच्या प्रयोजनासाठी, विद्युत निर्मिती केंद्रामधून विजेची निर्मिती करण्याचा व्यवसाय;

(३१) **“एकूण कॅलरीफिक मूल्य”** औष्णिक विद्युत निर्मिती केंद्राच्या संबंधात “एकूण कॅलरीफिक मूल्य” म्हणजे एक किलोग्रॅम घन इंधनाच्या किंवा एक लिटर द्रवरुप इंधनाच्या किंवा एक स्टँडर्ड घन मिटर वायुरुप इंधनाच्या, जसे असेल तसे, पूर्ण प्रज्वलनातून निर्माण झालेली kcal मधील उष्णता;

(३२) **“केंद्रातील एकूण उष्मांक दर”** म्हणजे जनरेटर टर्मिनल्समधून एक kWh विद्युत ऊर्जा निर्माण करण्यासाठी पुरवावी लागणारी kcal मधील उष्णता ऊर्जा;

(३३) **“शासकीय रोख्यांचा दर ”** म्हणजे भारत सरकारच्या १० वर्षे मुदतीच्या रोख्यांच्या व्याजाचा दर , जो भारताच्या रिझर्व्ह बॅन्केकडून प्रत्येक पूर्ण झालेल्या वर्षाकरिता कळविण्यात येतो;

(३४) **“उच्च दाब ”** किंवा **“एच टी ”** म्हणजे भारतीय विद्युत नियम, १९५६ च्या नियम २ च्या उप-नियम (१) च्या खंड (एव्ही ) अंतर्गत ‘‘उच्च’’ किंवा ‘‘अति उच्च’’ दाब म्हणून व्याख्या केलेले सर्व दाब आणि त्यांना अनुसरुन, अधिनियमाच्या कलम १८५ च्या उप-कलम (२) च्या खंड (सी) नुसार विनिर्दिष्ट करण्यात येतील, असे दाबांचे वर्गीकरण;

(३५) ''**अनिश्चित वीज**'' म्हणजे निर्मिती केंद्राच्या युनिट किंवा गटाच्या वाणिज्यिक कामकाजापूर्वी ग्रीडला पुरविलेली वीज;

(३६) **“स्थापित क्षमता”** म्हणजे विद्युत निर्मिती केंद्राच्या सर्व युनिटसच्या **नेम प्लेट** क्षमतांची बेरीज किंवा विद्युत निर्मिती केंद्राची आयोगाने वेळोवेळी मान्यता दिलेली क्षमता (जिची जनरेटर टर्मिनल्समध्ये दखल घेतली जाते);

(३७) **“आंतर जोडणीचे ठिकाण”** म्हणजे राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेला पारेषण यंत्रण उपयोगकर्त्याचे किंवा पारेषण परवानाधारकाच्या संयंत्र आणि/किंवा उपकरण जोडण्याचे ठिकाण;

(३८) **“राज्यांतर्गत पारेषण यंत्रणा”** म्हणजे राज्याच्या क्षेत्रात पारेषण वाहिन्यांद्वारे विजेचे वहन करणारी कोणतीही यंत्रणा आणि त्यामध्ये राज्यातील पारेषण परवानाधारकांच्या सर्व पारेषण वाहिन्या, उपकेंद्रे आणि संलग्न उपकरणे यांचा समावेश होतो;

परंतु असे की, पारेषण यंत्रणा व वितरण यंत्रणा यांच्यामधील आणि वीज निर्मिती केंद्र व पारेषण यंत्रणा यांच्यामधील विभाजनाच्या ठिकाणाची व्याख्या ही अधिनियमाच्या कलम ७३ च्या खंड (बी) खाली प्राधिकरणाने अधिसुचित केलेल्या विनियमांमधील तरतुदींना अनुसरुन असेल;

(३९) **“कमाल अखंडित प्रमाण किंवा एम सी आर”-** औष्णिक विद्युत निर्मिती केंद्राच्या युनिटच्या संबंधात कमाल अखंडित प्रमाण म्हणजे प्रमाणित मापदंडांना अनुसरुन उत्पादकाने हमी दिलेली जनित्राच्या टर्मिनल्सच्या ठिकाणी कमाल अखंडित वीज निर्मिती, आणि कम्बाइन्ड सायकलवर आधारित औष्णिक विद्युत

निमिती केंद्राच्या गटाच्या संबंधात म्हणजे उत्पादकाने हमी दिलेली, **जल किंवा वाफेवर निर्मित विजेच्या पुरवठ्यासह** (लागू असल्यास), आणि ५० हर्टझ फ्रिक्वेन्सी आणि जागेच्या विनिर्दिष्टीत शर्तीशी **अनुरुप** केलेली जनित्राच्या टर्मिनल्सच्या ठिकाणी कमाल अखंडित वीज निर्मिती,

(४०) **"नवीन विद्युत निर्मिती युनिट/केंद्र"** म्हणजे हे विनियम अंमलात आल्याच्या दिनांका रोजी किंवा त्यानंतर ज्याची वाणिज्यिक कामकाजास सुरुवात झाल्याचे घोषित करण्यात आले आहे असे विद्युत निर्मिती युनिट/केंद्र;

(४१) ''**प्रमाणानुसार वार्षिक संयंत्र उपलब्धता घटक**'" किंवा ''**एन ए पी ए एफ**'' जलविद्युत निर्मिती केंद्राच्या संबंधात म्हणजे जलविद्युत निर्मिती केंद्राकरिता विनियम १८ मध्ये विनिर्दिष्ट केलेला उपलब्धता घटक;

(४२) **"वीज दरा व्यतिरिक्त उत्पन्न"** म्हणजे वीज दरापासूनच्या उत्पन्ना व्यतिरिक्त विनियमित व्यवसायापासून मिळालेले उत्पन्न, ज्यात इतर व्यवसायापासूनच्या कोणत्याही उत्पन्नाचा समावेश नसेल आणि वितरण परवानाधारकाच्या किरकोळ विद्युत पुरवठा व्यवसायाच्या संदर्भात, वहनापासून मिळणा-या उत्पन्नाचा व वहन आकारांवरील **परस्पर-अनुदानावरील** (क्रॉस-सबसिडी) अधिभार आणि अतिरिक्त अधिभारापासून होणा-या प्राप्तीचा समावेश नसेल;

(४३) **"अधिकारी"** म्हणजे आयोगाचा अधिकारी;

(४४) **"'संचालन आणि देखभाल खर्च"** किंवा **"ओ एन्ड एम खर्च'"** निर्मिती कंपनीच्या बाबतीत म्हणजे निर्मिती कंपनीच्या प्रकल्पाच्या किंवा त्याच्या भागाच्या संचालन व देखभालीवर झालेला खर्च आणि त्यामध्ये मनुष्यबळ, दुरुस्ती, सुटे भाग, वापरुन संपणाऱ्या वस्तू, विमा आणि वरकड खर्च या बाबींवरील खर्चाचा समावेश असेल;

(४५) **"'संचालन आणि देखभाल खर्च"** किंवा **"ओ एन्ड एम खर्च"** परवानाधारकाच्या बाबतीत म्हणजे पारेषण परवानाधारकाने किंवा वितरण परवानाधारकाने संचालन व देखभालीवर किंवा त्याच्या भागावर केलेला खर्च आणि त्यामध्ये मनुष्यबळ, दुरुस्ती, सुटे भाग, वापरुन संपणाऱ्या वस्तू, विमा आणि वरकड खर्च या बाबींवरील खर्चाचा समावेश असेल;

(४६) **"मूळ प्रकल्प खर्च"** म्हणजे निर्मिती कंपनी किंवा पारेषण परवानाधारक, जसे असेल तसे, यांनी, आयोगाने मर्यादा दिनांकापर्यंत मान्यता दिलेल्या प्रकल्पाच्या **मूळ आकारमानावर (व्याप्तीवर)** केलेला भांडवली खर्च;

(४७) **“संयंत्र उपलब्धता घटक (प्लँट अव्हेलेबीलिटी फॅक्टर- पी ए एफ)”**‘जल विद्युत निर्मिती केंद्राच्या संबंधात कोणत्याही कालावधीकरिता म्हणजे महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राने प्रमाणित केल्याप्रमाणे त्या कालावधीतील सर्व दिवसांकरिता दैनंदिन घोषित क्षमतांची सरासरी जी मेगावॅटमधील स्थापित क्षमतेच्या टक्केवारीत दाखविण्यात येते आणि जी प्रमाणकानुसारी सहाय्यकारी ऊर्जा वापरमुळे कमी होते;

(४८) **“संयंत्र भार घटक (प्लँट लोड फॅक्टर”**औष्णिक विद्युत निर्मिती केंद्राच्या संबंधात ठराविक कालावधीकरिता संयंत्र भार घटक म्हणजे, त्या कालावधीतील प्रत्यक्ष विद्युत निर्मितीस अनुरुप बाहेर पाठविलेली एकूण ऊर्जा, जी त्या कालावधीतील स्थापित क्षमतेस अनुरुप बाहेर पाठविलेल्या ऊर्जेच्या टक्केवारीत दाखविण्यात येते व जिची परिगणना खालील सूत्रानुसार करण्यात येईलः

प्लँट लोड फॅक्टर $(\%) = 10000 \times \sum_{i=1}^{N} AG_i \; / \; \{ N \times IC \times (100\text{-}AUX_n) \} \; \%$

जेथे-

N = ठराविक कालावधीतील वेळेच्या गटांची संख्या

AG = अशा कालावधीतील त्या वेळेतील $\mathbf{i^{th}}$ गटांची मेगावॅटमधील प्रत्यक्ष विद्युत निर्मिती

IC = विद्युत निर्मिती केंद्राची मेगावॅटमधील मधील स्थापित क्षमता

AUX= मेगावॅटमधील प्रमाणकानुसारी सहाय्यकारी वापर, जो एकूण वीज निर्मितीच्या टक्केवारीत दाखविण्यात येतो

परंतु असे की, प्लँट लोड फॅक्टरची परिगणना करण्यासाठी प्रत्यक्ष वीज निर्मितीमध्ये महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राच्या वीज निर्मिती कमी करण्याच्या सूचनांमुळे झालेल्या निर्मितीमधील हानिचा देखील समावेश करण्यात यावा.

(४९) ‘‘**प्रकल्प**’‘ म्हणजे विद्युत निर्मिती केंद्र किंवा पारेषण यंत्रणा, जसे असेल तसे, आणि जल-विद्युत निर्मिती केंद्राच्या बाबतीत, निर्मिती सुविधेच्या सर्व भागांचा म्हणजे पेनस्टॉक्स, हेड ॲन्ड टेल वर्क्स, मेन ॲन्ड रेग्युलेटिंग रिझर्वायर्स डॅम्स ॲन्ड अदर हायड्रॉलिक वर्क्स, इनटेक वॉटर कंडक्टर सिस्टीम, विद्युत निर्मिती

केंद्र आणि योजनेतील निर्मिती युनिट्स, जी वीज निर्मिती करत असतील, त्या सर्वांचा समावेश होतो;

(५०) ''**प्रमाणित दाब**'' म्हणजे पारेषण यंत्रणा ज्या दाबावर चालावी असा उत्पादकाने **डिझाइन** केलेला दाब किंवा त्याखालील कमी दाब ज्याने वाहिनी तात्पुरती, पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याशी विचार-विनिमय करून, भारीत केली जाते.

(५१) ''**किरकोळ विद्युत पुरवठा व्यवसाय**'' म्हणजे वितरण परवानाधारकाने त्याच्या परवान्यातील अटींना अनुसरून त्याच्या ग्राहकांना विजेची विक्री करण्याचा व्यवसाय;

(५२) ''**नदीच्या पाण्यावर चालणारे निर्मिती केंद्र**'' म्हणजे निर्मिती केंद्राच्या आधी जलाशय नसणारे जल-विद्युत निर्मिती केंद्र;

(५३) ''**नदीच्या पाण्यावर चालणारे जलाशय असणारे निर्मिती केंद्र**'' म्हणजे जल-विद्युत निर्मिती केंद्र ज्याच्या जलाशयामध्ये सर्वोच्च कालावधीतील मागणी आणि सर्वोच्च मागणी नसलेल्या कालावधीतील विजेच्या मागणीतील फरकानुसार वीज निर्मिती करण्यासाठी आवश्यक पाण्याचा साठा असतो;

(५४) ''**लहान गॅस टर्बायिनवर आधारीत निर्मिती केंद्र**'' म्हणजे व त्यामध्ये ओपन सायकल गॅस टर्बायिन किंवा कम्बाइन्ड सायकल निर्मिती केंद्र यांच्या गॅस टर्बायिनची क्षमता ५० मेगावॅट किंवा त्यापेक्षा कमी मर्यादेत असते;

(५५) **"साठवणूकीच्या पध्दतीचे विद्युत केंद्र"** म्हणजे मोठ्या प्रमाणावर साठवणूकीची क्षमता असलेले जल-विद्युत निर्मिती केंद्र जेथे विजेच्या मागणीतील बदलांना अनुरुप असे बदल विद्युत निर्मितीमध्ये करणे शक्य होते;

(५६) ''**पारेषण यंत्रणा**'' म्हणजे संलग्न उप-केंद्रासह किंवा त्याशिवाय असलेली वाहिनी किंवा वाहिन्यांचा गट, आणि त्यामध्ये पारेषण वाहिन्या व उप-केंद्रांशी संलग्न असलेल्या उपकरणांचा समावेश होतो;

(५७) ''**पारेषण क्षमता हक्क**'' म्हणजे ठोक वीज पारेषण करारात आखून देण्यात आलेल्या वीज पुरवठ्याच्या आणि काढण्याच्या ठिकाणी, नेहमीच्या परिस्थितीत, पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याचा मेगावॅटमध्ये वीज हस्तातंतरित करण्याचा हक्क;

(५८) ''**पारेषण मुक्त प्रवेश विनियम**'' म्हणजे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (पारेषण मुक्त प्रवेश) विनिय, २००५, वेळोवेळी केलेल्या सुधारणांसह;

(५९) **"पारेषण यंत्रणा उपयोगकर्ता"** म्हणजे पारेषण मुक्त प्रवेश विनियमात करण्यात आलेल्या तरतूदी **वगळता**, ठोक विद्युत पारेषण करारास अनुसरून राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेत प्रवेश करण्यासाठी पारेषण क्षमतेचे हक्क देण्यांत आले आहेत, अशी व्यक्ती;

(६०) **"युनिट"** कम्बाइन्ड सायकलवर चालणा-या औष्णिक विद्युत निर्मिती केंद्रद्रांशिवाय अन्य औष्णिक विद्युत निर्मिती केंद्राच्या संबंधात युनिट म्हणजे, वाफेवर चालणारे जनित्र, टर्बाइन-जनित्र आणि सहाय्यकारी साधने किंवा कम्बाइन्ड सायकलवर चालणा-या औष्णिक विद्युत निर्मिती केंद्राच्या संबंधात म्हणजे टर्बाइन-जनित्र आणि सहाय्यकारी साधने आणि जल-विद्युत निर्मिती केंद्राच्या संबंधात म्हणजे टर्बाइन-जनित्र व सहाय्यकारी साधने;

(६१) ''**उपयुक्त आयुर्मान** '' निर्मिती केंद्र, पारेषण यंत्रणा आणि वितरण यंत्रणेच्या युनिटच्या संबंधात उपयुक्त आयुर्मान, वाणिज्यिक कामकाजाच्या दिनांकापासून, खालीलप्रमाणे असेल-

१. कोळसा / लिग्नाईटवर आधारित औष्णिक वीज निर्मिती - २५ वर्षे
२. वायु / द्रव इंधनावर आधारित औष्णिक वीज निर्मिती केंद्र - २५ वर्षे
३. जल विद्युत निर्मिती केंद्र - ३५ वर्षे
४. एसी आणि डीसी उप-केंद्रे- २५ वर्षे
५. पारेषण वाहिनी - ३५ वर्षे
६. वितरण वाहिनी - ३५ वर्षे

(६२) ''**झेड-घटक आकार** '' म्हणजे या विनियमात विनिर्दिष्ट केलेल्या इंधन अधिभार समायोजन, १० वर्षाच्या शासकीय रोख्यांच्या दरातील बदल आणि अन्य नियंत्रणाबाहेरील घटकांशी सबंधित खर्च यासारख्या नियंत्रणाबाहेरील घटकांमुळे निर्मिती कंपन्या, पारेषण परवानेधारक आणि वितरण परवानेधारक यांना वसूल करण्याची परवानगी असलेला आकार.

या विनियमात वापरण्यात आलेले शब्द परंतु ज्यांची येथे व्याख्या करण्यात आलेली नाही त्यांचा अर्थ, अधिनियमात किंवा आयोगाने अधिसूचित केलेल्या अन्य विनियमात दिलेल्या अर्थानुसार राहील.

## भाग-एः सर्वसाधारण

## ३ विनियमांची व्याप्ती

३.१ अधिनिमाखाली ज्या बाबींसबंधात आयोगास अधिकार आहेत त्या सर्व बाबींचे विजेचे दर, त्याबाबतच्या अटी व शर्तीसह, आयोग निश्चित करेल व त्यामध्ये खालील बाबींचाही समावेश असेलः-

(एक) विद्युत निर्मिती कंपनीने वितरण परवानाधारकास करावयाचा विद्युत पुरवठा;
(दोन) विजेचे राज्यातंर्गत पारेषण;
(तीन) विजेचे वहन;
(चार) मधली पारेषण सुविधा वापरण्यासाठीचे दर व आकार;
(पाच) विजेचा वितरण वायर व्यवसाय;
(सहा) विजेचा किरकोळ पुरवठ्याचा व्यवसाय;

(सात) वितरण मुक्त प्रवेश विनियम आणि त्यात आयोगाने वेळोवेळी पारित केलेल्या आदेशांद्वारे करण्यात आलेल्या सुधारणांनुसार, अधिनियमाच्या कलम ४२च्या उप-कलम-२च्या पहिल्या परंतुकाखाली विजेच्या वहन **आकारांशिवाय अधिभार;**

(आठ) वितरण मुक्त प्रवेश विनियम आणि त्यात आयोगाने वेळोवेळी पारित केलेल्या आदेशांद्वारे करण्यात आलेल्या सुधारणांनुसार, अधिनियमाच्या कलम ४२च्या उप-कलम-४ खाली विजेच्या वहन आकारांवर **अतिरिक्त अधिभार**;

परंतु असे की, या विनियमाखाली विजेच्या पारेषण, वितरण वायर व्यवसाय आणि विजेच्या किरकोळ पुरवठा व्यवसायासाठी करण्यात आलेल्या अर्जाच्या संदर्भात, या विनियमांच्या अनुक्रमे भाग-जी , भाग-एच आणि भाग-आय खाली असलेल्या अटी व शर्तींचा विचार करुन आयोग वीज दराची निश्चिती करेल;

परंतु आणखी असे की, या विनियमाखाली अर्ज करण्यात आल्यानंतर वीज दराची निश्चिती करताना आयोग, अशा व्यवहारांतील कोणताही पक्षकार जर तो इतर राज्य आयोगांच्या किंवा केंद्रीय आयोगाच्या **कक्षेखाली** येत असेल तर अशा इतर राज्यांच्या राज्य आयोगाने वीज दरासाठी विनिर्दिष्ट

केलेल्या अटी व शर्तींचा आणि/ किंवा केंद्रीय आयोगाने वीज दरासाठी विनिर्दिष्ट केलेल्या अटी व शर्तींचा, विचार करेल;

३.२ या विनियमांत कोणतीही तरतूद असली तरी, जर केंद्र शासनाने पारित केलेल्या मार्गदर्शक सूचनंनुसार **लिलावाच्या** पारदर्शक प्रक्रियेतून वीज दराची निश्चिती करण्यात आली असेल तर, आयोग असा वीज दर स्वीकारेल.

## भाग- बी : सर्वसाधारण तत्त्वे

## ४ बहु-वर्षीय वीज दराची चौकट

४.१ आयोग, बहु-वर्षीय वीज दराच्या चौकटीच्या अंतर्गत, दिनांक १ एप्रिल, २०११ पासून, वरील विनियम ३.१ च्या खंड (एक), (दोन), (चार) व (पाच) मध्ये समाविष्ट असलेल्या बाबींकरिता, वीज दर निशिच्त करेल.

परंतु असे की, आयोग स्वतःहून किंवा अर्जदाराने अर्ज सादर केला असल्यास, निर्मिती कंपनी किंवा पारेषण परवानाधारक किंवा वितरण परवानाधारक किंवा पारेषण परवानाधारक किंवा वितरण परवानाधारक यांच्या वर्गवारीला बहु-वर्षीय वीज दराच्या चौकटीच्या अंतर्गत, वीज दर निश्चित करुन घेण्यापासून सूट देवू शकेल. अशी सूट दिल्याचा कालावधी सूट मंजूर केल्याच्या आदेशात नमूद करण्यात आला असेल.

४.२ बहु-वर्षीय वीज दराची चौकट, निर्मिती कंपनी, पारेषण परवानाधारक, वितरण वायर व्यवसाय आणि विजेचा किरकोळ पुरवठा व्यवसाय यांच्या एकूण महसूली गरज आणि वीज दर आणि आकारांपासूनच्या अपेक्षित महसुलाची परिगणना करण्यासाठी, खालील भागांवर (**बाबींवर**) आधारित असेलः-

(एक) नियंत्रण कालावधी सुरु होण्यापूर्वी, अर्जदाराकडून एकूण महसूली गरजेचे आणि विद्यमान वीज दर व आकारांपासूनच्या अपेक्षित महसुलाचे पूर्व-अनुमान आयोगाला सादर करण्यात येतील व त्यास आयोगाद्वारे मान्यता देण्यात येईल.

(दोन) एकूण महसूली गरजेच्या पूर्व-अनुमानावर आधारित सविस्तर व्यवसाय आराखडा आणि बहु-वर्षीय वीज दराच्या विनियमांखाली विनिर्दिष्ट करण्यात आलेले कामकाजाचे निकष व कामगिरीच्या मापदंडासाठी

मार्गदर्शिका, अर्जदाराकडून नियंत्रण कालावधीतील प्रत्येक वर्षासाठी, आयोगास मान्यतेसाठी सादर करण्यात येतील.

(तीन) मान्यताप्राप्त व्यवसाय आराखड्यावर आधारित, एकूण महसूली गरजेचे आणि विद्यमान वीज दर व आकारांपासूनच्या अपेक्षित महसुलाचे पूर्व-अनुमान, अर्जदाराकडून नियंत्रण कालावधीतील प्रत्येक वर्षासाठी, आयोगास सादर करण्यात येतील आणि आयोग, निर्मिती कंपनी, पारेषण परवानाधारक, वितरण वायर व्यवसाय आणि विजेचा किरकोळ पुरवठा व्यवसाय यांच्याकरिता, नियंत्रण कालावधीतील प्रत्येक वर्षासाठी, वीज दरास मान्यता देईल.

(चार) आयोग, नियंत्रण कालावधीतील दुस-या वर्षपासून सुरु होणा-या, नियंत्रण कालावधीतील प्रत्येक वर्षाच्या दिनांक ३० एप्रिल रोजी, विनियमात विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या निर्देशांकित मापदंडांच्या निर्देशांकनात बदल, आवश्यकता वाटल्यास, आदेशाद्वारे अधिसूचित करेल, आणि निर्मिती कंपनी, पारेषण परवानाधारक, वितरण वायर व्यवसाय आणि विजेचा किरकोळ पुरवठा व्यवसाय यांना लागू असलेल्या वीज दरातील बदल, आदेशाद्वारे अधिसूचित करेल;

(पाच) मान्यताप्राप्त पूर्व-अनुमान आणि अर्जदाराच्या नियंत्राणखाली असणा-या घटकांमुळे व नियंत्रणाखाली नसणा-या घटकांमुळे कामागिरीतील तफावतींच्या वर्गवारीच्या तुलनेत **प्रत्यक्ष झालेल्या** कामगिरीचा **मध्यावधी** आढावा आयोगाकडून घेण्यात येईल;

(सहा) आयोगाने या विनियमात विनिर्दिष्ट केलेल्या नियंत्रणाधीन नसलेल्या घटकांमुळे झालेल्या मान्यताप्राप्त नफ्याचा लाभ ग्राहकांना देण्याचे किंवा झालेली हानि ग्राहकांकडून वसूल करण्याचे सूत्र;

(सात) आयोगाने या विनियमात विनिर्दिष्ट केलेल्या नियंत्रणाधीन असलेल्या घटकांमुळे उद्‌भवणारा मान्यताप्राप्त नफा किंवा हानि विभागून घेण्याचे सूत्र;

(आठ) निर्मिती कंपनी, पारेषण परवानाधारक, वितरण वायर व्यवसाय आणि विजेचा किरकोळ पुरवठा व्यवसाय यांचेकरिता, नियंत्रण कालावधीतील प्रत्येक आर्थिक वर्षाकरिता, मान्यताप्राप्त पूर्व-अनुमानावर आधारित विशिष्ट मापदंडांकरिता निर्देशांकाच्या तपशीलवार वैषिष्ट्यांसह, नियंत्रण कालावधीच्या सुरुवातीला एकदाच वीज दर निश्चित करण्यात येईल व

त्याचा आढावा देखील कामगिरीच्या मध्यावधी आढाव्याच्या वेळी घेण्यात येईल.

## ५ नियंत्रण कालावधी

५.१ या विनियमांखाली नियंत्रण कालावधी पाच (५) आर्थिक वर्षांचा असेल; या विनियमांखाली १ एप्रिल, २०११ ते ३१ मार्च, २०१६ या नियत्रण कालावधीच्या पाच (५) वर्षांच्या कालावधीकरिता पहिला अर्ज करण्यात येईल.

## ६ व्याप्ती

६.१ बहु-वर्षीय वीज दराची चौकट, निर्मिती कंपनी, पारेषण परवानाधारक, वितरण वायर व्यवसाय आणि विजेचा किरकोळ पुरवठा व्यवसायकरिता वीज दर निश्चितीसाठी सादर करण्यात आलेल्या अर्जांना लागू राहील.

## ७ व्यवसाय आराखडा

७.१ निर्मिती कंपनी, पारेषण परवानाधारक आणि वितरण परवानाधारक १ एप्रिल, २०११ ते ३१ मार्च, २०१६ या पाच (५) वर्षांच्या नियंत्रण कालावधीकरिता व्यवसाय आराखडा ३१ ऑग्स्ट, २०१० पर्यंत दाखल करेल व त्यामध्ये, आयोगाने वेळोवेळी आदेशाद्वारे अधिसूचित केलेल्या मार्गदर्शक सूचना व नमुने यांना अनुसरुन परंतु त्यापुरतेच मर्यादित न राहता, तपशीलवार वर्गवारी-निहाय विक्री व मागणीचे अंदाज, वीज प्राप्तीची योजना, भांडवल गुंतवणूक योजना, भांडवल उभारणीची योजना व भौतिक लक्ष्ये, यांचा समावेश असेल.

७.२ भांडवल गुंतवणूक योजनेमध्ये, चालू असलेले प्रकल्प जे आढावाधीन वर्षामध्ये देखील चालू असतील आणि नवीन प्रकल्प (समर्थनासह) जे वीज दराच्या कालावधीत सुरु होतील परंतु या कालावधीत किंवा नंतरही पूर्ण होऊ शकतील, वेगवेगळे दाखविण्यात येतील. आयोग भांडवल गुंतवणूक योजना विचारात घेवून त्यास मान्यता देईल ज्याकरिता निर्मिती कंपनी, पारेषण परवानाधारक आणि वितरण परवानाधारक यांना संबंधित तांत्रिक व वाणिज्यिक तपशील द्यावा लागेल.

७.३ वितरण परवानाधारक, **ऊर्जा कार्यक्षमता** (ईई) आणि वीज मागणी व्यवस्थापन (डीएसएम) योजनांसाठी ठरविण्यात आलेल्या लक्ष्यांचा परिणाम विचारात घेऊन, वीज खरेदीची गरज निशित करेल;

परंतु असे की, **ऊर्जा कार्यक्षमता** (ईई) आणि वीज मागणी व्यवस्थापन (डीएसएम) योजनांसाठी ठरविण्यात आलेल्या लक्ष्यांची **पूर्तता** विचारात घेऊन आयोग वीज दर निश्चितीच्या वेळी, वितरण परवानाधारकाच्या वीज खरेदीच्या खर्चास मान्यता देईल आणि याबाबतीत कोणतीही तूट आढळल्यास वितरण परवानाधारकाचा वीज खरेदीचा उच्चतम खर्च आयोग नामंजूर करेल.

७.४ निर्मिती कंपनी आणि पारेषण परवानाधारक किंवा वितरण परवानाधारक वीज दर निश्चितीसाठी **बहु-वर्षीय वीज दरांतर्गत** याचिका सादर करण्यापूर्वी त्यांच्या व्यवसाय आराखड्यास आयोगाची मान्यता घेतील. **बहु-वर्षीय वीज दरांतर्गत** याचिका सादर करताना त्यांची महसुलाची गरज ठरविण्यासाठी, नियंत्रण कालावधीतील संबंधित वर्षाकरिता मान्यता-प्राप्त व्यवसाय आराखड्यानुसार खर्च विचारात घेण्यात येतील.

## ८ पूर्व-अनुमान

८.१ अर्जदार, मान्यता देण्यात आलेल्या व्यवसाय आराखड्यावर आधारित, त्याची एकूण महसुलाची गरज आणि वीज दर व आकारांपासून मिळणारा अपेक्षित महसूल याबाबतचे त्याचे पूर्व-अनुमान, या विनियमांच्या **भाग-सी** मध्ये नमूद करण्यात आलेल्या काल-मर्यादेत आणि वेळोवेळी सुधारणा केलेल्या मविनिआ (शुल्क व आकार) विनियम, २००४ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने व शुल्कासोबत सादर करेल.

८.२ <u>एकूण महसुली गरजेचे पूर्व-अनुमान</u>

८.३ अर्जदार, त्याच्या एकूण महसुली गरजेचे पूर्व-अनुमान, एकूण महसुली गरज ज्या घटकांवर अवलंबून असते त्या प्रत्येक घटकाच्या नियंत्रण कालावधीतील होणा-या **परिणामांच्या** गृहितांचा वापर करुन, करु शकेल.

८.४ वीज दर व आकारांपासून मिळणा-या अपेक्षित महसुलाचे पूर्व-अनुमान

अर्जदार खालील बाबींचा अवलंब करुन वीज दर व आकारांपासून मिळणा-या अपेक्षित महसुलाचे पूर्व-अनुमान विकसित करेलः-

(ए) पारेषण परवानाधारकाच्या बाबतीत, नियंत्रण कालावधीतील प्रत्येक आर्थिक वर्षाकरिता पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याला वाटप केलेले पारेषण क्षमतेचे अंदाज;

(बी) वितरण परवानाधारकाच्या बाबतीत, नियंत्रण कालावधीतील प्रत्येक आर्थिक वर्षाकरिता ग्राहकांना पुरवठा केलेल्या आणि वितरण यंत्रणा उपयोगकर्त्यांच्या वतीने वहन केलेल्या विजेच्या परिमाणाचे अंदाज; आणि

(सी) अर्ज तयार करण्याच्या दिनांकास असलेला विद्यमान वीज दर.

८.५ एकूण महसूली गरज आणि वीज दर व आकारांपासून मिळणा-या अपेक्षित महसुलाच्या पूर्व-अनुमानांवर आधारित, एकूण महसूली गरजेत तूट, असल्यास, ती भरुन काढू शकणा-या वीज दराचे पूर्वानुमान, निर्मिती कंपनी आणि पारेषण परवानाधारक किंवा वितरण परवानाधारक सादर करेल.

८.६ अर्जदार, वरील पूर्वानुमानास पुष्टी देणारा पुढील बाबीसंदर्भातील, परंतु तेवढ्यापुरतेच मर्यादित न राहता, सविस्तर तपशील, म्हणजेच मागील कामगिरी, कार्यक्षमता किंवा उत्पादकतेत **वाढ** साध्य करण्यासाठी करावयाच्या प्रस्तावित उपाय-योजनांसाठी घेतलेले पुढाकार, तांत्रिक अभ्यास, करारानुषंगिक व्यवस्था आणि/किंवा दुय्यम संशोधन, आयोगास पाठवेल ज्यायोगे आयोगास पूर्वानुमानांचा वाजवीपणा पडताळून पाहणे शक्य होईल.

८.७ अर्ज प्राप्त झाल्यानंतर, आयोग-

(ए) नियंत्रण कालावधीकरिता मान्यता दिलेल्या वीज दराचा आदेश, त्यांत विनिर्दिष्ट केलेल्या फेर-बदलांना व शर्तींना अधिन राहून, काढेल; किंवा

(बी) आयोगास उचित वाटतील अशी कारणे लेखी नोंदवून, अर्ज **नामंजूर** करेल.

परंतु असे की, अर्ज **नामंजूर** करण्यापूर्वी, अर्जदारास त्याची बाजू मांडण्याची उचित संधी देण्यात येईल.

८.८ अर्जदाराच्या विजेचा दर निश्चित करताना विचारात घ्यावयाचे घटक आयोगाने या विनियमांत विनिर्दिष्ट केले असून त्यांचा आढावा, विनियम १० नुसार घ्यावयाच्या कामगिरीच्या मध्यावधी आढाव्याचा एक भाग म्हणून आयोगकडून घेण्यात येईल.

## ९ काही घटकांसाठी विशिष्ट मार्गदर्शिका

९.१ आयोग, राज्यातील वीज उद्योगाचे पुनर्गठन, पुनर्रचना व विकास करण्यासाठी, व्यवसाय आराखड्यास मान्यता देताना काही घटकांसाठी, विशिष्ट मार्गदर्शिका विनिर्दिष्ट करेल.

परंतु असे की, ज्या घटकांसाठी मार्गदर्शिका विनिर्दिष्ट करण्यात येईल त्यामध्ये पुढील बाबींचा, परंतु त्यांच्यापुरते मर्यादित न राहता, समावेश असेल- संचालन व सुव्यवस्था खर्चाचे निकष, निर्मिती केंद्राची उपलब्धता, केंद्रातील उष्मांक दर, दुय्यम **तेलाचा** वापर, सहाय्यकारी वापर, मार्गस्थ हानि, पारेषण हानि, पुरवठ्याची उपलब्धता आणि वायरची उपलबधता, वितरण हानि आणि वसूलीतील कार्यक्षमता.

९.२ अर्जदाराने सादर केलेल्या व्यवसाय आराखड्याकरिता पारित केलेल्या आदेशात आयोगाने विनिर्दिष्ट केलेली मार्गदर्शिका, अर्जदार, विनियम ८ खालील एकूण महसूली गरज आणि वीज दर व आकारांपासून मिळणा-या अपेक्षित महसुलाच्या पूर्व-अनुमानात समाविष्ट करेल.

## १० कामगिरीचा मध्यावधी आढावा

१०.१ जेव्हा निर्मिती कंपनी किंवा पारेषण परवानाधारक किंवा वितरण परवानाधारकाची एकूण महसूली गरज आणि वीज दर व आकारांपासून मिळणारा अपेक्षित महसूल जर बहु-वर्षीय वीज दर चौकटीअंतर्गत समाविष्ट असेल तर अशा निर्मिती कंपनी किंवा पारेषण परवानाधारक किंवा वितरण परवानाधारकाच्या कामगिरीचा, या विनियमास अनुसरुन, नियंत्रण कालावधीत मध्यावधी आढावा घेण्यात येईल.

१०.२ निर्मिती कंपनी, पारेषण परवानाधारक किंवा वितरण परवानाधारक, कामगिरीचा मध्यावधी आढावा घेण्यासाठी, विनियम १८ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या काल-मर्यादेत, अर्ज सादर करेल;

परंतु असे की, निर्मिती कंपनी, पारेषण परवानाधारक किंवा वितरण परवानाधारक, जसे असेल तसे, एकूण महसूली गरज आणि वीज दर व आकारांपासून मिळणारा अपेक्षित महसूल यांच्या मान्यता देण्यात आलेल्या पूर्व-अनुमानातील तफावतीची कारणमीमांसा व व्याप्ती अजमावण्यासाठी, लेखा विवरणपत्रे, लेखा

पुस्तकामधील उतारे यांच्यासह आयोग मागेल अशी अन्य माहिती, आयोग विनिर्दिष्ट करेल त्या नमुन्यात, आयोगास सादर करेल.

१०.३ कामगिरीच्या मध्यावधी आढाव्याच्या व्याप्तीमध्ये निर्मिती कंपनी, पारेषण परवानाधारक किंवा वितरण परवानाधारक, यांच्या एकूण महसूली गरज आणि वीज दर व आकारांपासून मिळणारा अपेक्षित महसूलाच्या मान्यता दिलेल्या पूर्व-अनुमानांशी प्रत्यक्ष कामगिरीची तुलना समाविष्ट असेल व त्यात खालील बाबी राहतील:-

(ए) मागील दोन आर्थिक वर्षातील मान्यता दिलेल्या पूर्व-अनुमानांशी अर्जदाराच्या याच कालावधीतील लेखापरीक्षित कामगिरीची तुलना; आणि

(बी) चालू आर्थिक वर्षांकरिता मान्यता दिलेल्या पूर्व-अनुमानांशी, चालू आर्थिक वर्षातील पहिल्या सहामाही मधील अर्जदाराच्या कामगिरीची तुलना;

१०.४ आयोगाने विनियम ११ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कार्यक्षमतेच्या मापदंडाकरिता, कामगिरीच्या मध्यावधी आढाव्याचा एक भाग म्हणून, आयोग परवानाधारकाच्या कामगिरीचा सविस्तर आढावा मान्यता दिलेल्या पूर्व-अनुमानांच्या तुलनेत घेईल;

परंतु असे की, जेथे दुसऱ्या नियंत्रण कालावधीतील कोणत्याही पूर्ण वर्षाकरिता सरासरी दश-वार्षिक शासकीय रोख्यांचा दर हा वर्षाच्या सुरुवातीला विचारात घेतलेल्या किमान दराच्या तुलनेत (कमी किंवा अधिक) १ टक्क्यांपेक्ष्या जास्त नसेल तर, वर नमूद केलेल्या किमान दराच्या तुलनेत गुंतवलेल्या भांडवलावरील परताव्यातील तफावत, कामगिरीच्या मध्यावधी आढाव्याच्या वेळी वीज दराची निश्चिती करताना विचारात घेण्यात येईल.

१०.५ वरील विनियम १०.४ मधील आढावा पूर्ण झाल्यानंतर, आयोग खालील विनियम ११ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या घटकांच्या कामगिरीतील तफावत किंवा अपेक्षित तफावतींचा संबंध अर्जदाराच्या नियंत्रणाधीन असलेल्या बाबींशी किंवा नियंत्रणाधीन नसलेल्या बाबींशी जोडेल;

परंतु असे की, विनियम ११ खाली विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या घटकांशिवाय अन्य घटकांमुळे जर कोणत्याही तफावती किंवा अपेक्षित तफावती आढळल्या तर,

नियंत्रण कालावधीत आयोगाकडून त्यांचा आढावा घेतला जाणार नाही आणि या तफावतींचा संबंध पूर्णतः नियंत्रणाधीन असणाऱ्या घटकांशी जोडण्यात येईल;

परंतु तथापि असे की, जर अर्जदार किंवा स्वारस्य असलेली व्यक्ती किंवा बाधित व्यक्तीची अशी खात्री झाली असेल की, खालील विनियम ११ मध्ये विनिर्दिष्ट न केलेल्या घटकाच्या कामगिरीत कोणत्याही आर्थिक वर्षात महत्त्वाची तफावत किंवा अपेक्षित तफावत नियंत्रणाधीन नसलेल्या बाबींमुळे झाली असेल तर, असा अर्जदार किंवा स्वारस्य असलेली व्यक्ती किंवा बाधित व्यक्ती, अशा घटकाचा समावेश, आयोगाला योग्य वाटल्यास, वरील विनियम १०.४ मधील अशा आर्थिक वर्षाच्या आढाव्यात समाविष्ट करण्यासाठी आयोगाकडे अर्ज करु शकेल.

१०.६ कामगिरीचा मध्यावधी आढावा पूर्ण झाल्यानंतर, आयोग खालील बाबींकरिता आदेश पारित करेल**:-**

(ए) निर्मिती कंपनी, पारेषण परवानाधारक किंवा वितरण परवानाधारकाला नियंत्रणाधीन असलेल्या घटकांमुळे झालेला फायदा किंवा तोटा आणि अशा फायदा किंवा तोट्याची विनियम १३ नुसार विभागून घ्यावयाची रक्कम;

(बी) नियंत्रण कालावधीच्या उर्वरित मुदतीकरिता निर्मिती कंपनी, पारेषण परवानाधारक किंवा वितरण परवानाधारकाच्या पूर्व-अनुमानात मान्यता दिलेले फेरबदल.

## ११ नियंत्रणाधीन असलेले आणि नियंत्रणाधीन नसलेले घटक

११.१ ''नियंत्रणाधीन नसलेल्या'' घटकांमध्ये आयोगाने निश्चित केलेल्या खालील घटकांचा समावेश असेल, जे अर्जदारांच्या नियंत्रणा बाहेरील असतील आणि जे अर्जदार शिथिल करु शकणार नाही असे असतील.
नियंत्रणाधीन नसलेल्या घटकांची सूची खालीलप्रमाणे आहे-

(ए) दैवी आपत्तीच्या घटना- जसे युध्द, आग, नैसर्गिक प्रकोप इ.;

(बी) कायद्यांतील बदल;

(सी) कोळसा, तेल आणि सर्व प्राथमिक किंवा दुय्यम इंधनाच्या किंमतीमधील बदलांमुळे इंधन खर्चातील बदल;

(डी) विनियम २५ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या परिस्थितीमुळे वीज निर्मिती खर्चातील बदल आणि/किंवा वीज खरेदी खर्चातील बदल; आणि

(इ) वाहतूक खर्चातील बदल.

११.२ अर्जदाराच्या कामगिरीतील काही तपशीलवार तफावती किंवा अपेक्षित तफावती ज्यांचा संबंध आयोगाकडून नियंत्रणाधीन घटकांशी जोडला जाऊ शकेल त्यांच्यामध्ये खालील बाबींचा, परंतु त्या बाबींपुरताच मर्यादित न राहता, समावेश असेल.

(ए) वेळ आणि/ किंवा खर्चातील वाढीमुळे भांडवली खर्चातील तफावतीच्या कार्यान्वयनातील कार्यक्षमतेतील फरक जो अशा प्रकल्पाच्या व्याप्तीतील मान्यता दिलेल्या बदलाशी जोडता येणार नाही, वैधानिक लेव्हीमधील बदल किंवा दैवी आपत्तीच्या घटना;

(बी) बुडीत कर्जासह तांत्रिक आणि वाणिज्यिक हानीतील तफावती;

(सी) कामगिरीच्या मापदंडातील तफावती;

(डी) खेळते भांडवलाच्या गरजेतील तफावती;

(इ) या विनियमात सूट देण्यात आलेली असल्यास असे अपयश वगळून, कृतीच्या मानकांच्या विनियमामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या मानकांची पूर्तता करण्यात आलेले अपयश;

(एफ) कामगारांच्या उत्पादकतेत आलेली तफावत;

(जी) संचालन व सुव्यवस्था खर्चातील तफावत;

(एच) वायर उपलब्धता आणि पुरवठा उपलब्धतेमधील तफावती; आणि

(आय) मार्गस्थ कोळशातील हानि.

## १२ नियंत्रणाधीन नसलेल्या घटकांमुळे झालेला फायदा किंवा तोटा ग्राहकांना लागू करण्याचे सूत्र

१२.१ निर्मिती कंपनी, पारेषण परवानाधारक किंवा वितरण परवानाधारकाला नियंत्रणाधीन नसलेल्या घटकांमुळे होणारा मान्यताप्राप्त एकूण फायदा किंवा तोटा ग्राहकांना झेड-घटक आकाराखाली लागू करण्यात येईल; हा आकार,

आयोगाने निर्मिती कंपनी, पारेषण परवानाधारक किंवा वितरण परवानाधारकाकरिता या विनियमांखाली पारित करावयाच्या आदेशात, अर्ध-वार्षिक तत्वावर त्यांच्या वीज दरात समायोजन म्हणून निश्चित करण्यात येईल.

१२.२ निर्मिती कंपनी, पारेषण परवानाधारक किंवा वितरण परवानाधारक या झेड-घटक आकाराचा तपशील, आयोगाला अर्ध-वार्षिक तत्वावर विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या नमुन्यामध्ये सादर करेल आणि, या प्रयोजनासाठी, आयोगाने मान्यता दिलेल्या रकमा आणि केलेला खर्च यामधील तफावतींचा तपशील सादर करील व त्यासोबत आयोगाला पडताळणीसाठी आवश्यक असलेला परिगणनेचा तपशील आणि पुष्टी देणारी कागदपत्रे पाठवेल;

परंतु असे की या विनियमांच्या अधिसूचनेनंतर, निर्मिती कंपनी, पारेषण परवानाधारक किंवा वितरण परवानाधारक, झेड-घटक आकार लागू करण्यासाठी आयोगाची पूर्व-मंजुरी घेतील.

१२.३ **झेड-घटक आकाराचे भाग:-**

झेड-घटक आकार खालील तीन (३) भागांचा मिळून झालेला असेल आणि त्यांची परिगणना खालीलप्रमाणे करण्यात येईल:-

$Z = Z_{FAC} + Z_{G\text{-}sec} + Z_{OUC}$

Where

Z = Z-factor Charge

$Z_{FAC}$ = Z-factor Charge - component for FAC.

$Z_{G\text{-}sec}$ = Z-factor Charge - component for 10 year G-sec rate variation

$Z_{OUC}$ = Z-factor Charge - component for Variation in any other uncontrollable factors.

१२.४ इंधन अधिभार समायोजन ($Z_{FAC}$)

वितरण परवानाधारक, इंधन खर्चातील बदलामुळे, वीज निर्मितीचा खर्च अणि वीज प्राप्तीच्या खर्चातील बदल यामुळे करावयाचे समायोजन हे झेड-घटक आकाराच्या इंधन समायोजन खर्च (एफएसी) या भागाच्या माध्यमातून, खाली विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, ग्राहकांना लागू करेल.

१२.५ इंधन समायोजन खर्च (एफएसी) वितरण परवानाधारकाच्या संपूर्ण विक्रीवर, ग्राहकाला कोणतीही सूट न देता, लागू राहील.

१२.६ स्वतःच्या निर्मिती केंद्रातून केलेली वीज निर्मिती आणि इंधन खर्च केल्यानंतरच्या कोणत्याही महिन्यात केलेल्या वीज खरेदीच्या इंधन खर्चातील प्रत्यक्ष तफावतीच्या आधारे, या विनियमानुसार, एफएसी भागाची परिगणना करण्यात येईल व आकारणी करण्यात येईल, आणि ही परिगणना इंधन खर्चातील अंदाजित किंवा अपेक्षित खर्चाच्या आधारे करण्यात येणार नाही.

१२.७ <u>दुसऱ्या नियंत्रण कालावधीत झेड-घटक आकाराला पहिली मान्यता</u>

वितरण परवानाधारक, दुसऱ्या नियंत्रण कालावधीतील पहिल्या वर्षाच्या पहिल्या सहामाहीत, दुसऱ्या नियंत्रण कालावधीत वसूल करावयाच्या झेड-घटक आकाराला पूर्व-मंजूरी मिळण्यासाठी आयोगाने विनिर्दिष्ट केलेल्या नमुन्यामध्ये तपशील सादर करेल.

परंतु असे की, वितरण परवानाधारक, दुसऱ्या वर्षातील पहिल्या वर्षाच्या पहिल्या सहामाहीकरिता, स्वतःच्या निर्मिती केंद्रातून निर्माण केलेल्या विजेचा इंधन खर्च आणि केलेल्या वीज प्राप्तीवरील अस्थिर खर्चाचा तपशील, पहिली सहामाही संपण्याच्या, साठ (६०) दिवसांच्या आत सादर करेल;

परंतु असे की, आयोग, दुसऱ्या नियंत्रण कालावधीत वसूल करावयाच्या, दुसऱ्या नियंत्रण कालावधीतील पहिल्या वर्षाच्या पहिल्या सहामाहीतील झेड-घटक आकाराला, **आवश्यक छाननी करुन** मान्यता देईल.

१२.८ <u>दुसऱ्या वर्षात झेड-घटक आकाराला नंतर मान्यता</u>

वितरण परवानाधारक, दुसऱ्या नियंत्रण कालावधीतील येणाऱ्या पुढील अर्ध-वार्षिक कालावधींमध्ये वसूल करावयाच्या दुसऱ्या नियंत्रण कालावधीतील पुढील अर्ध-वार्षिक कालावधींमधील झेड-घटक आकारांना पूर्व-मंजरी मिळण्यासाठी त्यांचा तपशील आयोगाने विनिर्दिष्ट केलेल्या नमुन्यामध्ये सादर करेल.

परंतु असे की, वितरण परवानाधारक, दुसऱ्या नियंत्रण कालावधीतील पुढील अर्ध-वार्षिक कालावधीकरिता, स्वतःच्या निर्मिती केंद्रातून निर्माण केलेल्या वीजेचा इंधन खर्च आणि केलेल्या वीज खरेदीवरील अस्थिर खर्चाचा तपशील, असा अर्ध वार्षिक कालावधी संपण्याच्या, साठ (६०) दिवसांच्या आत सादर करेल;

परंतु असे की, वसूल करावयाच्या झेड-घटक भागाच्या तुलनेत मागील अर्ध-वार्षिक कालावधीकरिता सर्व ग्राहकांना लागू करण्यात आलेल्या झेड-घटक आकारांचा तपशील वितरण परवानाधारक सादर करेल व त्यासोबत आयोगाला

पडताळणीसाठी आवश्यक असलेल्या परिगणनेचा तपशील आणि कागदपत्रे पाठवेल;

परंतु असे की, वितरण परवानाधारक, झेड-घटक आकारास आयोगाने दिलेल्या मंजुरीतील असा तपशील, त्याच्या संकेत-स्थळावर वेळोवेळी प्रदर्शित करेल.

१२.९ झेड-घटक आकारातील इंधन समायोजन आकार (एफएसी) भागाच्या परिगणनेसाठी वापरावयाचे सूत्र खालीलप्रमाणे राहील:-

$Z_{FAC}$(Rs crore) = **F** + **C** + **B**,

Where

$Z_{FAC}$ = Z-factor Charge - component for FAC

**F** = Change in fuel cost of own generation and variable cost of power purchase

**C** = Carrying Cost for any under recovery/over recovery on account of Change in fuel cost of own generation and variable cost of power purchase

**B** = Adjustment factor for over-recovery / under-recovery

Explanation I – for the purpose of this Regulation, the term **"F"** shall be computed in accordance with the following formula:

F (Rs. Crore) = $A_{FC,Gen}$ + $A_{FC,PP,}$ Where:

११ स्व-निर्मितीमधील इंधन खर्चातील बदल. या बदलाची परिगणना, उष्मांक दर, सहाय्यकारी वापर, निर्मिती आणि वीज खरेदीचे मिश्रण, इ.सह, आयोगाने दिलेले निर्देश आणि निकष यांच्या आधारे करण्यात येईल.

२ अन्य स्त्रोतांकडून केलेल्या वीज खरेदीवरील ऊर्जा आकारांमधील बदल. हा बदल, लागू असणाऱ्या निकषांना अधीन राहून, विनियमात विहित केलेल्या आणि विद्यमान बहु-वर्षीय वीज दराच्या आदेशातील निकषांची पूर्तता करण्याच्या मर्यादेपर्यंत, अनुज्ञेय राहील.

Explanation II – for the purpose of this Regulation, the term **"C"** shall mean carrying cost on account of change in fuel cost of own generation and variable cost of power purchase.

Explanation III – for the purpose of this Regulation, the term **"B"** shall be computed in accordance with the following formula:

$B_{Hn}$ (Rs. Crore) = $A_{Hn-1} + R_{Hn}$

Where:

$B_{Hn}$ = Adjustment factor for over-recovery / under-recovery in the half "n"

$A_{Hn-1}$ = Incremental cost in the half "n-1".

$R_{Hn}$ = Incremental cost in half "n-1" actually recovered in ensuing half "n".

१२.९.१ झेड-घटक आकारातील वसुली योग्य एकूण एफएसी भागाची वसुली, वर विनिर्दिष्ट केलेल्या सूत्रानुसार, प्रत्यक्ष विक्रीमधून 'रुपये प्रति युनिट' प्रमाणे करण्यात येईल.

परंतु असे की, मीटर न बसवलेल्या ग्राहकांच्या बाबतीत झेड-घटक आकारातील एफएसी भागाची वसूली, आयोगाने विनिर्दिष्ट केलेल्या पध्दतीस अनुसरुन, अशा ग्राहकांना केलेल्या अंदाजित विक्रीच्या आधारे करण्यात येईल. अंदाजित विक्रीची परिगणना आयोगाने विनिर्दिष्ट केलेल्या पध्दतीस अनुसरुन करण्यात येईल.

परंतु असे की, आयोगाने मान्यता दिलेल्या पातळीपेक्षा वितरण परवानाधारकाची प्रत्यक्ष वितरण हानी जेव्हा जास्त होते तेव्हा, अशा जादा वितरण हानीशी (युनिटमधील) सममूल्य झेड-घटक आकारातील एफएसी भागाची रक्कम ही वसुली योग्य झेड-घटक आकाराच्या एकूण एफएसी भागातून कमी करण्यात येईल.

प्रति युनिट झेड-घटक आकाराची परिगणना खालील सूत्रानुसार करण्यात येईलः-

$Z_{FACRs./kWh}$ = (Z / (Metered sales + Unmetered consumption estimates + Excess distribution losses)) * 10

१२.१० <u>शासकीय रोख्यांच्या दरातील तफावत ($Z_{G-sec}$)</u>

विनियम २९.६ मध्ये वर्षाच्या सुरुवातीला विनिर्दिष्ट केलेल्या किमान दराच्या तुलनेत जर दश-वार्षिक शासकीय रोख्यांच्या दरात तफावत झाली तर, किमान दराच्या तुलनेत (कमी किंवा अधिक) १ टक्क्यापेक्षा जास्त तफावती नुसार गुंतवलेल्या भांडवलावरील परतावा, झेड्-घटक आकारांतर्गत वार्षिक तत्त्वावर

आयोगांकडून विनिर्दिष्ट केलेल्या पद्धतीप्रमाणे, **ग्राहकांकडून वसूल करण्यात येईल;**

१२.११ झेड्-घटक आकाराचे अन्य भाग ($Z_{OUC}$)
निर्मिती कंपनी किंवा परवानाधारकाच्या खर्चात, विनियम ११.१ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अन्य कोणत्याही नियंत्रणाधीन नसलेल्या घटकांमुळे जर तफावत झाली तर ही तफावत, झेड्-घटक आकारांतर्गत वार्षिक तत्त्वावर आयोगांकडून विनिर्दिष्ट केलेल्या पद्धतीप्रमाणे, **ग्राहकांकडून वसूल करण्यात येईल;**

## १३ नियंत्रणाधीन असलेल्या घटकांमुळे झालेला फायदा किंवा तोटा ग्राहकांना लागू करण्याचे सूत्र

१३.१ निर्मिती कंपनी, पारेषण परवानाधारक किंवा वितरण परवानाधारकाला नियंत्रणाधीन असलेल्या घटकामुळे होणा-या एकूण मान्यताप्राप्त फायद्याच्या बाबतीत पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येईलः-

(ए) विनियम १०.६ खाली आयोगाच्या आदेशात विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या कालावधीकरिता वीज दरात सूट देण्यासाठी, अशा फायद्याच्या रक्कमेपैकी एक-तृतियांश रक्कम वापरण्यात येईल; आणि

(बी) अशा फायद्याच्या उर्वरित दोन-तृतियांश रकमेचा विनियोग, निर्मिती कंपनी, पारेषण परवानाधारक किंवा वितरण परवानाधारकाला योग्य वाटेल तसा करण्यात येईल;

१३.२ निर्मिती कंपनी, पारेषण परवानाधारक किंवा वितरण परवानाधारकाला नियंत्रणाधीन असलेल्या घटकामुळे होणा-या एकूण मान्यताप्राप्त तोट्याच्या बाबतीत पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येईलः-

(ए) विनियम, १०.६ खाली आयोगाच्या आदेशात विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या कालावधीकरिता, एक-तृतीयांश तोट्याच्या रक्कमे इतका अतिरिक्त आकार वीज दरात लावण्यात येईल; आणि

(बी) अशा तोट्याची उर्वरित रक्कम निर्मिती कंपनी, पारेषण परवानाधारक किंवा वितरण परवानाधारकाला सहन करावी लागेल;

१३.३ दुस-या नियंत्रण कालावधीत नियंत्रणाधीन असलेल्या घटकांमुळे झालेला फायदा किंवा तोटा कामगिरीच्या मध्यावधी आढाव्याच्या वेळी आणि तिस-या नियंत्रण

कालावधीतील वीज दराच्या निश्चितीकरण्याच्या प्रक्रियेत देखील ग्राहकांबरोबर विभागण्यात येईल.

## १४ पर्यायी अटी आणि शर्ती

१४.१ मुक्त प्रवेश ग्राहकांबरोबर करावयाच्या करारातील अटी व शर्तीमुळे, अशा अटी व शर्ती भाग असणाऱ्या कराराच्या संपूर्ण कालावधीत, राज्यातील मुक्त प्रवेश ग्राहकांना करावयाच्या वीज पुरवठ्याचा खर्च कमी होणार असेल तर, या विनियमात अंतर्भूत असणाऱ्या अटी आणि शर्तीपेक्षा कोणत्याही वेगळ्या अटी व शर्ती, निर्मिती कंपनी किंवा वितरण परवानाधारक, जसे असेल तसे, मान्य करु शकतील.

परंतु असे की, जर अधिनियम किंवा या विनियमांखाली आयोगाच्या अशा मान्यतेची विनिर्देशपूर्वक आवश्यकता नसेल तर अशा बाबी वगळून, असा करार आयोगाच्या पूर्व-मान्यतेनेच अंमलात येईल.

## भाग -सी : वीज दराच्या निश्चितीकरणाची कार्यपद्धत

## १५ वीज दराच्या निश्चितीकरणासाठी अर्ज करण्याची कार्यपद्धत

१५.१ वीज दराच्या निश्चितीकरणासाठी या विनियमात विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या नमुन्यात आणि रितीनुसार अर्ज करण्यात येईल आणि अर्जासोबत, वेळोवेळी सुधारणा केलेल्या मविनिआ (शुल्क आणि आकार) विनियम, २००४, नुसार, शुल्क पाठविण्यात येईल.

१५.१.१ वीज दराच्या निश्चितीकरणासाठी आयोगाने करावयाची कार्यवाही, वेळोवेळी सुधारणा केलेल्या मविनिआ (कामकाज प्रचालन) विनियम, २००४ नुसार राहील.

१५.२ या विनियमात काहीही नमुद करण्यात आले असले तरी, आयोगास, स्वतःहून किंवा कोणत्याही स्वारस्य असलेल्या किंवा बाधित व्यक्तीने दाखल केलेल्या याचिकेच्य संदर्भात, कोणत्याही निर्मिती कंपनी, पारेषण परवानाधारक किंवा वितरण परवानाधारकाचा वीज दर आणि वीज दराच्या अटी व शर्ती मंजूर करावयाचे प्राधिकार सर्व काळ असतील;

परंतु असे की, वीज दराचे निश्चितीकरण हे, आयोगाने पूर्वी मंजूर केलेल्या किंवा न केलेल्या आणि अधिनियमातील सुरुवात होण्यापूर्वी किंवा त्या नंतर कोणत्याही वेळी केलेल्या करार किंवा व्यवस्था **किंवा अन्यथा** यांच्या अनुषंगाने असेल;

## १६ वीज निर्मितीच्या दराचे निश्चितीकरण

१६.१ <u>विद्यमान निर्मिती केंद्र</u>

१६.१.१ या विनियमाच्या प्रभावी दिनांकाच्या पूर्वी कोणत्याही वेळी आयोगाने, निर्मिती कंपनी आणि वितरण परवानाधारक यांच्यामधील वीज खरेदी करारास किंवा व्यवस्थेस मान्यता दिलेली असेल किंवा विद्यमान निर्मिती युनिट/केंद्राने पुरवठा करावयाच्या, अशा करारातील किंवा व्यवस्थेतील, विजेचा दर स्वीकारला असेल, तर, निर्मिती कंपनीने वितरण परवानाधारकाला पुरवठा करावयाचा विजेचा दर हा अशा वीज खरेदी करारात किंवा व्यवस्थेत नमूद केलेल्या वीज दरानुसार असेल व तो आयोगाने मान्यता दिलेल्या किंवा स्वीकारलेल्या कालावधीकरिता राहील;

१६.१.२ जर, या विनियमांच्या प्रभावी दिनांकाच्या दिवशी, विद्यमान निर्मिती केंद्राकडून विजेचा पुरवठा करण्यासाठी निर्मिती कंपनी आणि वितरण परवानाधारक यांच्यातील करार किंवा व्यवस्थेस जर, आयोगाने मान्यता दिलेली नसेल किंवा त्यामधील वीज दर जर आयोगाने स्वीकारलेला नसेल किंवा जर, कोणताही वीज खरेदी करार किंवा व्यवस्था करण्यात आलेली नसेल तर, अशा निर्मिती कंपनीने अशा वितरण परवानाधारकाला या विनियमांच्या प्रभावी दिनांकानंतर करावयाचा वीज पुरवठा हा आयोगाने या विनियमांच्या **भाग-डी** नुसार मान्यता दिलेल्या वीज खरेदी करारानुसार असेल;

परंतु असे की, अशा वीज खरेदी करारास किंवा व्यवस्थेस मान्यता देण्यासाठी वितरण परवानाधारक हे विनियम अधिसूचित झाल्याच्या दिनांकापासून तीन (३) महिन्यांच्या कालावधीच्या आत आयोगास अर्ज करेल;

परंतु आणखी असे की, सध्या प्रचलित असलेल्या करार किंवा व्यवस्थे अंतर्गत, जसे असेल तसे, वीज पुरवठा चालू राहू देण्यास परवानगी, अशा वीज खरेदी करारास आयोग मान्यता देईपर्यंत, देण्यात येईल आणि जर आयोगाने अशा करार किंवा व्यवस्थेस मान्यता दिली नाही तर, ज्याची कारणे लेखी नमूद करण्यात येतील, असा वीज पुरवठा लगेच खंडीत करण्यात येईल;

१६.२ <u>नवीन निर्मिती केंद्रे</u>

१६.२.१ निर्मिती केंद्राने वितरण परवानाधारकाला नवी निर्मिती युनिट/ केंद्रातील पुरवठा करावयाचा विजेचा दर हा आयोगाने मान्यता दिलेल्या वीज खरेदी करारातील वीज दरानुसार राहील. मात्र ही अट, अशा वीज खरेदी करारास अशी मान्यता घेण्याच्या आवश्यकतेमधून, या विनियमांच्या **भाग-डी** नुसार सूट देण्यात आली असेल तर त्याला, लागू राहणार नाही;

१६.३ <u>स्वतःची निर्मिती केंद्रे</u>

१६.३.१ जर वितरण परवानाधारक वीज निर्मितीचा देखील व्यवसाय करत असेल तर, वितरण परवानाधारकाच्या निर्मिती व्यवसायाकडून ज्या हस्तांतरण दराने किरकोळ पुरवठा व्यवसायाकरिता वीज देण्यात येत असेल तो दर आयोगाद्वारे निश्चित करण्यात येईल;

परंतु असे की, विजेच्या अशा पुरवठ्यासाठी हस्तांतरण दर ठरविताना आयोग या विनियमातील **भाग-ई** मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या अटी व शर्ती विचारात घेईल;

१६.३.२ वितरण परवानाधारक निर्मिती व्यवसायाकरिता वेगळे अभिलेखे आणि एक वाटप विवरणपत्र ठेवेल ज्यामुळे अशा व्यवसायाशी संबंधित प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष खर्च आणि अशा व्यवसायाला अनुसरुन गुंतविलेल्या भांडवलावरील परतावा स्पष्टपणे निश्चित करणे आयोगाला सुलभ होईल.

१६.४ वितरण परवानाधारक, निर्मिती व्यवसायाशी संबंधित या विनियमांतील भाग-ई नुसार आवश्यक माहितीसह, विजेच्या किरकोळ पुरवठ्यासाठी वीज दर निश्चित करण्याकरिता वेगळा अर्ज सादर करेल.

१६.५ या विनियम १६ मध्ये काहीही नमूद करण्यात आले असले तरी, केंद्र सरकारने पारित केलेल्या मार्गदर्शक सूचनांना अनुसरुन पारदर्शक बोली प्रक्रियेच्या माध्यमातून वीज दर निश्चित करण्यात आला असेल तर, निर्मिती कंपनीने वितरण परवानाधारकाला करावयाच्या विजेच्या पुरवठ्यासाठी आयोग असा वीज दर स्वीकारेल;

परंतु असे की, केंद्र सरकारने पारित केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे योग्यरित्या पालन केले असल्याबाबत आयोगाची खात्री पटण्याकरिता आयोगास आवश्यक वाटेल अशी माहिती अर्जदार पुरवेल.

## १७ पारेषण, वितरण वायर व्यवसाय आणि किरकोळ पुरवठ्यासाठी वीज दराचे निश्चितीक्रण

१७.१ आयोग, विनियम १७ मध्ये अंतर्भूत असलेल्या कार्यपधतीनुसार परवानाधारकाने पारेषण, वितरण वायर व्यवसाय आणि किरकोळ पुरवठ्यासाठी केलेल्या अर्जाच्या आधारे, वीज दर निश्चित करेल.

१७.२ आयोग खालील बाबींकरिता वीज दर निश्चित करेल-

(ए) विजेच्या पारेषणासाठी, या विनियमांतील **भाग-जी** मध्ये अंतर्भूत असलेल्या अटी व शर्तींनुसार;

(बी) वितरण वायर व्यवसायासाठी, या विनियमांतील **भाग-एच** मध्ये अंतर्भूत असलेल्या अटी व शर्तींनुसार; आणि

(सी) किरकोळ पुरवठा व्यवसायासाठी, या विनियमांतील **भाग-आय** मध्ये अंतर्भूत असलेल्या अटी व शर्तींनुसार.

१७.३ अर्जदार, त्याच्या मान्यताप्राप्त व्यवसाय आराखड्यावर आधारित, त्याच्या परवान्याच्या अटी व शर्तींच्या अनुषंगाने एकूण महसली गरजेच्या आणि वीज दर व आकारांपासून मिळणा-या अपेक्षित महसुलाच्या परिगणनेचा पूर्ण तपाशील, आयोगाने विनिर्दिष्ट केलेल्या नमुन्यात आयोगास वेळोवेळी पाठवेल आणि त्यानंतर, आयोगाचा सचिव किंवा या प्रयोजनासाठी आयोगाने पदनिर्देशीत केलेला अधिकारी अशा परिगणनेची पडताळणी करण्यासाठी वाजवीरित्या मागवेल अशी आवश्यक आणखी माहिती किंवा तपशील किंवा दस्तऐवज अर्जदार सादर करेल.

परंतु असे की, अर्जासोबत, सुसंबध्द असल्यास, नियंत्रण कालावधीतील प्रत्येक वर्षाकरिता, वीज दराचा सविस्तर सुधारित प्रस्ताव, ज्यात वर्गवारी-निहाय वीज दर आणि एकूण महसुली गरतेतील तूट, अस्लयास, ती कशा रितीने सुधारित वीज दरामुळे भरुन निघू शकेल ते दाखविण्यात आले असेल, पाठविण्यात येईल.

परंतु आणखी असे की, एकूण महसुली गरजेची पडताळणी आणि वीज दर निश्चित करण्यासाठी, त्यास वाजवीरित्या आवश्यक वाटेल असा तपशील अर्जदाराने वेळोवेळी सादर करण्याकरिता आयोग, अतिरिक्त/पर्यायी नमुने विनिर्दिष्ट करु शकेल.

१७.४ या विनियमांत विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या सर्व आवश्यकतांची पूर्तता करणारी सर्व आवश्यक माहिती, तपशील व दस्तऐवजांसह परिपूर्ण अर्ज मिळाल्यानंतर, अर्ज प्राप्त झाला अहे असे मानण्यात येईल आणि आयोग, किंवा सचिव, किंवा पदनिर्देशित अधिकारी अर्ज प्रकाशनासाठी तयार असल्याबाबत अर्जदाराला कळवेल.

१७.५ वरील विनियम १७.४ प्रमाणे कळविण्यात आल्यानंतर तीन (३) दिवसांच्या आत, अर्जदार, अर्जाशी संबंधित असलेल्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर खप असणा-या दोन (२) इंग्रजी व दोन (२) मराठी भाषेतील वर्तमान-पत्रांमध्ये एक नोटीस प्रसिध्द करेल ज्यामध्ये प्रस्तावित वीज दर आणि आयोगाकडून ठरवून देण्यात येतील अशा अन्य बाबी नमूद करुन जनतेकडून हरकती मागविण्यात येतील;

परंतु असे की, आयोगाकडून ठरवून देण्यात येतील अशा ठिकाणी व दराने, स्वारस्य असणा-या कोणत्याही व्यक्ती/संस्थेला संपूर्ण अर्जाची एक प्रत अर्जदार उपलब्ध करुन देईल;

परंतु असे की, अर्जदार, आयोगाने ठरवून दिलेल्या पध्दतीनुसार, उतरवून घेण्याच्या सुपरशीट स्वरुपात त्याच्या संकेत-स्थळावर, आयोगाला सादर केलेला अर्ज त्यासोबतच्या सर्व नियामक माहिती, तपशील व दस्तऐवज व परिगणनेच्या तपशीलासह, प्रदर्शित करेल;

परंतु आणखी असे की, विनियम १७.५ च्या दुस-या परंतुकात उल्लेख केलेल्या माहितीकरिता देण्यत आलेली वेब-लिंक ही सहजपणे मिळण्यासारखी आणि माहिती उतरवून घेण्याच्या सुविधेने युक्त असावी आणि ती अर्जदाराच्या संकेत-स्थळावर ठळकपणे प्रदर्शित करण्यात येईल.

परंतु तथापि असे की, अर्जदार, गोपनीय स्वरुपाची असणारी कोणतीही माहिती, तपशील किंवा दस्तऐवज, आयोगाच्या पूर्व-समतीने, देणार नाही किंवा प्रदर्शित करणार नाही.

स्पष्टीकरणः या विनियमाच्या प्रयोजनार्थ, ‘‘उतरवून घेण्याच्या सुपरशीट स्वरुपात’’ म्हणजे एक (किंवा बहुविध, लिंक दिलेली) सुपरशीट सॉफ्टवेअर धारिका ज्यामध्ये अर्जाचा आधार असलेली सर्व गृहिते, सूत्रे, परिगणना, सॉफ्टवेअर मॅक्रोज व आऊटपुट्स यांचा समावेश असेल.

१७.६ अर्जदार, आयोगाला वीज दर निश्चित करण्यासाठी आवश्यक असलेली सर्व पुस्तके आणि अभिलेखे (किंवा त्यांच्या प्रमाणित सत्य प्रती) व त्यासह लेखा विवरणपत्रे, कामकाज आणि खर्चाची माहिती, आयोगाला सादर करेल.

१७.७ आयोग, जर त्यास आवश्यक वाटेल तर, कोणत्याही व्यक्तीला, कोणत्याही वेळी, आयोगाला अर्जदाराकडून सादर करण्यात येणाऱ्या माहितीसह अशी पुस्तके आणि अभिलेख्यांचे उतारे (किंवा त्यांच्या प्रमाणित सत्य प्रती), वेळोवेळी सुधारणा करण्यात आलेल्या मविनिआ (कामकाज प्रचालन) विनियम २००४ मध्ये आयोगाने विनिर्दिष्ट केलेल्या अटी व शर्तीवर, उपलब्ध करेल किंवा उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करेल.

१७.८ विनियम १७ मध्ये अंतर्भूत असलेल्या कार्यपध्दतीच्या **बाजू,** खाली नमूद केलेल्या बाबींच्या संदर्भात प्रत्येक प्रकरणातील परिस्थिती, विचारात घेऊन आयोगास आवश्यक वाटेल त्या मर्यादेपर्यंत, लागू राहतीलः-

(ए) अधिनियमाच्या कलम ३६च्या उप-कलम (१) च्या परंतुकाखाली, परवानाधारकाने केलेला अर्ज;

(बी) अधिनियमाच्या कलम ६४च्या उप-कलम (५) च्या परंतुकाखाली वितरण परवानाधारकाने केलेला अर्ज;

## १८ वीज दराच्या निश्चितीकरणासाठी अर्ज करण्याची कालमर्यादा

१८.१ १ एप्रिल, २०११ ते ३१, मार्च २०१६ या दुसऱ्या नियंत्रण कालावधीकरिता बहु-वर्षीय वीज दराच्या चौकटीखाली, वीज दराच्या निश्चितीकरणासाठी अर्ज, आर्थिक वर्ष २०११-२०१२ ची सुरुवात होण्यापूर्वी एकशे वीस (१२०) दिवस **आधी,** आयोगाकडे सादर करण्यात येईल.

१८.२ १ एप्रिल, २०११ ते ३१, मार्च २०१६ या दुसऱ्या नियंत्रण कालावधीकरिता बहु-वर्षीय वीज दराच्या चौकटीखाली, कामगिरीच्या मध्यावधी आढाव्यासाठी अर्ज, आर्थिक वर्ष २०१४-२०१५ ची सुरुवात होण्यापूर्वी एकशे वीस (१२०) दिवस **आधी,** आयोगाकडे सादर करण्यात येईल.

## १९ वीज दराचा आदेश

१९.१ आयोग, परीपूर्ण अर्ज प्राप्त झाल्यापासून एकशे वीस (१२०) दिवसांच्या आत आणि जनतेकडून आलेल्या सूचना आणि हरकती विचारात घेऊनः-

(ए) अर्जाचा स्वीकार करुन आदेशात विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या फेरबदलांसह किंवा शर्तींवर, वीज दराचा आदेश पारित करेल; किंवा

(बी) अधिनियम आणि त्या खाली करण्यात आलेल्या नियम आणि विनियमातील तरतुदींनुसार किंवा त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यातील तरतुदींना अनुसरुन जर अर्ज नसेल तर, त्या संबंधीची कारणे लेखी नमूद करुन, अर्ज नामंजूर करेल;

परंतु असे की, अर्ज नामंजूर करण्यापूर्वी अर्जदाराला त्याची बाजू मांडण्याची योग्य संधी देण्यात येईल.

१९.२ अर्जदार, त्याच्या पुरवठ्याच्या क्षेत्रात मोठा खप असणाऱ्या कमीत कमी दोन (२) इंग्रजी आणि दोन (२) मराठी भाषेतील वर्तमानपत्रांमध्ये, आयोगाने मान्यता दिलेला वीज दर, प्रसिध्द करेल आणि मान्यताप्राप्त वीज दर/वीज दराची अनुसूची त्याच्या संकेत-स्थळावर प्रदर्शित करेल व असा वीज दर किंवा असे वीज दर, जसे असेल तसे, असणारे पुस्तक, छापण्यासाठी आलेला खर्च देणाऱ्या, कोणत्याही व्यक्तीला उपलब्ध करुन देईल;

परंतु असे की, अर्जदार जर निर्मिती कंपनी असेल तर, वीज दराच्या आदेशाच्या संदर्भात ज्या वितरण परवानाधारकाला विजेचा पुरवठा करण्याचे प्रस्तावित करण्यात आलेले असेल अशा वितरण परवानाधारकाच्या पुरवठ्याच्या क्षेत्रात मोठा खप असणाऱ्या वर्तमानपत्रांमध्ये वीज दर प्रसिध्द करण्यात येईल आणि वीज दर वितरण परवानाधारकाच्या संकेत-स्थळावर देखील प्रदर्शित करण्यात येईल.

१९.३ प्रसिध्द करण्यात आलेला वीज दर, आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकापासून अंमलात येईल आणि, त्यात सुधारणा केली किंवा रद्द केला नसल्यास, तो आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीकरिता अंमलात राहील.

## २० वीज दराच्या आदेशाचे पालन

२०.१ विनियम १२ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या झेड-घटक अधिभाराखाली विनिर्देशपूर्वक अनुज्ञेय असलेल्या कोणत्याही आकारांव्यतिरिक्त, नियंत्रण कालावधीत एकापेक्षा अधिक वेळा कोणत्याही वीज दरामध्ये किंवा वीज दराच्या भागात सर्वसाधारणपणे सुधारणा करता येणार नाही.

२०.२ आयोग, वीज दरात सुधारणा करण्यास, त्या बाबतच्या कारणांमुळे स्वतःची खात्री झाल्यानंतर अशी कारणे लेखी नमूद करुन, परवानगी देऊ शकेल.

२०.३ अधिनियमाच्या कलम ६२ अंतर्गत आणि या विनियमांना अनुसरुन निश्चित करण्यात आलेल्या वीज दरापेक्षा, जास्त किंमत किंवा आकार कोणत्याही निर्मिती कंपनी किंवा पारेषण परवानाधारक किंवा वितरण परवानाधारकाने वसूल केला तर, निर्मिती कंपनी किंवा पारेषण परवानाधारक किंवा वितरण परवानाधारकाच्या अन्य कोणत्याही दायित्वांना बाधा न येऊ देता, ज्या व्यक्तिने अशी किंमत किंवा आकार अदा केला असेल त्याची होणारी जादा रक्कम भारतीय रिझर्व्ह बँकेच्या व्याज दरानुसार सदर व्यक्तीला देय राहील.

२०.४ आयोगाला त्याच्या आदेशाच्या अंमलबजाणीचे संनियंत्रण करणे शक्य व्हावे यासाठी कामकाज आणि खर्चाची माहिती असणारे नियतकालिक विवरण-पत्र पारेषण परवानाधारक किंवा वितरण परवानाधारक आयोगास पाहिजे असेल तेव्हा सादर करेल.

## भाग - डी : वीज खरेदी आणि प्राप्त करुन घेणे

## २१ व्याप्ती

२१.१ या भागात अंतर्भूत असलेले विनियम, वितरण परवानाधारकाने राज्यात विजेचे वितरण आणि पुरवठा करण्यासाठी करार करुन किंवा व्यवस्था करुन निर्मिती कंपनी किंवा वीज व्यापार परवानाधारक किंवा वितरण परवानाधारकाकडून किंवा अन्य कोणत्याही स्त्रोताकडून करावयाच्या वीज खरेदीला आणि वीज प्राप्तीला, लागू राहतील.

## २२ वीज प्राप्त करुन घेण्यासाठी मार्गदर्शक सूचना

२२.१ वितरण परवानाधारक, नियंत्रण कालावधीकरिता वीज प्राप्त करुन घेण्याच्या योजनेनुसार संबंधित वर्षात वीज प्राप्त करुन घेईल. या योजनेत, आयोगाने या विनियमांना अनुसरुन मान्यता दिलेल्या दीर्घ-कालीन, **मध्यम-कालीन** किंवा अल्प-कालीन वीज प्राप्तीचा समावेश असू शकेल.

२२.२ वितरण परवानाधारक, खालील बाबींच्या संदर्भात, या भागात अंतर्भूत असलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करेलः-

(ए) सात वर्षे परंतु पंचवीस वर्षांपेक्षा (म्हणजेच दीर्घ-कालीन वीज प्राप्ती) जास्त नसलेल्या मुदत किंवा कालावधीचा करार किंवा व्यवस्था करुन वीज प्राप्ती करुन घेणे;

(बी) एक वर्ष परंतु सात वर्षांपेक्षा (म्हणजेच **मध्यम-कालीन** वीज प्राप्ती) जास्त नसलेल्या मुदत किंवा कालावधीचा करार किंवा व्यवस्था करुन वीज प्राप्ती करुन घेणे; आणि

(सी) एक वर्ष किंवा त्यापेक्षा कमी असणा-या मुदत किंवा कालावधीचा(म्हणजेच अल्प-कालीन वीज प्राप्ती) करार किंवा व्यवस्था करुन वीज प्राप्ती करुन घेणे.

## २३ वीज प्राप्तीची योजना

२३.१ वितरण परवानाधारक त्याच्या पुरवठ्याच्या क्षेत्रातील विजेची मागणी पूर्ण करण्यासाठी वीज प्राप्त करुन घेण्याची एक पंच-वार्षिक योजना तयार करेल आणि आयोगास मंजूरीसाठी सादर करेल.

परंतु असे की, ही पंच-वार्षिक वीज प्राप्तीची योजना १ एप्रिल २०११ रोजी सुरु होणा-या दुस-या नियंत्रण कालावधीकरिता सादर करण्यात येईल;

परंतु आणखी असे की, व्यवसाय आराखड्याचा एक भाग म्हणून मान्यता दिलेली सदर वीज प्राप्तीची योजना, या विनियमातील **भाग बी** नुसार वीज दर निश्चित करण्यासाठीच्या अर्जासह सादर करण्यात येईल; आणि

परंतु असे की, वितरण परवानाधारकाने सादर केलेल्या वीज प्राप्तीच्या योजनेमध्ये, या विनियमानुसार, दीर्घ-कालीन, **मध्यम-कालीन** आणि अल्प-कालीन वीज प्राप्त करुन घेण्याच्या विजेच्या स्रोतांचा समावेश असेल.

२३.२ वितरण परवानाधारकाच्या वीज प्राप्तीच्या योजनेमध्ये खालील बाबींचा समावेश असेलः-

(ए) नियंत्रण कालावधीकरिता त्याच्या पुरवठ्याच्या क्षेत्रातील प्रत्येक वर्गवारीच्या विजेच्या अनिर्बंध मागणीचे संख्यात्मक पूर्व-अनुमान;

(बी) निश्चित केलेल्या निर्मिती आणि वीज खरेदीच्या स्रोतांकडून होऊ शकणाऱ्या वीज पुरवठ्याच्या परिमाणांचा अंदाज;

(सी) बेस लोड आणि पीक लोडमधील विजेची मागणी पुरी करण्यासाठी विजेच्या उपलब्धतेचा अंदाज;

परंतु असे की, मासिक विजेची मागणी व पुरवठ्याचा अंदाज, मेगावॅटमध्ये त्याचप्रमाणे दशलक्ष युनिट (एमयु)मध्ये देखील दाखवण्यात येईल.

(डी) वेळोवेळी सुधारणा केलेल्या मविनिआ (वितरण परवानाधारकांच्या कृतीची मानके, विद्युत पुरवठा सुरु करावयाचा कालावधी आणि भरपाईचे निश्चितीकरण) विनियम, २००५ नुसार, विजेची गुणवत्ता आणि भरवशाच्या पुरवठ्यासाठी पालन करावयाची मानके;

(इ) ऊर्जेची बचत आणि **ऊर्जा कार्यक्षमतेसाठी** अंमलात आणावयाच्या प्रस्तावित उपाय-योजना;

(एफ) वीज निर्मिती किंवा प्राप्तीसाठी नवीन स्रोतांची गरज यासह निर्मिती क्षमतेत वाढ आणि वीज पुरवठ्यासाठी निश्चित केलेले नवीन स्रोत;

(जी) वीज प्राप्त करुन घेण्याची योजना- परिमाण आणि अंदाजित खर्चासह;

परंतु असे की, दीर्घ-कालीन वीज प्राप्तीच्या योजनेतील पूर्व अनुमान/अंदाज हे सर्वोच्च मागणी असलेल्या आणि सर्वोच्च मागणी नसलेल्या कालावधीसाठी वेगवेगळे, प्राप्त करुन घेतलेल्या विजेचे परिमाण (दशलक्ष युनिट किंवा एमयुमध्ये) आणि कमाल मागणी (मेगावॅट/ एमव्हीए मध्ये) प्रमाणे, नमूद करण्यात येतील;

परंतु आणखी असे की, हे पूर्व-अनुमान/अंदाज नियंत्रण कालावधीतील प्रत्येक महिन्यासाठी तयार करण्यात येतील.

परंतु असेही की, दीर्घ मुदतीची वीज प्राप्तीची योजना ही वीज पुरवठ्याच्या विविध स्त्रोतांच्या खर्चासंबंधी उपलब्ध असलेल्या माहितीवर आधारित, कमी-खर्चाची योजना असेल;

स्पष्टीकरण - या विनियमाच्या प्रयोजनासाठी, 'सर्वोच्च मागणीचा कालावधी' म्हणजे चोवीस (२४) तासांच्या कालावधीतील सतत तीन (३) तासांच्या कालावधीचा एक गट ज्यामध्ये वितरण परवानाधारकाची विजेची सर्वोच्च मागणी समाविष्ट असेल.

(एच) प्रस्तावित केलेली अल्प-कालीन वीज प्राप्तीची योजना या विनियमांतील विनियम ९२ नुसार असेल.

२३.३ पूर्व-अनुमान/अंदाज हे मागील कालावधीतील माहिती व भावी काळाबद्दलच्या वाजवी गृहितांवर आधारित पूर्व-अनुमान काढण्याच्या पध्दतीचा उपयोग करुन तयार करण्यात येतील.

परंतु असे की, पूर्व-अनुमान/अंदाज तयार करताना एकूण आर्थिक वाढ, प्रामुख्याने विजेचा वापर करणाऱ्या क्षेत्रातील विजेच्या वापरातील वाढ, वीज उद्योगात स्पर्धेची सुरुवात, स्व-वापरासाठीच्या वीज निर्मितीमधील **बदल,** हानि कमी करण्यासाठी घेतलेल्या पुढाकारांचा परिणाम, विद्युत निर्मिती केंद्रातील प्लॅण्ट लोड फॅक्टरमध्ये सुधारणा आणि अन्य संबंधित घटकांचा विचार करण्यात येईल.

२३.४ वितरण परवानाधारकाच्या विजेच्या एकूण वापरापैकी सह-निर्मितीच्या वीज प्रकल्पांकडून आणि नूतनशील ऊर्जा स्त्रोतांकडून वीज खरेदी करण्याची टक्केवारी जर आयोगाने विनिर्दिष्ट केली असेल तर, वितरण परवानाधारकाच्या वीज प्राप्तीच्या योजनेत अशा स्त्रोतांकडून, निदान ठरवून देण्यात आलेल्या पातळीपर्यंत वीज प्राप्त करुन घेण्याची योजना समाविष्ट असेल.

२३.५ वेळोवेळी सुधारणा केलेल्या मविनिआ (पारेषण मुक्त प्रवेश) विनियम २००५ नुसार तयार करण्यात आलेल्या राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेसाठीच्या पारेषण यंत्रणा आराखड्याशी वितरण परवानाधाराने सादर केलेली वीज प्राप्तीची योजना **सुसंगत** आहे किंवा नाही हे पडताळण्यासाठी आयोग, वितरण परवानाधारकाने सादर केलेल्या वीज प्राप्तीच्या योजनेची, प्रत राज्य पारेषण कंपनीकडे पाठवेल;

परंतु असे की, वितरण परवानाधारक, त्याची वीज प्राप्तीची योजना तयार करताना अशी योजना पारेषण यंत्रणा आराखड्याशी **सुसंगत** राखण्यासाठी राज्य पारेषण कंपनीचा स्वतंत्रपणे सल्ला घेऊ शकेल.

२३.६ वितरण परवानाधारक , त्याची वीज प्राप्तीची योजना विनियम २३.१ नुसार सादर करताना अतिरिक्त माहिती माहित नसल्यामुळे किंवा ती उपलब्ध नसल्यामुळे, विनियम १० खाली कामगिरीच्या मध्यावधी आढाव्याचा एक भाग म्हणून, नियंत्रण कालावधीच्या उरलेल्या मुदतीकरिता, त्याच्या वीज प्राप्तीच्या योजनेत फेरबदल करण्यासाठी आयोगाकडे, अर्ज सादर करु शकेल;

परंतु असे की, वितरण परवानाधारकास त्याच्या वीज प्राप्तीच्या योजनेत या विनियमानुसार नियंत्रण कालावधीत एकापेक्षा **अधिक वेळा**, म्हणजेच कामगिरीच्या मध्यावधीच्या आढाव्या वेळी, फेरबदल करण्यास मुभा देण्यात येणार नाही.

२३.७ वितरण परवानाधारकास त्याची वीज प्राप्तीची योजना विनियम २३.१ नुसार सादर करताना अतिरिक्त माहिती नसल्यामुळे किंवा उपलब्ध नसल्यानुळे आयोग, त्यास उचित वाटल्यास, स्वतःहून किंवा स्वारस्य असलेल्या किंवा बाधित व्यक्तिकडून अर्ज प्राप्त झाल्यावर, कामगिरीच्या मध्यावधी आढाव्याचा एक भाग म्हणून नियंत्रण कालावधीच्या उरलेल्या मुदतीकरिता, वितरण परवानाधारकाच्या वीज प्राप्तीच्या योजनेत फेर-बदल करु शकेल;

परंतु असे की, आयोग, वीज प्राप्तीच्या योजनेत या विनियमानुसार नियंत्रण कालावधीत एकाहून **अधिक वेळा** बदल करु शकणार नाही.

२३.८ वितरण परवानाधारकाच्या वीज प्राप्तीच्या योजनेचा किंवा त्यात प्रस्तावित करण्यात आलेल्या कोणत्याही फेर-बदलांचा आढावा आयोग घेईल आणि असा आढावा पूर्ण केल्यानंतर आयोग -

(ए) वीज प्राप्तीच्या योजनेस किंवा त्यातील फेरबदलांना, आयोगास उचित वाटतील अशा बदलांसह व शर्तींवर, मंजूरीचा आदेश काढेल; किंवा

(बी) जर योजना या भागात असणाऱ्या मार्गदर्शक सूचनांना अनुसरुन नसेल तर त्यासंबंधीची कारणे लेखी नमूद करुन, वीज प्राप्तीची योजना किंवा त्यात फेरबदल करण्याचा अर्ज, नामंजूर करेल आणि विनिर्दिष्ट केलेल्या बाबींचा विचार करुन सुधारित योजना सादर करण्यास वितरण परवानाधारकास निर्देश देईल;

परंतु असे की, वीज प्राप्तीची योजना नामंजूर करण्यापूर्वी वितरण परवानाधारकास त्याची बाजू मांडण्याची वाजवी संधी देण्यात येईल.

## २४ वीज खरेदी करारास/ व्यवस्थेस मान्यता

२४.१ या विनियमांच्या **प्रभावी** दिनांकानंतर वितरण परवानाधारकाने निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक किंवा अन्य पुरवठ्याच्या स्त्रोतांकडून वीज प्राप्तीसाठी केलेला प्रत्येक करार किंवा व्यवस्था फक्त आयोगाच्या पूर्व-मान्यतेनेच अंमलात येईल;

पंरतू असे की, वितरण परवानाधारकाने निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक किंवा अन्य कोणत्याही पुरवठ्याच्या स्त्रोतांकडून **स्टँडबाय तत्त्वावर** वीज प्राप्त करुन घेण्यासाठी केलेल्या करारास किंवा व्यवस्थेस विनियम २४ नुसार आयोगाची पूर्व-मान्यता लागेल;

परंतू आणखी असे की, प्रचलित करार किंवा व्यवस्थेला आयोगाने मान्यता दिलेली असली किंवा नसली तरी देखील वीज प्राप्तीसाठी केलेल्या प्रचलित करार किंवा व्यवस्थेमध्ये कोणत्याही बदलाला देखील विनियम २४ नुसार आयोगाची पूर्व-मान्यता लागेल;

२४.२ आयोग, वीज खरेदी कराराच्या/व्यवस्थेसाठी आलेल्या अर्जाचा आढावा घेताना, वितरण परवानाधारकाची मान्यता दिलेली वीज प्राप्ती योजना आणि खालील घटक विचारात घेईल :

(ए) मान्यता दिलेल्या वीज प्राप्ती योजनेखालील वीज प्राप्तीची गरज;

(बी) केंद्र शासनाने पारित केलेल्या मार्गदर्शक सूत्रानुसार पारदर्शक बोली प्रक्रियेचे पालन;

(सी) जर वरील (बी) येथे विनिर्दिष्ट केलेली प्रक्रिया स्वीकारण्यात आलेली नसेल तर या विनियमाच्या भाग ई मध्ये वीज दर निश्चितीकरणासाठी विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या अटी व शर्तींचे पालन;

(डी) करार/व्यवस्थेखाली प्राप्त केलेल्या विजेच्या वहनासाठी आणि पुरवठ्यासाठी राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेच्या क्षमतेची उपलब्धता (किंवा अपेक्षित उपलब्धता);

(इ) सह-निर्मितीस आणि नूतनशील उर्जा स्त्रोतांवर आधारित वीज निर्मितीस प्रोत्साहन देण्याची गरज;

२४.३ जर या विनियमांच्या भाग ई मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या अटी व शर्ती स्वीकारण्याचे प्रस्तावित करण्यात आले असेल तर, नवीन निर्मिती स्त्रोताकडून विजेच्या पुरवठ्यासाठी निर्मिती कंपनी आणि वितरण परवानाधारक यांच्यातील वीज खरेदी करारास, अर्जदाराची इच्छा असल्यास, खालील दोन टप्प्यात मान्यता देता येईल :

(ए) खालील खंड (बी) नुसार केलेल्या अर्जापूर्वी आयोगाकडे कोणत्याही वेळी करण्यात आलेल्या अर्जाच्या आधारे तात्पुरत्या वीज दरास मान्यता; आणि

(बी) मर्यादा दिनांकापासून तीन (३) महिन्यांपेक्षा जास्त नसलेल्या कालावधीत, अर्जदाराने केलेल्या अर्जाच्या आधारे अंतिम वीज दरास मान्यता.

## २५ अतिरिक्त अल्प-कालीन वीज प्राप्ती

२५.१ वितरण परवानाधारक, आयोगाने नियंत्रण कालावधीकरीता मान्यता दिलेल्या वीज प्राप्ती पेक्षा जास्त, अतिरिक्त अल्प-कालीन वीज प्राप्ती संबंधीत वर्षात, या विनियमाना अनुसरुन, करुन घेऊ शकेल.

२५.२ जर कोणत्याही मान्यताप्राप्त पुरवठ्याच्या स्त्रोताकडून आर्थिक वर्षात विजेचा पुरवठा करण्यात तूट आल्यास किंवा अपयश आल्यास, वितरण परवानाधारक वीज प्राप्ती करुन घेण्यासाठी अतिरिक्त अल्प-कालीन व्यवस्था किंवा करार करु शकेल (अल्प-कालीन म्हणजे एक वर्षाच्या कालावधी पर्यंत);

परंतू असे की, सहा महिन्यांच्या कोणत्याही गटासाठी अशा अल्प-कालीन वीज प्राप्तीसह वीज खरेदीवरील खर्च, आयोगाने संबंधीत सहा महिन्याच्या गटाकरीता मान्यता दिलेल्या वीज खरेदी खर्चापेक्षा १०५ टक्क्याहून जास्त होत असेल, तर वितरण परवानाधारकाला त्यासाठी आयोगाची पूर्व-मान्यता घ्यावी लागेल; आणि

परंतू असे की, प्रस्तावित अल्प-कालीन वीज प्राप्ती या विनियमांच्या विनियम ९२ नुसार करण्यात येईल;

२५.३ वितरण परवानाधारकाने जर अल्प-कालीन विजेच्या पुरवठ्यासाठी नवीन स्त्रोत शोधला असेल ज्याच्याकडून करावयाच्या वीज प्राप्तीच्या दरामुळे जर परवानाधारकाच्या मान्यता दिलेल्या वीज प्राप्तीचा खर्च कमी होणार असेल तर,

वितरण परवानाधारक आयोगाच्या पूर्व-मान्यतेशिवाय अल्प-कालीन वीज प्राप्तीसाठी अशा पुरवठादाराबरोबर करार/ व्यवस्था करु शकेल;

२५.४ वितरण परवानाधारक, जर वितरण यंत्रणेच्या स्थैर्याला धोका निर्माण करणारी आणीबाणीची परिस्थिती निर्माण झाली असेल किंवा ग्रीड बंद पडू नये यासाठी तसे करण्यास राज्य भार प्रेक्षण केंद्राने निर्देश दिले असतील तर, आयोगाच्या पूर्व-मान्यतेशिवाय अल्प-कालीन वीज प्राप्तीसाठी करार किंवा व्यवस्था, करु शकेल;

२५.५ आयोगाच्या अल्प-कालीन वीज प्राप्तीसाठी केलेल्या व ज्यास आयोगाच्या पूर्व-मान्यतेची गरज नसेल अशा केलेल्या करार/व्यवस्थेच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत, वितरण परवानाधारक, या विनियम २५ मधील विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या शर्तींची पूर्तता झाली आहे किंवा नाही याची पडताळणी करणे आयोगास शक्य व्हावे यासाठी, अशा करार/व्यवस्थेचा संपूर्ण तपशील म्हणजेच परिमाण, दराची परिगणना, कालावधी, पुरवठादाराचा तपशील, पुरवठादाराच्या निवडीची पद्धत आणि आयोगाला हवा असेल असा अन्य तपशील, आयोगाला पाठवेल;

२५.६ वरील विनियम २५.२ ते २५.४ मधे विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या निकषांची पूर्तता वितरण परवानाधारकाने करार किंवा व्यवस्था करताना केली नसल्याबाबत आयोगाची पुरेशी खात्री झाली असेल तर, वीज प्राप्तीसाठी मान्यता दिलेल्या खर्चापेक्षा झालेल्या जादा खर्चास (निव्वळ अतिरिक्त **महसूल**) किंवा वितरण परवानाधारकाला झालेला तोटा, ग्राहकांकडून वसूल करण्यास आयोग परवानगी देणार नाही;

२५.७ विनियम २५.२ ते २५.४ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रकरणांना अधीन राहून, जेथे आयोगाच्या पूर्व-मान्यतेशिवाय वितरण परवानाधारकाने अल्प-कालीन वीज प्राप्तीसाठी करार किंवा व्यवस्था केलेली आहे, वीज प्राप्तीच्या मान्यता दिलेल्या एकूण खर्चात झालेली कोणतीही वाढ (निव्वळ अतिरिक्त **महसूल**) ही पूर्णतः नियंत्रणाधीन असलेल्या घटकांमुळे कामगिरीत झालेली तफावत म्हणून मानण्यात येईल;

## भाग-ई : वित्तीय तत्त्वे

## २६ भांडवली खर्च आणि भांडवल रचना

२६.१ प्रकल्पाच्या भांडवली खर्चात खालील बाबींचा समावेश असेल :

(ए) प्रकल्पाचे कामकाज वाणिज्यिकरित्या सुरु होण्याच्या दिनांकापर्यंत- केलेला किंवा प्रस्तावित केलेला खर्च, बांधकामाच्या कालावधीतील व्याज आणि भांडवल उभारणीवरील व्याज, बांधकाम चालू असतानाच्या कालावधीत परकीय चलनातील जोखिमेतील तफावतीमुळे झालेला फायदा किंवा तोटा, ज्यांना आयोगाने, **आवश्यक छाननी नंतर,** मान्यता दिलेली असेल;

(बी) या विनियमात विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या मर्यादा दराना अधीन राहून भांडवलीकृत केलेले सुटे भाग; आणि

(सी) विनियम २८ खाली निश्चित केलेला अतिरिक्त भांडवली खर्च;

परंतु असे की, प्रकल्पाचा भाग असलेल्या मत्ता परंतु ज्या वापरात आणलेल्या नाहीत किंवा ज्या वापरात नाहीत, त्यांच्यावरील खर्च भांडवली खर्चातून वगळण्यात येईल;

२६.२ आयोगाने **आवश्यक छाननी करुन** मान्यता दिलेला भांडवली खर्च हा वीज दराच्या निश्चिती करणासाठी आधारभूत राहील;

परंतु असे की, **आवश्यक छाननी** मध्ये भांडवली खर्चाचा वाजवीपणा, योजनेसाठी लागणाऱ्या भांडवलाची उभारणी, बांधकामाच्या कालावधीतील व्याज, कार्यक्षम तंत्रज्ञानाचा वापर, झालेला जादा खर्च आणि लागलेला जादा वेळ, आणि आयोगाने वीज दराच्या निश्चितीसाठी विचारात घेतलेल्या अन्य बाबींचा समावेश असेल;

२६.३ वीज दराच्या निश्चितीसाठी मान्यता दिलेला भांडवली खर्च विचारात घेण्यात येईल आणि प्रकल्प खर्चातील कोणत्याही वाढीसाठी पुरेसे समर्थन देण्यात आले तर आयोगाकडून असा खर्च देखील **आवश्यक छाननीस** अधिन राहून विचारात घेण्यात येईल;

परंतु असे की, जर मान्यता दिलेल्या भांडवली खर्चापेक्षा प्रत्यक्ष भांडवली खर्च कमी झाला असेल तर वीज निर्मिती कंपनीच्या किंवा परवानाधारकाच्या दराच्या निश्चितीसाठी प्रत्यक्ष झालेला भांडवली खर्च विचारात घेण्यात येईल.

२६.४ कंपनीच्या लेखापरिक्षित लेख्यांवर आधारित कामाच्या मुळ व्याप्तीकरिता कामकाज सुरु झाल्याच्या दिनांकापर्यंतचा प्रत्यक्ष भांडवली खर्च जो मुळ खर्चाच्या रक्कमेशी मर्यादित असेल तो आयोगाकडून **आवश्यक छाननीस** अधीन राहून विचारात घेण्यात येईल.

२६.५ जर वीज खरेदी करार किंवा ठोक वीज पारेषण करारामध्ये भांडवली खर्चावरील मर्यादेसाठी तरतूद करण्यात आलेली असेल तर विचारात घ्यावयाचा भांडवली खर्च या मर्यादेपेक्षा अधिक असणार नाही.

२६.६ भांडवली खर्चामध्ये जास्तीत जास्त पाच वर्षातील कामकाजाकरीता भांडवलीकृत करण्यात आलेल्या सुरुवातीच्या सुट्या भागांचा खालील प्रमाणे समावेश असेल -

(ए) कोळशावर आधारित/लिग्नाइटवर चालणाऱ्या निर्मिती केंद्रांच्या बाबतीत- मूळ भांडवली खर्चाच्या २.५ % पर्यंत;

(बी) गॅस-टर्बाइन/कम्बाइन्ड सायकल निर्मिती केंद्रांच्या बाबतीत-मूळ भांडवली खर्चाच्या ४.० % पर्यंत;

(सी) जल-विद्युत निर्मिती केंद्राच्या बाबतीत- मूळ भांडवली खर्चाच्या १.५ % पर्यंत;

(डी) पारेषण परवानाधारकाच्या बाबतीत-मूळ भांडवली खर्चाच्या १.५ % पर्यंत;

२६.७ आयोगाकडून करण्यात येणारी खर्चाच्या अंदाजांची छाननी ही भांडवली खर्चाचा वाजवीपणा, योजनेसाठी लागणाऱ्या भांडवलाची उभारणी, बाधंकामाच्या कालावधीतील व्याज, कार्यक्षम तंत्रज्ञानांचा वापर आणि वीज दर निश्चितीसाठी अशा अन्य बाबी, यांच्या पुरती मर्यादित राहील;

२६.८ नियंत्रण कालावधीत मत्तांचे पुनर्मुल्यांकन करण्यास, जर त्याचा वीज दरावर विपरित परिणाम होणार नसेल तर, परवानगी देण्यात येईल. अशा पुनर्मुल्यांकनामुळे होणारा कोणताही फायदा, निर्मिती कंपनीच्या बाबतीत क्षमता आकार **देणाऱ्या** व्यक्तींना आणि पारेषण परवानाधारक किंवा वितरण परवानाधारकाच्या दीर्घ-कालीन राज्यांतर्गत मुक्त प्रवेश ग्राहक किंवा वितरण परवानाधारकाच्या बाबतीत किरकोळ पुरवठा ग्राहक यांना, कामगिरीच्या मध्यावधी आढाव्याच्या वेळी आणि दुसऱ्या नियंत्रण कालावधीचे अंतीम अचूक समायोजन करण्याच्या वेळी, देण्यात येईल.

२६.९ जुन्या स्थिर मत्तांचे नुतनीकरण आणि आधुनिकीकरण किंवा त्यांचे आर्युमान वाढवण्यावर किंवा त्यांच्या बदली दुसरी मत्ता घेण्यावर झालेला कोणताही खर्च, जो निर्मिती कंपन्या आणि परवानाधारकांना लागू असेल, अशा बदली केलेल्या मत्तेचे निव्वळ मूल्य मूळ भांडवली खर्चातून निर्लेखित केल्यानंतर, विचारात घेण्यात येईल आणि त्याची परिगणना खालील प्रमाणे करण्यात येईल;

Net Value of Replaced Assets = OCFA – AD – CC;

Where;

OCFA: बदली केलेल्या मत्तेवरील मूळ भांडवली खर्च;

AD: बदली केलेल्या मत्तेशी संबंधित संचित घसारा;

CC: बदली केलेल्या मत्तेशी संबदंधित ग्राहकांची एकूण वर्गणी.

स्पष्टीकरण- या विनियमाच्या प्रयोजनासाठी, नूतनीकरण आणि आधुनिक ीकरण या शब्दांचा अर्थ प्राप्तीकर अधिनियम, १९६१ च्या कलम ८० आय ए मधील अर्थानुसार राहील.

## २७ अतिरिक्त भांडवलीकरण

२७.१ खालील भांडवली खर्च, जो कामाच्या मूळ व्याप्तीच्या अंतर्गत, वाणिज्यिक कामकाजास सुरुवात झाल्यानंतर आणि मर्यादा दिनांकापर्यंत, प्रत्यक्षात झाला असेल किंवा करण्याचे प्रस्तावित करण्यात आले असेल, आयोगाकडून, **आवश्यक छाननीस अधीन** राहून, मान्य करण्यात येईलः-

(ए) कामाच्या मूळ व्याप्तीमधील न फेडलेल्या दायित्वांमुळे

(बी) कामाच्या मूळ व्याप्तीमधील चालू कामे, ज्यांचे कार्यान्वयन सध्या स्थगित ठेवण्यात आले आहे

(सी) कामाच्या मूळ व्याप्तीमधून उद्‌भवलेला लवादाचा निवाडा, अंतिम व अपील न करता येण्याजोगा आदेश किंवा कोर्टाची डीक्री, यांची पुर्ततेमुळे

(डी) कायद्यातील बदलामूळे

(इ) विनियम २६ मधील मर्यादा निकषांना अधीन राहून, प्रकल्पाच्या मूळ खर्चात समाविष्ट केलेल्या सुरवातीच्या सुट्या भागांची खरेदी

(एफ) मूळ भाडंवली खर्चात समाविष्ट नसलेला परंतु निर्मिती केंद्र किंवा पारेषण केंद्राचे कामकाज कार्यक्षमतेने व यशस्स्वीपणॆ चालविण्यासाठी आवश्यक झालेल्या अतिरिक्त कामावरील/सेवेवरील खर्च

परंतु असे की, तात्पुरत्या वीज दरास मंजूरी मागण्यासाठी करावयाच्या अर्जासोबत कामाची मूळ व्याप्ती खर्चाच्या अंदाजासह सादर करण्यात येईल;

परंतु आणखी असे की, निर्मिती युनिट/केंद्र किंवा पारेषण यंत्रणा वाणिज्यिकरित्या सुरु झाल्याच्या दिनांकानंतर, अंतिम वीज दराच्या निश्चितीसाठी पाठवावयाच्या अर्जासोबत स्थगित ठेवलेली दायित्वे आणि कामे यांची यादी पाठविण्यात येईल.

२७.२ अतिरिक्त भांडवलीकरणाचा होणारा परिणाम, जसे असेल तसे, कामगिरीच्या मध्यावधी आढाव्याच्या वेळी आणि दिनांक १ एप्रिल, २०१६ पासून सुरु होण-या तिस-या नियंत्रण कालावधीतील वीज दर निश्चितीकरणाच्या वेळी, विचारात घेण्यात येईल.

## २८ ग्राहक वर्गणी, डिपॉझिटची कामे आणि अनुदान

२८.१ परवानाधारकाकडून करण्यात येत असलेल्या खालील प्रकारच्या कामांचे वर्गीकरण या वर्गवारीखाली करण्यात येईल-

(ए) डिपॉझिट कामांच्या संदर्भात, निधीचा काही भाग किंवा सर्व निधी प्राप्त झाल्यानंतर करावयाची कामे

(बी) राज्य आणि केंद्र शासनांकडून प्राप्त झालेल्या निधीतून तसेच आरजीजीव्हीवाय, एपीडीआरपी इ. योजनांखाली प्राप्त झालेल्या निधीतून सुरु केलेली भांडवली खर्चाची कामे

(सी ) वरील प्रकारची अन्य कोणतीही अनुदाने आण्णि अशा रकमा ज्या परत करण्याचे कोणतेही बंधन नसते आणि ज्यांच्यावर कोणतेही व्याज लावण्यात येत नाही.

२८.२ अशा भांडवली खर्चाच्या कामावरील खर्चावर करावयाच्या कार्यवाहीची तत्त्वे खालीलप्रमाणे राहतील :-

(अ) या विनियमात विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे प्रमाणानुसार संचालन व देखभाल खर्च मंजूर करण्यात येतील.

(ब) निर्मिती कंपनी किंवा परवानाधारकाने, जसे असेल तसे, कर्ज व भाग-भांडवलासह दिलेल्या आर्थिक पाठिंब्याच्या मर्यादेपर्यंत, विनियम ३० मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या घसा-याच्या तरतुदी लागू राहतील.

(क) गुंतविलेल्या भांडवलावरील परताव्यासंबंधीच्या तरतुदी, विनियम २९ मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे राहतील.

## २९ गुंतविलेल्या भांडवलावर परतावा

२९.१ आयोगाने, या विनियमांना अनुसरुन निश्चित केलेल्या विनियमित बेस दराने (आर आर बी), गुंतविलेल्या भांडवलावरील परताव्याची (आर ओ सी इ) परिगणना रुपयांमध्ये करण्यात येईल;

२९.२ गुंतविलेल्या भांडवलावरील परताव्याचा (आर ओ सी इ) उपयोग निर्मिती कंपनी आणि परवानाधारकांना द्यावयाच्या परताव्यासाठी करण्यात येईल, आणि त्यामध्ये भाग भांडवलावरील **लाभांश** आणि कर्जावरील व्याजाचा समावेश असेल व कर्जावरील व्याजासाठी वेगळी तरतूद करण्यात येणार नाही;

२९.३ विनियमित बेस दर (आर आर बी), हा गुंतविलेल्या एकूण भांडवलाइतका, म्हणजेच मत्तांची मूळ किंमत वजा संचित घसारा, इतका, असेल. चालू असलेली भांडवली खर्चाची कामे, (सी डब्लू आय पी), ग्राहकांची **वर्गणी,** आणि भांडवल सबसिडी/ अनुदाने या बाबी विनियमित बेस दराचा भाग नसतील;

२९.४ भांडवलीकृत अनुसूचीशी सुसंगत असणाऱ्या मान्यता प्राप्त भांडवली गुंतवणूक आराखड्यावर आधारित विनियमित बेस दराची (आर आर बी) निश्चिती नियंत्रण कालावधीच्या सुरवातीला नियत्रंण कालावधीतील प्रत्येक वर्षासाठी करण्यात येईल. नियंत्रण कालावधीतील- $i^{th}$ वर्षाकरीता विनियमित बेस्ट दराची परिगणना खालील पद्धतीने करण्यात येईल;

$RRB_i = RRB_{i-1} + \Delta AB_i/2$;

Where,

'i' is the $i^{th}$ year of the Control Period, i = 1,2,3,4, and 5 for the second Control Period;

$RRB_i$: Regulated Rate Base for the $i^{th}$ year of the second Control Period;

$AB_i$: Change in the Regulated Rate Base in the $i^{th}$ year of the Control Period. This component shall be the average of the value at the beginning and end of the year as the asset creation is spread across a year and shall be computed as follows:

$AB_i = Inv_i – D_i – CC_i$;

Where,

$Inv_i$: Investments projected to be capitalised during the $i^{th}$ year of the Control Period and approved;

$D_i$: Amount set aside or written off on account of Depreciation of fixed assets for the $i^{th}$ year of the Control Period;

$CC_i$: Consumer Contributions pertaining to the RRBi and capital grants/subsidies received during $i^{th}$ year of the Control Period for construction of service lines or creation of fixed assets;

$RRB_{i-1}$: Regulated Rate Base for the Financial Year preceding the $i^{th}$ year of the Control period. For the first year of the Control Period, $RRB_{i-1}$ shall be the Regulated Rate Base or the Base Year i.e. $RRB_O$;

$RRB_O = OCFA_O – AD_O – CC_O$;

Where;

$OCFA_O$: Original Cost of Fixed Assets at the end of the Base Year available for use and necessary for the purpose of the regulated business;

$AD_O$: Amounts written off or set aside on account of depreciation of fixed assets pertaining to the regulated business at the end of the Base Year;

$CC_O$: Total contributions pertaining to the $OCFA_O$, made by the consumers towards the cost of construction of distribution/service lines by the Distribution Licensee and also includes the capital grants/subsidies received for this purpose;

२९.५ गुंतविलेल्या भांडवलावरील परतावा (आर ओ सी इ) ची परिगणना - **'i'** वर्षाकरीता खालील पद्धतीप्रमाणे करण्यात येईल;

$$\mathbf{ROCE_i = ROCE_i \ X \ RRB_i}$$

Where,

आरओसीइ हा विनियम २९.६ मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे अनुज्ञेय जास्तीत जास्त कर-पूर्व गुंतविलेल्या भांडवलावरील परतावा असेल

आरआरबी- विनियमित बेस दर हा आयोगाने मान्यता दिलेल्या भांडवल गुंतवणूक आराखड्यावर आधारित नियंत्रण कालावधीतील प्रत्येक वर्षाकरीता **मत्तेवरील एकूण खर्चा इतका** असेल;

२९.६ दूसऱ्या नियंत्रण कालावधीत अनुज्ञेय आर ओ सी इ खालील प्रमाणे असेल-

(ए) दश-वार्षिक शासकीय रोख्यांचा दर **अधिक** निर्मिती कंपन्या, पारेषण परवानेधारक आणि वितरण वायर परवानाधारक/ व्यवसायकरीता ४.५०**%**;

(बी) दश-वार्षिक शासकीय रोख्यांचा दर **अधिक** किरकोळ पुरवठा परवानाधारक/व्यवसायकरीता ५.००**%**;

२९.७ आयोग, ३० एप्रिल रोजी दश-वार्षिक शासकीय रोख्यांचा किमान दर अनुसूचित करेल हा दर भारतीय रिझर्व बँकेने कळविलेल्या दश-वार्षिक

शासकीय रोख्यांच्या दरावर आधारित असेल. आणि जर नियंत्रण कालावधीतील कोणत्याही पूर्ण झालेल्या वर्षाचा दश-वार्षिक शासकीय रोख्यांचा सरासरी दर हा त्या वर्षाच्या सुरुवातीला विचारात घेतलेल्या किमान दराच्या तुलनेत १ टक्क्यापेक्षा कमी किंवा जास्त असेल, तर वर नमुद केल्याप्रमाणे, किमान दराच्या तुलनेत गुंतवलेल्या भांडवलावरील परताव्याची १ टक्का कमी किंवा जास्त तफावतीची रक्कम ही झेड-घटक आकाराखाली **ग्राहकांना लागू करण्यात येईल**.

## ३० घसारा

३०.१ आयोगाने मान्यता दिलेला मत्तेवरील भांडवली खर्च हा घसाऱ्याच्या प्रयोजनासाठी, आधार-मूल्य राहील;

३०.२ निर्मिती कंपनी आणि पारेषण परवानाधारक किंवा वितरण परवानाधारक यांना, खालील नमूद केलेल्या पद्धतीस अनुसरुन, त्यांच्या व्यवसायात वापरात असलेल्या स्थिर मत्तेच्या मूल्यावर घसारा वसूल करण्यास परवानगी देण्यात येईल :-

(ए) प्रकल्पाच्या/स्थिर मत्तेचा मान्यता दिलेला मूळ खर्च हा घसाऱ्याच्या परिगणनेसाठी आधार-मूल्य राहील;

(बी) या विनियमाच्या **जोडपत्र-१** मधे विनिर्दिष्ट केलेल्या दराने स्थिर पद्धतीने वार्षिक तत्त्वावर घसाऱ्याची परिगणना करण्यात येईल;

परंतु असे की, निर्मिती कंपनी किंवा पारेषण परवानाधारक किंवा वितरण परवानाधारक प्रत्येक मत्तेवर ७० टक्के घसारा काढण्यात आल्यानंतर, त्या वर्षाच्या अखेरीस ३१ मार्च रोजी घसारा काढावयाची उर्वरित रक्कम ही, ह्या विनियमातील तरतूदीप्रमाणे त्या मत्तेच्या उर्वरित उपयुक्त आर्युमानाच्या कालावधीत **विभागण्यात** येईल, याची खात्री करतील;

परंतु असे की, निर्मिती कंपनी किंवा पारेषण परवानाधारक किंवा वितरण परवानाधारक वरील दाव्याला पुष्टी देण्यासाठी, आयोग वेळोवेळी ठरवून देईल आणि या विनियमातील तरतूदीनुसार आवश्यक असलेला असा तपशील किंवा कागदोपत्री पुरावा आयोगाला सादर करतील.

(सी) अनुज्ञेय मत्तेच्या भांडवली खर्चाच्या जास्तीत जास्त ९० टक्क्यांपर्यंत घसारा आकारण्यास परवानगी देण्यात येईल आणि अनुज्ञेय भांडवली खर्चाच्या १० टक्के रक्कम हे या मत्तेचे भंगार मूल्य म्हणून विचारात घेण्यात येईल;

३०.३ भाडे-पट्यावर घेतलेल्या जमीनीशिवाय असलेली अन्य जमीन आणि विद्युत जल-निर्मिती केंद्राच्या बाबतीत रिझर्वायरसाठी असलेली जमीन, या घसारा-योग्य मत्ता नसतील आणि अशा जमीनीवरील खर्च, मत्तेचे घसारा-योग्य मूल्य काढण्यासाठी, मत्तेच्या भांडवली खर्चातून वगळण्यात येईल;

३०.४ विद्यवान प्रकल्पांच्या बाबतीत, मत्तांच्या घसारा-योग्य एकूण मूल्यातून, ३१ मार्च २०११ पर्यंत आयोगाने मान्यता दिलेली संचयी तत्त्वावर काढलेली घसाऱ्याची रक्कम वजा करुन, दिनांक १ एप्रिल २०११ रोजी असलेले शिल्लक घसारा-योग्य मूल्य काढण्यात येईल;

परंतु असे की, घसारा हा वाणिज्यिक कामकाजास सुरुवात झाल्याच्या पहिल्या वर्षापासून आकारण्यात येईल.

३०.५ वर्षाच्या काही भागासाठी मत्तेचे अंदाजित वाणिज्यिक कामकाज झाले असल्यास, आयोगाने मान्यता दिलेल्या वर्षाच्या सुरुवातीस आणि अखेरीस मत्तेच्या सरासरी मूल्याच्या आधारे घसाऱ्याची परिगणना करण्यात येईल;

परंतु असे की, कामगिरीच्या मध्यावधी आढाव्याच्या वेळी भांडवलीकृत केलेल्या मत्तेच्या अचूक समायोजनासाठी किंवा तिसऱ्या नियंत्रण कालावधीतील वीज दर निश्चितीकरण्याच्या वेळी अंतिम अचूक समायोजन करण्याच्या वेळी, घसाऱ्याची फेर-परिगणना करण्यात येईल. ही फेर-परिगणना अर्जदाराने भांडवलीकृत केलेल्या मत्तांच्या कागदोपत्री पुराव्यावर, घसाऱ्याची परिगणना भांडवलीकरणाच्या दिनांकापासून यथा-प्रमाणात करण्यात आली आहे या बाबत आयोगाने करावयाच्या आवश्यक छाननीस अधीन राहून, आधारित असेल.

## ३१ खेळते भांडवलावरील व्याज

३१.१ निर्मिती :

(ए) कोळश्यावर आधारित/ **तेलावर आधारित**/ लिग्नाईटद्वारे प्रज्वलित निर्मिती केंद्रांच्याबाबतीत, खेळते भांडवलात खालील बाबींचा समावेश असेल;

(एक) पीट-हेड निर्मिती केंद्रांकरीता अर्ध्या (१/२) महिन्यासाठी आणि पीट-हेड नसलेल्या निर्मिती केंद्रांच्या बाबतीत कोळसा किंवा लिग्नाईट वरील खर्च, उपलब्धता लक्ष्यास अनुसरुन;

(दोन) तेलावरील एक महिन्याचा खर्च- उपलब्धता लक्ष्यास अनुसरुन;

(तीन) दुय्यम इंधन तेलावरील एक महिन्याचा खर्च - उपलब्धता लक्ष्यास अनुसरुन;

(चार) संचालन व देखभालीवरील एक महिन्याचा खर्च;

(पाच) देखभालीसाठी सुट्या भागांवरील खर्च - मागील खर्चाच्या एक टक्का; आणि

(सहा) उपलब्धता लक्ष्यास अनुसरुन परिगणना केलेल्या वार्षिक स्थिर आकार आणि उर्जा आकारांच्या बेरजेच्या सममूल्य दीड महिन्यातील वीज विक्रीद्वारे मिळू शकणा-या रकमा; वजा

(सात) उपलब्धता लक्ष्यास अनुसरुन परिगणना केलेल्या इंधनावरील खर्चाच्या एक महिन्यापर्यंत इंधनासाठी (तेल आणि दुय्यम इंधन तेलासह) देय रकमा;

(बी) गॅस टर्बाइनवर/कम्बाइन्ड सायकवर चालणा-या निर्मिती केंद्रांकरिता, खेळते भांडवलात खालील बाबींचा समावेश असेलः-

(एक) वायु इंधन/किंवा द्रव इंधनावर चालणा-या निर्मिती केंद्राच्या कामकाजाचा प्रकार विचारात घेऊन, उपलब्धता लक्ष्यास **अनुसरुन**, अर्ध्या महिन्याचा इंधन खर्च;

(दोन) उपलब्धता लक्ष्यास अनुसरुन, पंधरा (१५) दिवसांसाठी द्रव इंधनाचा साठा;

(तीन) संचालन व देखभालीवरील एक महिन्याचा खर्च; आणि

(चार) देखभालीसाठी सुट्या भागांवरील ख्र्व - मागील खर्चाच्या एक टक्का; आणि

(पाच) उपलब्धता लक्ष्यास अनुसरुन परिगणना केलेल्या वार्षिक स्थिर आकार आणि ऊर्जा आकारांच्या बेरजेच्या

'दीड महिन्यातील सममूल्य वीज विक्रीद्वारे मिळू शकणा-या रकमा; वजा

(सहा) उपलब्धता लक्ष्यास अनुसरुन परिगणना केलेल्या इंधनावारील खर्चाच्या एक महिन्यापर्यंतच्या इंधनासाठी (द्रव इंधन साठ्यासह) देय रकमा;

(सी) जल-विद्युत निर्मिती केंद्रांच्या बाबतीत, खेलते भांडवलात खालील बाबींचा समावेश असेलः-

(एक) संचालन व देखभालीवरील एक महिन्याचा खर्च;

(दोन) देखभालीसाठी सुट्या भागांवरील र्ख्च - मागील खर्चाच्या एक टक्का; आणि

(तीन) प्रमाणानुसार क्षमता निर्देशांकानुसार परिगणना केलेल्या वार्षिक स्थिर आकारांच्या दीड महिन्यातील सममूल्य वीज विक्रीद्वारे मिळू शकणा-या रकमा.

(डी) स्वतःच्या निर्मिती केंद्राच्या बाबतीत, निर्मिती व्यवसायाकडून किरकोळ पुरवठा व्यवसायाला करावयाच्या विजेच्या पुरवठ्याच्या **प्रमाणात,** या विनियमानुसार खेळते भांडवलाची परिगणना करण्यासाठी (**विजेच्या विक्रीपासून) मिळू शकणारी** कोणतीही रक्कम अनुज्ञेय नसेल.

(इ) खेळते भांडवलावरील व्याजाचा दर हा प्रमाणानुसार तत्त्वावर आधारित असेल आणि तो ज्या दिवशी वीज दराच्या निश्चितीकरणासाठी अर्ज करण्यात आला असेल त्या दिवशी असणा-या भारतीय स्टेट बॅंकेच्या स्टेट बॅन्क ॲडव्हान्स रेट (एस बी ए आर) इतका असेल.

३१.२ पारेषणः

(ए) पारेषण परवानाधारकाला, खाालीलप्रमाणे परिगणना केलेल्या, आर्थिक वर्षाकरिता लागणा-या अंदाजित खेळते भांडवलावर व्याज अनुज्ञेय राहीलः-

(एक) अशा आर्थिक वर्षात संचालन व देखभालीवर होणा-या खर्चाच्या एक-बारांश; अधिक

(दोन) अशा आर्थिक वर्षातील प्रत्येक महिन्याच्या शेवटी असलेल्या हातातील शिल्लक इंधनासह मालसाठा, सामान व पुरवठा यांच्या पुस्तकी किंमतीच्या बेरजेच्या एक-बारांश;

(तीन) विद्यमान पारेषण दरापासून अपेक्षित महसुलाच्या एक महिन्यातील सममूल्य रक्कम; वजा

(चार) पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्यांकडून सुरक्षा अनामत म्हणून घेतलेली रक्कम.

(बी) ज्या दिवशी वीज दराच्या निश्चितीकरणासाठी अर्ज करण्यात आला असेल त्या दिवशी असणा-या भारतीय स्टेट बॅकेच्या स्टेट बॅन्क ॲडव्हान्स रेट (एस बी ए आर) इतक्या दराने व्याज अनुज्ञेय असेल.

(सी) पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्यांकडून सुरक्षा अनामत म्हणून घेतलेल्या रकमेवर ज्या दिवशी वीज दराच्या निश्चितीकरणासाठी अर्ज करण्यात आला असेल त्या दिवशी असणा-या बॅन्केच्या दराने व्याज अनुज्ञेय राहील.

३१.३ वितरण वायर व्यवसाय

(ए) वितरण परवानाधारकाला वितरण व्यवसायासाठी संबंधीत वर्षाकरिता लागणा-या अंदाजित खेळते भांडवलावर व्याज अनुज्ञेय राहील व त्याची परिगणना खालीलप्रमाणे करण्यात येईल :-

(एक) अशा आर्थिक वर्षाकरिता होणा-या संचालन व देखभाल खर्चाच्या एक-बारांश; अधिक

(दोन) अशा आर्थिक वर्षातील प्रत्येक महिन्याच्या शेवटी असलेल्या हातातील शिल्लक इंधनासह मालसाठा, सामान व पुरवठा यांच्या पुस्तकी किंमतीच्या बेरजेच्या एक-बारांश; अधिक

(तीन) वितरण वायरच्या वापरासाठी विद्यमान वीज दरातील आकारांनुसार मिळणा-या अपेक्षित महसूलाच्या दीड महिन्यातील सममूल्य रक्कम;

(बी) ज्या दिवशी वीज दराच्या निश्चितीकरणासाठी अर्ज करण्यात आला असेल त्या दिवशी असणा-या भारतीय स्टेट बॅकेच्या स्टेट बॅन्क ॲडव्हान्स रेट (एस बी ए आर) इतक्या दराने व्याज अनुज्ञेय असेल.

३१.४ विजेचा किरकोळ पुरवठा व्यवसाय

(ए) वितरण परवानाधारकाला संबंधीत वर्षात लागणाऱ्या अंदाजित खेळते भांडवलावर व्याज अनुज्ञेय राहील व त्याची परिगणना खालीलप्रमाणे करण्यात येईल :-

(एक) अशा आर्थिक व्यवसायाकरीता होणाऱ्या संचालन व देखभाल खर्चाच्या एक-बारांश; अधिक

(दोन) अशा आर्थिक वर्षातील प्रत्येक महिन्याच्या शेवटी असलेल्या हातातील शिल्लक इंधनासह मालसाठा, सामान व पुरवठा यांच्या पुस्तकी किंमतीच्या बेरजेच्या एक-बारांश; अधिक

(तीन) विद्यमान वीज दराने विजेच्या विक्रीपासून मिळणाऱ्या अपेक्षित महसूलाच्या दीड महिन्यातील सममूल्य रक्कम; वजा

(चार) ग्राहक आणि वितरण यंत्रणा उपयोगकर्त्याकडून अधिनियमाच्या कलम ४७ च्या उप-कलम (१) च्या खंड (ए) आणि खंड (बी) नुसार घेतलेल्या सुरक्षा अनामतीच्या रक्कमा; वजा

(पाच) वार्षिक वीज प्राप्ती योजनेवर आधारित, एक महिन्यातील वीज खरेदीच्या खर्चाशी सममूल्य रक्कम;

परंतू असे की, स्वतःच्या निर्मिती केंद्राकडून वीज प्राप्त करुन घेतल्यास निर्मिती व्यवसायाकडून किरकोळ पुरवठा व्यवसायाला करावयाच्या विजेच्या पुरवठ्याच्या **संदर्भात,** या विनियमानुसार खेळते भांडवलाची परिगणना करण्यासाठी (**विजेच्या विक्रीपासून मिळू शकणारी**)कोणतीही रक्कम अनुज्ञेय नसेल.

(बी) ज्या दिवशी वीज दराच्या निश्चितीकरणासाठी अर्ज करण्यात आला असेल त्या दिवशी असणाऱ्या भारतीय स्टेट बॅकेच्या स्टेट बॅन्क ॲडव्हान्स रेट (एस बी ए आर) इतक्या दराने व्याज अनुज्ञेय असेल.

(सी) वितरण यंत्रणा उपयोगकर्त्यांकडून घेतलेल्या सुरक्षा अनामतीच्या रकमांवर ज्या दिवशी वीज दराच्या निश्चितीसाठी अर्ज करण्यात आला असेल त्या दिवशी असणाऱ्या बँक दराने व्याज अनुज्ञेय राहील;

## ३२ आकस्मिक राखीव निधीत समायोजन

३२.१ परवानाधारकाच्या आकस्मिक राखीव निधीत दिनांक १ एप्रिल २०११ रोजी असणाऱ्या शिल्लक रक्कमेचे, असल्यास दुसऱ्या नियंत्रण कालावधीकरीता वीज दर निश्चितीच्या वेळी समायोजन करण्यात येईल.

३२.२ वर नमुद केल्याप्रमाणे आकस्मिक राखीव निधितील कोणत्याही घटीत रक्कमेचे, वीज दराचा एक भाग म्हणून, समायोजन करण्यास परवानगी देण्यात येणार नाही.

**भाग- एफः निर्मिती**

## ३३ व्याप्ती

३३.१ भाग-एफ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेले विनियम, वितरण परवानाधारकास वीज निर्मितीच्या पारंपरिक स्त्रोतांकडून होणाऱ्या विजेच्या पुरवठ्यासाठी वीज दर निश्चितीकरणास लागू राहतील;

परंतू असे की, वितरण परवानाधारकाला नूतनशील उर्जा स्त्रोताकडून होणाऱ्या विजेच्या पुरवठ्यासाठीचे वीज दर हे आयोगाच्या संबंधित विनियमात/आदेशात विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या अटी व शर्तीनुसार निश्चित करण्यात येतील.

३३.२ निर्मिती कंपनीने वितरण परवानाधारकाला करावयाच्या वीज पुरवठ्यासाठीच्या वीज दराचे, खालील प्रकरणी निश्चितीकरण करताना आयोग या भागात अंतर्भूत असणाऱ्या अटी व शर्तींचे मार्गदर्शन घेईल :-

(ए) या विनियमांच्या प्रभावी दिनांकाच्या नंतर वीज खरेदी करार किंवा व्यवस्था करण्यात आली असल्यास त्या संबंधी वीज दर असेल तर;

(बी) जेथे या विनियमांच्या प्रभावी दिनांकाच्यापूर्वी वीज खरेदी करार किंवा व्यवस्था करण्यात आली असेल तर आणि आयोगाने जर अशा करारास/व्यवस्थेपूर्वी मान्यता दिलेली नसेल किंवा अशा करार/व्यवस्थेत आयोगाच्या वीज दराच्या विनियमांवर आधारित वीज दर अभिप्रेत असेल तर; किंवा

(सी) जर वितरण परवानाधारक वीज निर्मितीचा व्यवसाय करत असेल तर, वितरण परवानाधारकाच्या निर्मिती व्यवसायाकडून त्याच्या किरकोळ

व्यवसायाला करण्यात येत असलेल्या वीज पुरवठ्याची हस्तांतरण किंमत निश्चित करण्यासाठी;

परंतु असे की, जेथे उच्चित वाटेल अशा प्रकरणी, प्रकरणातील परिस्थितीचा विचार करुन, आयोग या विनियमात असलेल्या निकषांपेक्षा वेगळे निकष स्विकारु शकेल किंवा विशिष्ट प्रकरणासाठी पर्यायी निकष विनिर्दिष्ट करेल;

परंतु असे की, असे वेगळे निकष स्वीकारल्यास त्याबाबतची कारणे नोंदविण्यात येतील.

३३.३ या भाग-एफ मध्ये काहीही नमूद करण्यात आले असले तरी, केंद्र शासनाने पारित केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार पारदर्शक बोली पद्धतीने जर वीज दर निश्चित करण्यात आला असेल तर असा वीज दर आयोग स्वीकारेल.

## ३४ वीज निर्मिती कंपनीच्या वीज दराच्या निश्चितीकरणासाठी याचिका

३४.१ विद्युत निर्मिती कंपनीला, वितरण परवानाधारकाला करावयाच्या वीज पुरवठ्याचे दर निश्चित करण्यासाठी, या विनियमातील भाग सी नुसार याचिका दाखल करावी लागेल.

३४.२ या विनियमांखाली विद्युत निर्मिती केंद्राचा वीज दर हा टप्पा-निहाय, युनिट-निहाय किंवा संपूर्ण विद्युत निर्मिती केंद्रासाठी निश्चित करता येईल. या भागात विनिर्दिष्ट करण्यात आलेला विद्युत निर्मिती केंद्राच्या वीज दराच्या अटी व शर्ती या विद्युत निर्मिती केंद्राप्रमाणे,टप्पा-निहाय किंवा युनिट-निहाय, त्याच पद्धतीने लागू राहतील.

३४.३ जर विद्युत निर्मिती केंद्राच्या टप्प्यासाठी किंवा युनिटसाठी वीज दर निश्चित करण्यात येत असेल तर, विद्युत निर्मिती कंपनी ही सामायिक सुविधांच्या भांडवली खर्चाचे आणि सर्व टप्पे व युनिट्सच्या, संयुक्त व सामायिक खर्चाचे वाटप करताना, जसे असेल तसे, वाजवी आधार स्वीकारेल;

परंतु असे की, विद्युत निर्मिती कंपनी अशा खर्चाचे वाटप कोणत्या आधारे केले ते दाखविणारे एक विवरणपत्र ठेवेल ज्याचे वैधानिक लेखापरीक्षकाकडून यथोचितपणे लेखापरीक्षण करण्यात येईल आणि असे लेखापरीक्षित आणि प्रमाणित विवरणपत्र आयोगाला वीज दर निश्चित करणाचा अर्ज सादर करताना त्यासोबत पाठविण्यात येईल.

३४.४ विद्युत निर्मिती कंपनी, युनिट किंवा टप्पा किंवा संपूर्ण निर्मिती केंद्राचे, जसे असेल तसे, वाणिज्यिक कामकाज सुरु होण्याच्या अपेक्षित दिनांकाच्या आधी, तात्पुरता वीज दर निश्चित करण्यासाठी याचिका सादर करु शकेल. ही याचिका, ती सादर करण्याच्या दिनांकापर्यंत किंवा याचिका सादर करण्याच्या दिनांकाच्या आधीच्या दिनांकापर्यंत प्रत्यक्ष केलेल्या भांडवली खर्चाच्या आधारावर, जो वैधानिक लेखापरीक्षकाद्वारे यथोचितपणे लेखापरीक्षित आणि प्रमाणित करण्यात आला असेल, सादर करण्यात येईल आणि तात्पुरत्या वीज दरानुसार आकारणी, असे युनिट, किंवा टप्पा किंवा निर्मिती केंद्र, जसे असेल तसे, वाणिज्यिक कामकाज सुरु झाल्याच्या दिनांकापासून, करण्यात येईल.

३४.५ वार्षिक लेखापरीक्षित लेख्यांवर आधारित वैधानिक लेखापरीक्षकाने यथोचित पणे प्रमाणित केलेल्या निर्मिती केंद्राच्या वाणिज्यिक कामकाजाच्या दिनांकापर्यंत करण्यात आलेल्या प्रत्यक्ष भांडवली खर्चाच्या आधारे, अंतिम वीज दराच्या निश्चितीकरणासाठी, विद्युत निर्मिती कंपनी या विनियमांना अनुसरुन एक नवीन याचिका सादर करेल.

३४.६ आयोगाने निश्चित केलेल्या तात्पुरता वीज दर आणि अंतिम वीज दरातील कोणत्याही फरकाचे समायोजन , ज्याचा संबंध विद्युत निर्मिती कंपनीशी जोडता येणार नाही, आयोगाने दिलेल्या निर्देशांप्रमाणे पुढील वर्षाच्या वीज दराच्या निश्चितीकरणाच्या वेळी, करण्यात येईल.

३४.७ सिंचन, पूर नियंत्रण आणि वीज भागांसह असलेल्या बहु-उद्देशीय जल विद्युत प्रकल्पांच्या संबंधात, प्रकल्पाच्या फक्त विद्युत भागांशी संबंधीत असलेला भांडवली खर्च वीज दर निश्चितीकरणाच्या वेळी विचारात घेण्यात येईल.

## ३५ वीज दराचे भाग

३५.१ औष्णिक विद्युत निर्मिती केंद्राच्या विजेच्या विक्रीचा दर हा दोन भागांचा असेल म्हणजेच वार्षिक स्थिर आकारांची आणि ऊर्जा (अस्थिर) आकारांची, (प्राथमिक आणि दुय्यम इंधन खर्चाच्या वसुलीसाठी) वसूली, असा असेल.

३५.२ जल-विद्युत निर्मिती केंद्राच्या विजेच्या विक्रीचा दर हा दोन भागांत म्हणजेच क्षमता आकारांची आणि ऊर्जा आकारांची वसूली, असा असेल.

## ३६ वार्षिक स्थिर आकार

३६.१ वार्षिक स्थिर आकारांचे भाग

वार्षिक स्थिर आकारांचे भाग खालीलप्रमाणे असतील-

(ए) घसारा;
(बी) संचालन व देखभाल खर्च;
(सी) गुंतविलेल्या भांडवलावरील परतावा;
(डी) खेळते भांडवलावरील व्याज

**वजाः**

(ए) वीज दराव्यतिरिक्त उत्पन्न

परंतु असे की, औष्णिक आणि जल-विद्युत निर्मिती केंद्राकरिता गुंतविलेल्या भांडवलावरील घसारा आणि परतावा या विनियमांच्या भाग ३ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या तरतुदींनुसार असेल.

## ३७ भांडवली खर्च

३७.१ प्रकल्पाच्या भांडवली खर्चात खालील बाबींचा समावेश राहील :-

ए. केलेल्या खर्चामध्ये, आयोगाने आवश्यक छाननीनंतर मान्यता दिलेले बांधकामच्या कालावधीतील व्याज आणि उभारलेल्या भांडवआवरील व्याजाचाही, समावेश असेल;
बी. मर्यादेच्या दरांना अधीन राहून, सुरुवातीला भांडवलीकृत केलेले सुटे भाग; आणि

सी. या विनियमांखाली निश्चित करण्यात आलेले खेळते भांडवल;

परंतु असे की, या प्रकल्पाचे भाग असलेला व सुयोग्य वाटपावर आधारित असलेला, सामायिक मत्तांवरील खर्च विचारात घेण्यात येईल आणि असा वाटप केलेला खर्च हा भांडवली खर्चाचा भाग असेल;

परंतु असे की, प्रकल्पाचा भाग असलेल्या परंतु सध्या वापरात नसलेल्या मत्ता भांडवली खर्चातून वगळण्यात येतील.

३७.२ आयोगाने आवश्यक छाननीनंतर मान्य केलेला भांडवली खर्च वीज दर निश्चितीकरणासाठी आधारभूत राहील.

परंतु असे की, विद्युत निर्मिती कंपनी आणि वितरण परवानाधारक यांच्यातील वीज खरेदी करारात प्रत्यक्ष खर्चावर जर मर्यादा घालण्यात आली असेल तर, या विनियमांच्या प्रयोजनार्थ, प्रकल्पाचा मूळ खर्च हा या मर्यादेपेक्षा जास्त असणार नाही.

परंतु असे की, आवश्यक छाननीमध्ये, भांडवली खर्चाचा वाजवीपणा, भांडवल उभारणीची योजना, बांधकामाच्या कालावधीतील व्याज, कार्यक्षम तंत्रज्ञानाचा वापर, खर्चात झालेली वाढ आणि वेळेत झालेली वाढ आणि वीज दराच्या निश्चितीकरणासाठी आयोगास उचित वाटणा-या अशा अन्य बाबींचा समावेश असेल.

परंतु आणखी असे की, विद्यमान निर्मिती केंद्रांच्या बाबतीत या विनियमांच्या प्रभावी दिनांकाच्या पूर्वी आयोगाने मान्यता दिलेला प्रकल्पाचा भांडवली खर्च आणि प्रस्तावित केलेला अद्याप करावयाचा अतिरिक्त भांडवली खर्च आणि दुस-या नियंत्रण कालावधीच्या संबंधित वर्षात भांडवलीकृत केलेला खर्च, ज्यास आयोगाने मान्यता दिलेली असेल, वीज दराच्या निश्चितीकरणासाठी आधारभूत राहील.

परंतु असेही की, जल-विद्युत निर्मिती केंद्राची जागा दर राज्य शासनाकडून पारदर्शक बोली प्रक्रियेचा अवलंब करुन विकासकाला (जो राज्य शासन नियंत्रित किंवा राज्य शासनाच्या मालकीची कंपनी नसेल) देण्यात आली असेल, तर या संदर्भात झालेला किंवा अद्याप करावयाचा बांधील खर्च, प्रकल्प जागेचे वाटप होण्यासाठी प्रकल्प विकासकाने राज्य शासनाला द्यावयाची अधिमूल्याची **(प्रिमियमची)** रक्कम, या बाबींवरील खर्च भांडवली खर्चात समाविष्ट करण्यात येणार नाही.

परंतु असे की, अशा जल विद्युत निर्मिती केंद्राच्या भांडवली खर्चामध्ये खालील खर्चांचा समावेश असेल.:-

(ए) मान्यता दिलेल्या प्रकल्पाच्या पुनर्वसन आणि पुनर्वसाहत योजनेवरील खर्च, जो मान्यता दिलेल्या राष्ट्रीय पुनर्वसन

आणि पुनर्वसाहत धोरण आणि पुनर्वसन आणि पुनर्वसाहत योजनेस अनुसरुन असेल. आणि

(बी) बाधित क्षेत्रामध्ये विकासकाने राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजनेखाली द्यावयाच्या दहा (१०) टक्के वर्गणीवरील खर्च.

३७.३ **<u>अतिरिक्त भांडवलीकरण</u>** :- प्रकल्पाचे वाणिज्यिक कामकाज सुरु झाल्याच्या दिनांकानंतर आणि मर्यादा दिनांकापर्यंत, मूळ कामाच्या खर्चाच्या व्याप्तीच्या अंतर्गत, प्रत्यक्ष झालेला खालील भांडवली खर्च, आवश्यक छाननीस अधीन राहून, आयोगाद्वारे प्रकल्पाच्या मूळ खर्चात समाविष्ट करण्यास परवानगी देण्यात येईलः-

(एक) स्थगित/**अदा न केलेली दायित्वे**;

(दोन) कार्यान्वित करण्यासाठी स्थगित ठेवलेली कामे;

(तीन) विनियम २६.२६ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मर्यादांना अधीन राहून, मूळ कामाच्या व्याप्तीत समाविष्ट असलेल्या सुरुवातीच्या भांडवली खर्चाचे सुटे भाग प्राप्त करुन घेण्यावर झालेला खर्च;

(चार) लवादाचा निवाडा किंवा न्यायालयाचा आदेश किंवा डीक्री या संबंधांतील दायित्वांची पूर्तता करण्यासाठी झालेला खर्च;

(पाच) कायद्यातील बदलांमुळे झालेला खर्च.

परंतु असे की, मूळ कामाच्या व्याप्तीमध्ये समाविष्ट असलेली कामे, त्यावरील खर्चाचे अंदाज, **अदा न केलेली दायित्वे** आणि कार्यान्वयनासाठी स्थगित ठेवलेली कामे, याबाबींचा तपशील वीज दर निश्चितीकरणाच्या अर्जासोबत पाठविण्यात येईल.

३७.४ खालील स्वरुपाचा मर्यादा दिनांकानंतर झालेला भांडवली खर्च प्रकल्पाच्या मूळ खर्चात समाविष्ट करण्यासाठी आयोगाकडून, आवश्यक छाननीस अधीन राहून, मान्यता देण्यात येईलः-

(एक) लवादाचा निवाडा आणि न्यायालयाचा अपील न करता येण्याजोगा आदेश किंवा डिक्री यासंबंधीच्या दायित्वांच्या पूर्ततेवर होणारा खर्च;

(दोन) कायद्यातील बदलांमुळे होणारा खर्च;

(तीन) कामाच्या मूळ व्याप्तीतील **राखेचे तळे**, राख हाताळण्याची यंत्रणा या संबंधातील स्थगित ठेवलेली कामे;

(चार) विद्युत जल-निर्मिती केंद्राच्या बाबतीत, नैसर्गिक प्रकोपांमुळे (ज्यात निर्मिती कंपनीच्या निष्काळजीपणामुळे विद्युत केंद्रात पुराचे पाणी शिरल्यामुळे झालेल्या नुकसानीचा समावेश नसेल) झालेल्या नुकसानीमुळे जो खर्च करणे आवश्यक झालेला असेल व ज्यात भौगोलिक कारणांमुळे झालेल्या खर्चाचा देखील समावेश असेल असा विमा योजनेखाली मिळालेली भरपाई समायोजित करुन करावा लागणारा उर्वरित खर्च आणि संयंत्राचे कामकाज यशस्वीरित्या आणि कार्यक्षमतेने चालू राहावे यासाठी आवश्यक झालेला व केलेला कोणताही अतिरिक्त खर्च;

३७.५ अन्य बाबी/मत्तांवर, ज्या निर्मिती मत्ता नसतील, झालेला कोणताही खर्च,ज्यात खालील बाबींवरील खर्च, परंतु तेवढ्या बाबींपुरताच मर्यादित न राहता, समाविष्ट असेल - नेहमीची साधने व **टॅकल्स**, वैयक्तिक संगणक, फर्निचर, वातानुकुलिन यंत्रे, व्होल्टेज स्टॅबिलायझर्स, रेफ्रीजरेटर्स, पंखे, कुलर्स, हीट कनव्हेक्टर, इ. जी मर्यादा दिनांकानंतर खरेदी करण्यात आलेली असतील त्यांचे, आयोगाच्या पूर्वमान्यतेने भांडवलीकरण करता येईल.

## ३७.६ नूतनीकरण आणि आधुनिकीकरण

(एक) निर्मिती केंद्राचे किंवा त्याच्या युनिटचे आयुर्मान, त्याच्या उपयुक्त आयुर्मानाच्या पलीकडे आणखी वाढविण्यासाठी, विद्युत निर्मिती कंपनी अशा केंद्राचे नूतनीकरण आणि आधुनिकीकरणावरील खर्च करण्यासाठी आयोगाच्या मान्यतेसाठी एक प्रस्ताव अर्जासोबत सादर करेल. या प्रस्तावासोबत सविस्तर प्रकल्प अहवाल, ज्यात कामाची पूर्ण व्याप्ती, खर्चाचे समर्थन, खर्च-लाभांचे विश्लेषण, संदर्भ दिनांकानंतर वाढीव आयुर्मानाचा अंदाज, लागणाऱ्या भांडवलाची उभारणी, खर्चाची टप्पा-निहाय विभागणी, काम पूर्ण करण्याचे वेळापत्रक, संदर्भाधीन किंमतीची पातळी, काम पूर्ण करण्याचा अंदजित खर्च, लाभधारकांबरोबर केलेल्या विचार-विनिमयाचे अभिलेखे आणि निर्मिती कंपनीने आवश्यक म्हणून विचारात घेतलेली अन्य कोणतीही माहिती, या बाबींचा समावेश असेल;

परंतु असे की, कोळशावर आधारित/लिग्नाईटवर प्रज्वलित होणा-या औष्णिक निर्मिती केंद्राच्या बाबतीत, निर्मिती कंपनी, तिच्या निर्मिती केंद्राचे किंवा युनिटचे आयुर्मान, उपयुक्त आयुर्मानाच्या पलिकडे वाढविण्यासाठी केलेल्या नूतनीकरण आणि आधुनिकी करणाचा खर्च भागविण्यासाठी भरपाई म्हणून, खंड (चार)मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या निकषांना अनुसरुन मिळणारी 'विशेष **सूट" प्राप्त करुन घेऊ शकेल** आणि अशा परिस्थितीत भांडवली खर्चात सुधारणा करण्याचा विचार करण्यात येणार नाही आणि लागू असणाऱ्या कामकाजाच्या निकषात सुधारणा करण्यात येईल. परंतु विशेष सूट वार्षिक स्थिर खर्चात समाविष्ट करण्यात येईल;

परंतु असेही की, ज्या निर्मिती केंद्र किंवा युनिटचे नूतनीकरण आणि आधुनिकीकरणाचे काम हाती घेण्यात आले असून त्यावरील खर्चास आयोगाने, या विनियमांच्या प्रभावी दिनांकापूर्वी मान्यता दिलेली आहे, अशा प्रकरणी वरील पर्याय उपलब्ध असणार नाही.

(दोन) जेथे निर्मिती कंपनीने, **जसे असेल तसे,** नूतनीकरण आणि आधुनिकीकरणाच्या मान्यतेसाठी अर्ज केला असेल तर, खर्चाच्या अंदाजाचा वाजवीपणा, काम पूर्ण करण्याचे वेळापत्रक, कार्यक्षम तंत्रज्ञानाचा वापर, लाभ-खर्चाचे विश्लेषण आणि आयोग विचारात घेईल असे संबंधित अन्य घटक, या बाबींचा योग्य विचार करुन अशा अर्जाला मंजूरी देण्यात येईल.

(तीन) नूतनीकरण आणि आधुनिकीकरणावरील खर्च आणि आयुर्मानाची वाढ यांच्या अंदाजावर आधारित आवश्यक छाननीनंतर आयोगाने मान्यता दिलेला आणि करण्यात आलेला किंवा अद्याप करावयाचा प्रस्तावित खर्च, आणि त्यातून संचित घसाऱ्यावरील खर्च, जो प्रकल्पाच्या मूळ खर्चातून यापूर्वीच वसूल केलेला असेल, वजा केल्यानंतर, **असा उरलेला खर्च** वीज दराच्या निश्चितीकरणासाठी आधारभूत राहील.

(चार) या विनियमाच्या खंड एक (१) मधील पहिल्या परंतुकातील पर्यायाचा निर्मिती कंपनीने दुसरा मार्ग म्हणून स्वीकार केल्यानंतर, कोळशावर आधारित/लिग्नाईटवर प्रज्लित औष्णिक निर्मिती केंद्रासाठी, रुपये ५ लाख/मेगावॅट/वर्ष दराने विशेष सूट आर्थिक वर्ष २०११-१२ मध्ये देण्यात येईल आणि त्यानंतर दुसऱ्या नियंत्रण

कालावधीतील प्रत्येक वर्षाकरिता त्यामध्ये ५.७२ %ने वाढ देण्यात येईल. ही वाढ निर्मिती केंद्राच्या संबंधित युनिटच्या वाणिज्यिक कामकाज सुरु झाल्याच्या दिनांकाच्या संदर्भात उपयुक्त आयुर्मान पूर्ण झाल्याच्या संबंधित दिनांकापासून पुढील आर्थिक वर्षापासून युनिट निहाय देण्यात येईल.

परंतु असे की, ज्या युनिटचे वाणिज्यिक कामकाज दिनांक १ एप्रिल २०११ रोजी पंचवीस (२५) वर्षाहून अधिक काळ चालू आहे अशा युनिटच्या बाबतीत, वरील सूट आर्थिक वर्ष २०११-१२ पासून अनुज्ञेय राहील.

## ३८ अनिश्चित विजेची विक्री

३८.१ औष्णिक निर्मिती केंद्राने वितरण परवानाधारकाला करावयाचा वीज विक्रीचा दर हा त्या वर्षात झालेला, आवश्यक छाननीस अधीन राहून, झालेल्या ात्यक्ष इंधन खर्चाशी, ज्यात त्या कालावधीत झालेल्या दुय्यम इंधन खर्चाचा समावेश असेल, जसे असेल तसे, सममूल्य असेल.

परंतु असे की, निर्मिती कंपनीला अनिश्चित विजेच्या विक्रीपासून, इंधन खर्चाच्या वसुलीशिवाय मिळालेला अन्य कोणताही महसूल हा भांडवली खर्चातून कमी करण्यात येईल आणि तो महसूल म्हणून धरण्यात येणार नाही.

## ३९ वीज दरा व्यतिरिक्त उत्पन्न

३९.१ निर्मिती कंपनीचा वार्षिक स्थिर खर्च निश्चित करताना, निर्मिती व्यवसायाशी संबंधित आयोगाने मान्यता दिलेले वीज दराव्यतिरिक्त उत्पन्न हे वार्षिक स्थिर आकारातून कमी करण्यात येईल.

परंतु असे की, निर्मिती कंपनी तिच्या वीज दराव्यतिरिक्त उत्पन्नाच्या पूर्व-अनुमानांचा संपूर्ण तपशील आयोग वेळोवेळी विनिर्दिष्ट करेल त्या नमुन्यांमध्ये सादर करण्यात येईल.

वीज दराव्यतिरिक्त उत्पन्न म्हणून विचारात घेण्यासाठी विविध शीर्षकांची निर्देशक यादी खालीलप्रमाणे असेल.

(ए) जमीन किंवा इमारत भाड्यावर दिल्यामुळे मिळणारे उत्पन्न;

(बी) भंगार विक्रीपासून मिळालेले उत्पन्न;

(सी) वैधानिक गुंतवणूकींपासून मिळालेले उत्पन्न;

(डी) राख/नाकारलेल्या कोळशाच्या विक्रीपासून मिळालेले उत्पन्न;

(इ) विलंबित किंवा स्थगित देयकांच्या प्रदानांप्वरील व्याज;

(एफ) पुरवठादार/ठेकेदारांना दिलेल्या अग्रिमावरील व्याज;

(जी) कर्मचाऱ्यांच्या निवासांपासूनचे भाडे;

(एच) ठेकेदारांपासून मिळालेले भाडे;

(आय) ठेकेदार आणि अन्य व्यक्ती/संस्थांकडून **भाडे तत्वावर ' दिलेल्या** वस्तुपासून मिळालेले उत्पन्न;

(जे) जाहिरात इ.पासून मिळालेले उत्पन्न;

(के) वीज दराव्यतिरिक्त अन्य कोणतेही उत्पन्न;

## ४० औष्णिक विद्युत निर्मिती केंद्राच्या कामकाजाचे निकष

खालील नमूद केलेले कामकाजाचे निकष लागू राहतील:-

४०.१ औष्णिक विद्युत निर्मिती केंद्रांकरीता पूर्ण क्षमता (स्थिर) आकारांच्या वसूली करिता उपलब्धता लक्ष्य आणि प्रोत्साहन-अधिदानाकरीता प्लॅन लोड फॅक्टर लक्ष्य

(ए) खालील खंड (बी) मध्ये समाविष्ट असलेल्या औष्णिक विद्युत निर्मिती केंद्रांव्यतिरिक्त, इतर सर्व औष्णिक विद्युत निर्मिती केंद्रांकरीता वार्षिक स्थिर आकाराच्या पूर्ण वसूलीसाठी उपलब्धता लक्ष्य ८५ टक्के असेल.

(बी) महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी लि.च्या (महानिर्मिती कंपनीच्या) केंद्रांकरीता वार्षिक स्थिर आकारांच्या पूर्ण वसूलीसाठी उपलब्धता लक्ष्य खालील प्रमाणे असेल :-

| औष्णिक विद्युत निर्मिती केंद्राचे नाव | उपलब्धता लक्ष्य (%) |
|---|---|
| कोराडी | ७२.०० |
| खापरखेडा | ८५.०० |
| चंद्रपूर | ८०.०० |
| नाशिक | ८०.०० |
| भुसावळ | ८०.०० |
| पारस-युनिट क्र.३ वगळून | अ८०.०० |
| परळी-युनिट क्र.६ वगळून | ८०.०० |

परंतु असे की, जर निर्मिती केंद्राने नूतनीकरण आणि आधुनिकीकरणाचे काम हाती घेतले असेल तर वरील निर्मिती केंद्रांच्या उपलब्धता निकषांमध्ये आयोग सुधारणा करु शकेल.

(सी) प्रोत्सहन-अधिदानाकरीता प्लॅन लोड फॅक्टर लक्ष्य ८५ टक्के असेल.

४०.२ केंद्रातील एकूण उष्मांक प्रमाण - विद्यमान निर्मिती केंद्रांकरीता

(ए) खालील खंड (बी) (सी) (डी)मध्ये समाविष्ट असलेल्या केंद्रांव्यतिरिक्त, अन्य कोळशावर आधारित विद्यमान औष्णिक विद्युत निर्मिती केंद्रांकरीता –

| २००/२१०/२५० मेगावॅट सेट्स | ५०० मेगावॅट आणि त्यावरील सेट्स |
|---|---|
| २४५० किलो कॅलरी प्रति युनिट | २४२५ किलो कॅलरी प्रति युनिट |

टिपणी -१

५०० मेगावॅट आणि त्यावरील युनिट्सच्या संबंधात, जर बॉयलरला पाणी पुरवणारे पंप विद्युत चलित असतील तर केंद्रांतील एकूण उष्मांक प्रमाण वर दाखविलेल्या प्रमाणापेक्षा ४० किलो कॅलरी प्रति युनिट कमी असेल.

टिपणी - २

ज्या विद्युत निर्मिती केंद्रांमध्ये २००/२१०/२५० मेगावॅट सेट्स व ५०० मेगावॅट आणि वरील सेट्स एकत्रित असतील, तेथे प्रमाणानुसार केंद्रातील एकूण उष्मांकाचे प्रमाण हे केंद्रातील भारांकित सरासरीने येणारे उष्मांकाचे प्रमाण असेल.

(बी) महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी लि.ची (महावितरण कंपनीची) औष्णिक विद्युत निर्मिती केंद्रे

**किलो कॅलरी प्रति युनिट**

| आर्थिक वर्ष | कोराडी | खापरखेडा | चंद्रपूर | नाशिक | भुसावळ | पारस युनिट क्र. ३ वगळून | परळी युनिट क्र.६ वगळून |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१०-११ | २९६५ | २५६० | २६१७ | २७२२ | २७३४ | ३१८६ | २७४५ |
| २०११-१२ | २९७५ | २५६८ | २६२६ | २७३१ | २७४२ | ३१९९ | २७५३ |
| २०१२-१३ | २९८५ | २५७५ | २६३५ | २७४० | २७५१ | ३२१२ | २७६२ |
| २०१३-१४ | २८७३ | २४२४ | २५३९ | २६६४ | २६७१ | ३२२५ | २६७९ |
| २०१४-१५ | २८८१ | २४२९ | २५४४ | २६७० | २६७७ | ३२३७ | २६८४ |
| २०१५-१६ | २८८९ | २४३३ | २५४९ | २६७७ | २६८३ | ३२५० | २६९० |

परंतु असे की, जर निर्मिती केंद्राने नूतनीकरण आणि आधुनिकीकरणाचे काम हाती घेतले असेल तर वरील निर्मिती केंद्रांच्या उष्मांक दराच्या निकषांमध्ये आयोग सुधारणा करु शकेल.

(सी) टाटा पॉवर कंपनी लि.ची औष्णिक विद्युत निर्मिती युनिट्स-निर्मिती व्यवसाय (टीपीसी-जी)

**किलो कॅलरी प्रति युनिट**

| आर्थिक वर्ष | युनिट-४ | युनिट-५ | युनिट-६ |
|---|---|---|---|
| | | | तेल व वायू सह |
| २०११-१२ | २५७० | २५७५ | २४३४ |
| २०१२-१३ | २५७६ | २५८३ | २४३९ |
| २०१३-१४ | २५८१ | २५९१ | २४४३ |
| २०१४-१५ | २५८६ | २५७३ | २४४८ |
| २०१५-१६ | २५९१ | २५८१ | २४५३ |

(डी) रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि.चे औष्णिक विद्युत निर्मिती केंद्र - निर्मिती व्यवसाय (आरइन्फ्रा-जी) -

**किलो कॅलरी प्रति युनिट**

| आर्थिक वर्ष | डहाणू औष्णिक विद्युत निर्मिती केंद्र |
|---|---|
| २०११-१२ | २३०८ |
| २०१२-१३ | २३१३ |
| २०१३-१४ | २३१७ |
| २०१४-१५ | २३२२ |
| २०१५-१६ | २३२७ |

(इ) लिग्नाइटवर आधारित विद्युत केंद्र

लिग्नाइटने प्रज्वलित विद्युत केंद्रांकरीता, आयोगाने लिग्नाइटमधील जलांशाच्या प्रमाणावर आधारित, कोळशावर आधारित औष्णिक विद्युत निर्मिती केंद्राकरीता लागू असलेल्या उष्मांक प्रमाणाने, केंद्रातील एकूण उष्मांक प्रमाण काढण्यासाठी खालील सूत्र विर्निदिष्ट केले आहेः-

(एक) लिग्नाइट ५० % जलांशासह : गुणक १.१०

(दोन) लिग्नाइट ४० % जलांशासह : गुणक १.०७

(तीन) लिग्नाइट ३० % जलांशासह : गुणक १.०४

(चार) जलांशाच्या इतर मूल्यांसाठी गुणक, जलांश ३०-४० आणि ४०-५० या दरम्यान असल्यास त्यासाठी गुणक, वरील उप-खंड (१) ते (३) मधील प्रत्येक टप्प्यासाठी (रेंज) दिलेल्या गुणकाच्या प्रमाणित मूल्यानुसार, यथाप्रमाण राहील.

(एफ) गॅस टर्बाइन/ कम्बाइन्ड सायकल विद्युत निर्मिती केंद्रे

**किलो कॅलरी प्रति युनिट**

| आर्थिक वर्ष | महानिर्मितीचे उरण-औष्णिक विद्युत निर्मिती केंद्र | टीपीसीजी-चे युनिट- ७ |
|---|---|---|
| २०११-१२ | २००९ | २००९ |
| २०१२-१३ | २०१३ | २०१३ |
| २०१३-१४ | २०१७ | २०१७ |
| २०१४-१५ | २०२१ | २०२१ |
| २०१५-१६ | २०२५ | २०२५ |

४०.३ केंद्रातील एकूण उष्मांक प्रमाण- हे विनियम **अंमलात** आल्यानंतर वाणिज्यिक कामकाज सुरु झालेल्या नवीन निर्मिती केंद्रांकरिता

(ए) कोळसा आणि लिग्नाइटवर आधारित औष्णिक विद्युत निर्मिती केंद्रांकरिता

= १.०६५ x डिझाइन उष्मांक प्रमाण (किलो कॅलरी/प्रति युनिट)

जेथे, युनिटचे डिझाइन उष्मांक प्रमाण म्हणजे पुरवठादाराने, १००% एमसीआर, ० % मेकअप, डिझाइन कोळसा आणि डिझाइन कुलींग

पाण्याचे तापमान/ बॅक प्रेशर, अशी स्थिती असताना हमी दिलेले युनिटचे उष्मांक प्रमाण होय.

परंतू असे की, युनिट्सच्या प्रमाण दाब आणि तापमानावर अवलंबून असणाऱ्या खालील कमाल डिझाइन युनिट उष्मांक प्रमाणापेक्षा, डिझाइन उष्मांक प्रमाण जास्त असणार नाही.

| **प्रमाण दाब (किलोग्रॅम/सेंटीमीटर $^{२}$)** | **१५०** | **१७०** | **१७०** | **२४७** | **२४७** |
|---|---|---|---|---|---|
| SHT/RHT ($^{0}$C) | ५३५/५३५ | ५३७/५३७ | ५३७/५६५ | ५३७/५६५ | ५६५/५९३ |
| Type of BFP | विद्युत चलित | टर्बाइन चलित | टर्बाइन चलित | टर्बाइन चलित | टर्बाइन चलित |
| Max Turbine Cycle Heat rate (kcal/kWh) | १९५५ | १९५० | १९३५ | १९०० | १८५० |
| **Min. Boiler Efficiency** | | | | | |
| Sub-Bituminous Indian Coal | ०.८५ | ०.८५ | ०.८५ | ०.८५ | ०.८५ |
| Bituminous Imported Coal | ०.८९ | ०.८९ | ०.८९ | ०.८९ | ०.८९ |
| **Max Design Unit Heat rate (kcal/kWh)** | | | | | |
| Sub-Bituminous Indian Coal | २३०० | २२९४ | २२७६ | २२३५ | २१७६ |
| Bituminous Imported Coal | २१९७ | २१९१ | २१७४ | २१३५ | २०७९ |

परंतु आणखी असे की, युनिटचे दाब आणि तापमान मापदंड जर वर नमूद केलेल्या प्रमाणापेक्षा वेगळे असतील तर जवळच्या वर्गातील कमाल डिझाइन युनिट उष्मांक प्रमाण धरण्यात येईल;

परंतु असेही की, जेथे युनिट उष्मांक प्रमाणाची हमी देण्यात आलेली नसेल परंतू टर्बाइन सायकल उष्मांक प्रमाण आणि बॉयलर कार्यक्षमता यांची वेगवेगळी हमी एकाच पुरवठादाराकडून किंवा वेगवेगळ्या पुरवठादारांकडून देण्यात आली असेल तर हमीबद्ध टर्बाइन सायकल उष्मांक प्रमाण आणि बॉयलर कार्यक्षमता यांचा वापर करुन युनिटचे डिझाइन उष्मांक प्रमाण काढण्यात येईल;

परंतु असेही की, जर या विनियमाच्या प्रभावी दिनांकापूर्वी एक किंवा अधिक युनिट्सचे कामकाज वाणिज्यिकरित्या सुरु झाल्याचे घोषित करण्यात आले असेल तर, अशा युनिट्स करता तसेच या विनियमांच्या

प्रभावी दिनांकारोजी किंवा त्यानंतर वाणिज्यिक कामकाज सुरु झाल्याचे घोषित करण्यात आलेल्या युनिट्सकरिता उष्मांक प्रमाणाचे निकष हे, विनियम ४०.२ (ए) नसार, वर नमूद केलेल्या पद्धती व निकषांनी काढलेल्या उष्मांक प्रमाण **निकषांपेक्षा** कमी असतील;

परंतू असेही की, लिग्नाइट प्रज्वलित निर्मिती केंद्राकरिता (सर्क्युलेटिंग फ्लूइडाइज्ड बेड कंम्बशन (सीएफबीसी) तंत्रज्ञानावर आधारित केंद्रांसह), या विनियमातील खंड ४०.२ (इ)मध्ये देण्यात आलेल्या जलांश गुणकाचा वापर करुन कमाल डिझाइन उष्मांक प्रमाण वाढविण्यात येईल.

टिपणीः जर युनिटच्या बॉयलरला पाणी देण्यात येणारे पंप विद्युत चलित असतील तर, कमाल डिझाइन युनिट उष्मांक प्रमाण हे बॉयलरला पाणी देण्यात येणा-या टर्बाइन चलित पंपाकरिता वर विनिर्दिष्ट केलेल्या कमाल डिझाइन युनिट उष्मांक प्रमाणापेक्षा ४० किलो कॅलरी प्रति युनिट कमी राहील.

(बी) वायू आधारित/द्रव आधारित औष्णिक निर्मिती केंद्रे

= 1.05 x Design Heat Rate of the Unit for Natural Gas and RLNG (kcal/kWh)

= 1.071 x Design Heat Rate of the Unit for Liquid Fuel (kcal/kWh)

जेथे एका युनियटचे डिझाईन उष्मांक प्रमाण म्हणजे १००% एमसीआर आणि जागेवरील ॲम्बिअंट स्थिती असताना एका युनिटचे हमीबध्द उष्मांक प्रमाण; आणि एका युनिटचा डिझाइन उष्मांक प्रमाण म्हणजे १००% एमसीआर, जागेवरील ॲम्बिअंट स्थिती, ० % मेक-अप, डिझाइन कुलींग पाण्याचे तापमान/ बॅक प्रेशर, स्थिती असताना एका युनिटचे हमीबध्द उष्मांक प्रमाण होय.

४०.४ दुय्यम इंधन तेल वापर

**विद्यमान केंद्रांकरिताः-**

(ए) खंड बी मध्ये समाविष्ट असलेली औष्णिक विद्युत निर्मिती/केंद्रे वगळून, इतर सर्व औष्णिक विद्युत निर्मिती केंद्रांकरिता दुय्यम इंधन तेल वापर खालीलप्रमाणे असेल.

एक. कोळशावर आधारित निर्मिती केंद्रे : १.० ml/kWh

दोन. सीएफबीसी तंत्रज्ञानावर आधारित केंद्रे वगळून लिग्नाईट

प्रज्वलित निर्मिती केंद्रेः २.० ml/kWh

तीन. सीएफबीसी तंत्रज्ञानावर आधारित लिग्नाईट प्रज्वलित निर्मिती केंद्रेः१.२५ ml/kWh

(बी) महानिर्मिती कंपनीच्या केंद्रांकरिता दुय्यम इंधन तेल वापराचे निकष खालीलप्रमाणे असतीलः

| औष्णिक विद्युत निर्मिती केंद्रे | दुय्यम इंधन तेल वापर ml/kWh |
|---|---|
| कोराडी | २ |
| खापरखेडा | २ |
| चंद्रपूर | २ |
| नाशिक | २ |
| भुसावळ | २ |
| पारस युनिट क्र.३ वगळून | २ |
| परळी युनिट क्र. ६ वगळून | २ |

परंतु असे की, जर निर्मिती केंद्रांनी नूतनीकरण आणि आधुनिकीकरण हाती घेतले असेल तर वर उल्लेखिलेल्या निर्मिती केंद्रांच्या बाबतीत दुय्यम इंधन तेल वापराच्या निकषांमध्ये आयोग सुधारणा करु शकेल.

**<u>नवीन निर्मिती केंद्रांकरिता</u>**

ए. कोळशावर आधारित निर्मिती केंद्रे : १.० ml/kWh

बी. सीएफबीसी तंत्रज्ञानावर आधारित केंद्रे वगळून लिग्नाईट प्रज्वलित निर्मिती केंद्रेः २.० ml/kWh

सी. सीएफबीसी तंत्रज्ञानावर आधारित लिग्नाईट प्रज्वलित निर्मिती केंद्रेः १.२५ ml/kWh

४०.५ सहाय्यकारी वीज वापर

(ए) खालील खंड बी मध्ये समाविष्ट असलेली केंद्रे वगळून कोळशावर आधारित निर्मिती केंद्रे.

| सहाय्यकारी वीज वापर | नैसर्गिक ड्राफ्ट कुलिंग टॉवर सह किवा कुलिंग टॉवर शिवाय |
|---|---|
| (एक) २०० मेगावॅट मालिका | ८.५०% |
| (त्त) ५०० मेगावॅट आणि त्यावरील | |

| | |
|---|---|
| बॉइलरला पाणी पुरविणारे वाफेवर चालणारे पंप | ६.००% |
| बॉइलरला पाणी पुरविणारे विद्युत चलित पंप | ८.५०% |

परंतु असे की, इंड्युस्ड ड्राफट कुलिंग टॉवर्स असलेल्या औष्णिक निर्मिती केंद्रांकरिता, वर उल्लेखिलेल्या निकषांपेक्षा ०.५ % ने उच्च निकष राहतील.

(बी) महानिर्मिती कंपनीची कोळशावर आधारित निर्मिती केंद्रेः

| **औष्णिक विद्युत निर्मिती केंद्रे** | **सहाय्यकारी वीज वापर** | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | **आर्थिक वर्ष २०११-१२** | **आर्थिक वर्ष २०१२-१३** | **आर्थिक वर्ष २०१३-१४** | **आर्थिक वर्ष २०१४-१५** | **आर्थिक वर्ष २०१५-१६** |
| कोराडी | १०.५५% | १०.४०% | १०.२१% | १०.००% | ९.८०% |
| पारस युनिट क्र.३ वगळून | ११.३३% | १०.७४% | १०.०१% | ९.१६% | ९.००% |
| भुसावळ | १०.३०% | ९.९१% | ९.४७% | ९.००% | ८.८०% |
| नाशिक | ९.२७% | ८.९३% | ८.५०% | ८.५०% | ८.५०% |
| परळी युनिट क्र. ६ वगळून | १०.१६% | ९.६६% | ९.१२% | ८.५०% | ८.५०% |
| खापरखेडा | ८.९८% | ८.८१% | ८.६३% | ८.५०% | ८.५०% |
| चंद्रपूर | ८.१८% | ८.१८% | ८.१८% | ८.१८% | ८.१८% |

परंतु असे की, जर निर्मिती केंद्रांनी नूतनीकरण आणि आधुनिकीकरण हाती घेतले असेल तर वर उल्लेखिलेल्या निर्मिती केंद्रांच्या बाबतीत सहाय्यकारी उर्जा वापराच्या निकषांमध्ये आयोग सुधारणा करु शकेल.

(सी) गॅस टर्बाइन/ कम्बाइन्ड सायकल निर्मिती केंद्रे

(एक) कम्बाइन्ड सायकल : ३.० %

(दोन) ओपन सायकल : १.० %

(डी) लिग्नाईट प्रज्वलित औष्णिक निर्मिती केंद्रेः

(एक) २०० मेगावॅट आणि त्यावरील सेट्स सह सर्व निर्मिती केंद्रेः

सहाय्यकारी उर्जा वापराचे निकष हे कोळशावर आधारित निर्मिती केंद्रांच्या सहाय्यकारी ऊर्जा वापराच्या निकषांपेक्षा ०.५ टक्के बिंदुंनी जास्त राहतील.

परंतु असे की, सीएफबीसी तंत्रज्ञानाचा वापर करणाऱ्या लिग्नाईट प्रज्वलित केंद्रांकरिता सहाय्यकारी उर्जा वापराचे निकष हे कोळशावर आधारित निर्मिती केद्रांच्या सहाय्यकारी उर्जा वापराच्या निकषांपेक्षा, वर विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे १.५ टक्के बिंदुंनी जास्त राहतील.

**४०.६ मार्गस्थ व हाताळणी तोटेः**

संबंधित महिन्यात कोळसा पुरवठा करणाऱ्या कंपनीने पाठविलेल्या कोळशाच्या परिमाणाच्या टक्केवारीत, कोळशावर आधारित निर्मिती केंद्रांकरिता मार्गस्थ आणि हाताळणी तोटे, खाली नमूद केल्याप्रमाणे राहतीलः

(ए) पीट-हेड निर्मिती केंद्रे - ०.२ %

(बी) पीट-हेड नसलेली निर्मिती केंद्रे - ०.८ %

वरील निकष हे सर्व प्रकारच्या कोळशांना, घरगुती कोळसा, **ओला** कोळसा आणि आयात कोळसा यांना, लागू राहतील.

परंतु असे की, (डिलिव्हरी) पाठवणी तत्वावर कोळशाची प्राप्ती करुन घेत असल्यास कोणतेही मार्गस्थ आणि हाताळणी तोटे अनुज्ञेय नसतील.

## ४१ संचालन व देखभाल खर्च

**४१.१ विद्यमान निर्मिती केंद्रे**

(ए) विम्यासह संचालन आणि देखभाल खर्च हे, लेखापरिक्षीत आर्थिक विवरण पत्रांवर आधारित असलेल्या दिनांक ३१ मार्च २००९ रोजी संपलेल्या तीन (३) वर्षांच्या संचालन व देखभालीवर झालेल्या प्रत्यक्ष खर्चाच्या सरासरीच्या तत्वावर काढण्यात येईल व त्यामधून संचालन व देखभालीवर झालेले असाधारण खर्च, असल्यास, आयोगाच्या आवश्यक छाननीस अधीन राहून, वगळण्यात येतील.

(बी) अशा संचालन व देखभाल खर्चाची सरासरी ही ३१ मार्च २००८ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षातील संचालन व देखभाल खर्च म्हणून विचारात घेण्यात येईल आणि त्यामध्ये, १ एप्रिल २०११ रोजी सुरु होणाऱ्या आधारभूत वर्षांकरिता संचालन व देखभाल खर्च

काढण्यासाठी, संबंधित वर्षाकरिता आयोगाने मान्यता दिलेल्या वाढ - घटक दराने वाढ करण्यात येईल.

(सी) संचालन व देखभाल खर्च पुढील प्रत्येक वर्षाकरिता, वर आर्थिक वर्ष २०१०-११ करिता निश्चित केलेल्या आधारभूत खर्चात नियंत्रण कालावधीतील प्रत्येक वर्षाकरिता अनुज्ञेय संचालन व देखभाल खर्च काढण्यासाठीच्या ५.७२ % या वाढ घटक दराने, वाढ करुन काढण्यात येईल.

परंतु असे की, या विनियमांच्या प्रभावी दिनांकाच्या दिवशी जर विद्यमान निर्मिती केंद्र तीन (३) वर्षांपेक्षा कमी कालावधीसाठी कार्यरत असेल तर संचालन व देखभाल खर्च हे विनियम ४२.२ मध्ये नवीन निर्मिती केंद्रांकरिता विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे असतील.

## ४२ नवीन निर्मिती केंद्रे

ए) कोळशावर आधारित निर्मिती केंद्रांकरिताः

■

रुपये लाख/ मेगावॅट

| आर्थिक वर्षे | २००/२१०/२५० मेगावॅट सेट्स | ५०० मेगावॅट आणि त्यावरील सेट्स |
|---|---|---|
| २०११-१२ | १४.८१ | १३.३२ |
| २०१२-१३ | १५.६६ | १४.०८ |
| २०१३-१४ | १६.५५ | १४.८९ |
| २०१४-१५ | १७.५० | १५.७४ |
| २०१५-१६ | १८.५० | १६.६४ |

ज्या निर्मिती केंद्रामध्ये २००/२१०/२५० मेगावॅट सेट्स आणि ५०० मेगावॅट आणि त्यावरील सेट्स एकत्रित असतील त्यांच्याकरिता संचालन व देखभाल खर्चासाठी भारांकित सरासरी मूल्य स्वीकारण्यात येईल.

(बी) लिग्नाईटवर आधारित निर्मिती केंद्रांकरिता

रुपये लाख/ मेगावॅट

| आर्थिक वर्षे | लिग्नाईटवर आधारित निर्मिती केंद्रे |
|---|---|
| २०११-१२ | १४.८१ |
| २०१२-१३ | १५.६६ |
| २०१३-१४ | १६.५५ |
| २०१४-१५ | १७.५० |
| २०१५-१६ | १८.५० |

(सी) गॅस टर्बाइन/कम्बाइन्ड सायकल निर्मिती केंद्रांकरिताः

रुपये लाख/ मेगावॅट

| आर्थिक वर्षे | गॅस टर्बाइन/कम्बाइन्ड सायकल निर्मिती केंद्रे | | लहान गॅस टर्बाइन निर्मिती केंद्रे (५० मेगावॅट युनिट आकारापेक्षा कमी ) |
|---|---|---|---|
| | दहा वर्षांच्या वॉरंटीसह सुटे भाग | दहा वर्षांच्या वॉरंटीशिवायचे सुटे भाग | वॉरंटीशिवायचे सुटे भाग |
| २०११-१२ | ७.४१ | ११.१० | १३.४७ |
| २०१२-१३ | ७.८३ | ११.७४ | १४.२४ |
| २०१३-१४ | ८.२८ | १२.४१ | १५.०५ |
| २०१४-१५ | ८.७५ | १३.१२ | १५.९१ |
| २०१५-१६ | ९.२५ | १३.८७ | १६.८३ |

## ४३ जल-विद्युत केंद्राच्या कामकाजाचे निकष

कामकाजाचे निकष खालीलप्रमाणे असतीलः

४३.१ वार्षिक स्थिर आकारांच्या वसुलीसाठी प्रमाणानुसार (एनएपीएएफ) प्लॅन्ट उपलब्धता घटक

| तपशील | प्रमाणानुसार प्लॅन्ट उपलब्धता घटक (एनएपीएएफ) |
|---|---|
| साठवणुकीचे आणि जलाशय प्रकाराचे संयत्र ज्याची पूर्ण रिझर्व्हायरची पातळी आणि किमान पाण्याची पातळी यामधील फरक ८ % पर्यंत आणि ज्याच्या प्लॅन्ट उपलब्धतेवर **सिल्टचा** परिणाम होत नाही | ९० % |
| साठवणुकीचे आणि जलाशय प्रकाराचे संयत्र ज्याची पूर्ण रिझर्व्हायरची पातळी आणि किमान पाण्याची पातळी यामधील फरक ८ % पेक्षा जास्त असेल आणि ज्याच्या प्लॅन्ट उपलब्धतेवर **सिल्टचा** परिणाम होत नाही | महिन्यागणिक जसजशी रिझर्व्हायरची पातळी कमी होत जाते तसतशी वीज निर्मिती क्षमतेत कपात करण्यासाठी एनएपीएएफ मध्ये संयत्र-विशिष्ट सूट देण्यासाठी तरतूद करावयाची आहे. सर्वसाधारण मार्गदर्शक सूत्र म्हणून, गुणकाच्या संदर्भात, निव्वळ पातळीच्या अंदाजित वार्षिक सरासरीपासून, खालील सूत्र वापरुन, ही सूट काढता येईल :<br>(Average head / Rated head) + 0.02<br>असा अंदाज करताना काही अडचण उद्‌भवल्यास, दुसरा मार्ग म्हणून खाली दाखविल्याप्रमाणे गुणक निश्चित करता येईलः<br>(Head at MDDL/Rated head) x 0.5 + 0.52 |
| जलाशय प्रकाराचे संयत्र, ज्याच्या प्लॅन्ट उपलब्धततेवर सिल्टचा लक्षणीय परिणाम होतो. | ८५ % |
| नदीच्या पाण्यावर चालणारे संयत्र | जेथे उपलब्ध/संबंधित असेल तेथे मागील अनुभवांद्वारे संयमित केलेल्या दहा दिवसांच्या डिझाईन उर्जा माहिती-संग्रहावर (डेटा) आधारित, प्लॅन्ट-सनिहाय निश्चित करणे. |

**४३.२ सहाय्यकारी उर्जा वापर**

(ए) जमिनीवरील **जल विद्युत** निर्मिती केंद्र

एक. जनरेटर शॅफ्टवर बसविलेल्या रोटेटिंग एक्साईटर्ससह-०.७ %

दोन. स्टॅटिक एक्सायटेशन यंत्रणेसहः १ %

(बी) जमिनीखालील जल विद्युत निर्मिती केंद्र

एक. जनरेटर शॅफटवर बसविलेल्या रोटेटिंग एक्साईटर्ससह - ०.९ %

दोन. स्टॅटिक एक्सायटेशन यंत्रणेसह : १.२ %

४३.३ रुपांतर हानि (ट्रान्सफॉर्मेशन लॉसेस)

निर्मिती व्होल्टेजपासून पारेषण व्होल्टेजपर्यंत-निर्माण केलेल्या उर्जेच्या ०.५%

## ४४ जल-विद्युत निर्मिती केंद्राकरिता संचालन व देखभाल खर्च

### ४४.१ विद्यमान केंद्रांसाठी:

(एक) लेखापरिक्षीत आर्थिक विवरण पत्रांवर आधारित असलेल्या दिनांक ३१ मार्च २००९ रोजी संपलेल्या तीन (३) वर्षांच्या संचालन व देखभालीवर झालेल्या प्रत्यक्ष खर्चाच्या सरासरीच्या तत्वावर आधारित, दुसऱ्या नियंत्रण कालावधीकरिता प्रमाणानुसार संचालन व देखभाल खर्च काढण्यात येतील व त्यामधून संचालन व देखभालीवर झालेले असाधारण खर्च, असल्यास, आयोगाच्या आवश्यक छाननीस अधीन राहून, वगळण्यात येतील.

(दोन) अशा संचालन व देखभाल खर्चाची सरासरी ही ३१ मार्च २००८ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षातील संचालन व देखभाल खर्च म्हणून विचारात घेण्यात येईल आणि त्यामध्ये, १ एप्रिल २०११ रोजी सुरु होणाऱ्या आधारभूत वर्षाकरिता संचालन व देखभाल खर्च काढण्यासाठी, संबंधित वर्षाकरिता आयोगाने मान्यता दिलेल्या वाढ - घटक दराने वाढ करण्यात येईल.

(तीन) संचालन व देखभाल खर्च पुढील प्रत्येक वर्षाकरिता, वर आर्थिक वर्ष २०१०-११ करिता निश्चित केलेल्या आधारभूत खर्चात नियंत्रण कालावधीतील प्रत्येक वर्षाकरिता अनुज्ञेय संचालन व

देखभाल खर्च काढण्यासाठी ५.७२ % या वाढ-घटक दराने, वाढ करण्यात येईल.

## ४४.२ नवीन केंद्रांकरिता

(१) कामकाजाच्या पहिल्या वर्षाकरिता संचालन व देखभाल खर्च हे मूळ प्रकल्प खर्चातील (पुनर्वसन आणि पुनर्वसाहत कामावरील खर्च वगळून) कामकाजाच्या पहिल्या वर्षासाठीच्या २ % दराने विनिर्दिष्ट करण्यात येतील.

(२) पुढील प्रत्येक वर्षांकरिता संचालन व देखभाल खर्च हे वरील आधारभूत खर्च, ५.७२ % या वाढ-घटक दराने वाढवून, निश्चित करण्यात येतील.

## ४५ औष्णिक निर्मिती केंद्रांकरिता वार्षिक स्थिर आकार आणि उर्जा आकार यांची परिगणना करणे व भरणा करणे

### (ए) वार्षिक स्थिर आकार

४५.१ या विनियमात विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या निकषावर आधारित एकूण वार्षिक स्थिर आकारांची परिगणना करण्यात येईल आणि त्यांची मासिक तत्वावर वसुली करण्यात येईल.

४५.२ विनियम ४०.१मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या उपलब्धता लक्ष्यानुसार संपूर्ण वार्षिक स्थिर आकार वसुली-योग्य राहतील. उपलब्धता लक्ष्यांच्या पातळीपेक्षा कमी पातळीवर वार्षिक स्थिर आकारांची वसुली **यथाप्रमाण** तत्वाच्या आधारे करण्यात येईल. उपलब्धता शून्य असल्यास, कोणतेही क्षमता आकार देय राहणार नाहीत.

४५.३ उपलब्धता लक्ष्यास अनुसरुन वर्षाच्या अखेरीस करावयाच्या समायोजनेस अधीन राहून, करारांतर्गत क्षमतेच्या प्रमाणात, वार्षिक स्थिर आकार समान हप्त्यांमध्ये मासिक तत्वावर अदा करण्यात येतील.

**ब. ऊर्जा आकार**

४५.४ ऊर्जा (अस्थिर) आकारांमध्ये उतरवणीसह इंधन खर्चाचा समावेश असेल आणि त्याची परिगणना खालीलप्रमाणे करण्यात येईल :-

ऊर्जा (अस्थिर) आकारांमध्ये इंधन खर्चाचा समावेश असेल व ते निर्मिती केंद्रापासून बाहेर पाठवलेल्या एक्स-बस ऊर्जा तत्त्वाच्या आधारे खालील सूत्रानुसार काढण्यात येतील.

ऊर्जा आकार (रुपये) = ऊर्जा आकारांचा प्रति युनिट रुपयांमधील दर x संबंधित महिन्यातील युनिट्स मधील (एक्स बस) ऊर्जा जी प्रत्यक्ष निर्मिती इतकी असेल.

४५.५ प्रति युनिट रुपयांमधील ऊर्जा आकारांचा दर (आरइसी) हा एक्स बस विजेचे एक युनिट पाठविण्यासाठी (डिलिव्हरी) लागणाऱ्या प्रमाणानुसार प्राथमिक व दुय्यम इंधन परिणामावरील खर्चाच्या बेरजेइतका असेल आणि त्याची परिगणना खालीलप्रमाणे करण्यात येईल.

$$REC = \frac{100\{P_p \times (Q_p)_n + P_s \times (Q_s)_n\}}{(100-(AUX_n))} \text{ (Rs/kWh)}$$

जेथे $P_p$ = प्राथमिक इंधन म्हणजे कोळसा किंवा लिग्नाइट किंवा वायू किंवा द्रव इंधन आणि चूना, लागू असल्यास यांची रुपये/किलोग्रॅम किंवा रुपये/घनमीटर किंवा रुपये/लिटर, जसे असेल तसे, मधील किंमत

$Q_p$ = किलोग्रॅम किंवा लिटर किंवा घनमीटर मध्ये, जसे असेल तसे, निर्मिती टर्मिनलमध्ये एक युनिट विजेच्या निर्मितीसाठी लागणाऱ्या प्राथमिक इंधनाचे परिमाण ज्याची परिगणना प्रमाणानुसार केंद्रातील एकूण उष्मांक दर (वजा कोळसा /लिग्नाइटवर आधारित निर्मिती केंद्रांच्या दुय्यम इंधन तेलामुळे **जमा झालेली** उष्णता) आणि कोळसा/ लिग्नाइट किंवा प्रज्वलित केलेल्या वायू आणि द्रव इंधनाचे एकूण कॅलरीफिक मूल्य यांच्या आधारे काढण्यात येईल.

$P_s$ = दुय्यम इंधन तेलाची रुपये/मि.लि मधील किंमत

$(Q_s)_n$ = दुय्यम इंधन तेलाचे मि.लि/युनिट मधील विनियम ४०.४ प्रमाणे प्रमाणानुसार परिमाण, जसे असेल तसे, आणि

$AUX_n$ = विनियम ४०.५ प्रमाणे एकूण निर्मितीच्या टक्केवारीमध्ये प्रमाणानुसार सहाय्यकारी ऊर्जा वापर, जसे असेल तसे,

देयके तयार करणे/इंधन अधिभार आकारणी यांच्या प्रयोजनासाठी ऊर्जा आकारांची परिगणना, प्रत्येक केंद्राच्या युनिटच्या प्रत्यक्ष वीज निर्मितीच्या आधारे भारांकित सरासरी दरावर आधारित केंद्र-निहाय, करण्यात येईल.

४५.६ इंधनांच्या किंमती किंवा उष्मांक मूल्यात होणाऱ्या बदलांमुळे ऊर्जा आकारांच्या दराचे (आरइसी) समायोजन (इंधन अधिभार समायोजन)

वीज निर्मिती केंद्रासाठी निर्मिती कंपनीने प्राप्त करुन घेतलेल्या आणि प्रज्वलित केलेल्या कोळसा/लिग्नाइट/तेल किंवा वायू किंवा द्रव इंधनाच्या शिल्लक साठ्याचे सरासरी एकूण कॅलरीफिक मूल्य आणि कोळसा/लिग्नाइट/तेल किंवा वायू किंवा द्रव इंधन प्राप्त करुन घेण्यासाठी निर्मिती कंपनीने केलेला भारांकित सरासरी उतरवणीसह खर्च, जसे असेल तसे, यांच्या आधारे कोळसा/लिग्नाइट/तेल किंवा वायू किंवा द्रव इंधन यांचे मान्यता दिलेले मूल्य आणि त्यांची किंमत यामधील फरकाचे समायोजन मासिक तत्त्वावर करण्यात येईल. निर्मिती कंपनी त्यांच्या देयकांमध्ये आयोगाने विनिर्दिष्ट केलेल्या प्राथमिक व दुय्यम इंधनाच्या बेस किंमतीनुसार ऊर्जा आकारांचा दर आणि इंधन अधिभार वेगवेगळा निर्देशित करेल. निर्मिती कंपनीने केलेली परिगणना आयोगास सहामाही तत्त्वावर इंधन अधिभार समायोजनेला कार्योत्तर मंजूरीसाठी सादर करेल.

४५.७ इंधनाचा उतरवणीसह खर्च

इंधनाच्या सर्वसमावेशक खर्चामध्ये, स्वामित्वधन, लागू असलेले कर व शुल्क, यासहीत इंधनाचा दर्जा/गुणवत्ता/कॅलरीफिक मूल्य, रेल्वे/रस्ते/गॅस पाइप वाहिनी किंवा अन्य कोणत्याही मार्गाने होणारा वाहतूक खर्च यांस अनुसरुन असलेल्या इंधन किंमतीचा समावेश असेल आणि ऊर्जा आकाराच्या परिगणनेच्या प्रयोजनासाठी, विनियम ४५.५ मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे संबंधीत महिन्यात इंधन पुरवठा कंपनीने पाठविलेल्या इंधन परिमाणाच्या टक्केवारीत प्रमाणानुसार मार्गस्थ व हाताळणीचे तोटे विचारात घेण्यात येतील.

## सी प्रोत्साहन अधिदान

४५.८ प्लॅन लोड फॅक्टर लक्ष्यानुसार एक्स बस ऊर्जेसाठीच्या निर्धारित निर्मिती पेक्षा अधिक असेलेल्या प्रत्यक्ष निर्मितीसाठी २५.० पैसे प्रति युनिट या सरसकट दराने प्रोत्साहन अधिदान देण्यात येईल;

परंतू असे की, प्रत्यक्ष वीज निर्मितीमध्ये महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राने विद्युत निर्मिती कमी करण्यासाठी दिलेल्या सूचनांमुळे झालेली निर्मितीवरील हानि देखील विचारात घेण्यात येईल;

प्रोत्साहन अधिदानाच्या रक्कमेची परिगणना आणि देयकात आकारणी, वर्षातील संबंधित महिन्याच्या अखेरीस असलेल्या संचयी तत्त्वावरील प्लॅन लोड फॅक्टरच्या आधारे, वर्षाच्या अखेरीस करावयाच्या समायोजनेस अधिन राहून, मासिक तत्त्वावर करण्यात येईल.

## ४६ जल-विद्युत निर्मिती केंद्रांसाठी क्षमता आकार आणि ऊर्जा आकार यांची परिगणना करणे व भरणा करणे

४६.१ जल-विद्युत निर्मिती केंद्रांच्या वार्षिक स्थिर आकारांची परिगणना वार्षिक तत्त्वावर या विनियमात विनिर्दिष्ट केलेल्या निकषांच्या आधारे करण्यात येईल आणि त्यांची वसूली क्षमता आकार (प्रोत्साहन अधिदानासह) आणि ऊर्जा आकार म्हणून मासिक तत्त्वावर करण्यात येईल व हे आकार लाभधारकाने निर्मिती केंद्रातील त्यांच्या हिश्श्याच्या प्रमाणात देय राहतील.

४६.२ जल-विद्युत निर्मिती केंद्राला एका कॅलेंडर महिन्यात देय असलेले क्षमता आकार (प्रोत्साहन अधिदानासह) खालील प्रमाणे असतील.

$$AFC \times 0.5 \times NDM / NDY \times (PAFM / NAPAF) \text{ (in Rupees)}$$

जेथे

AFC = संबंधित वर्षाकरीता विनिर्दिष्ट केलेला वार्षिक स्थिर खर्च, रुपयांमध्ये

NAPAF = प्रमाणानुसार प्लॅन उपलब्धना फॅक्टर, टक्केवारीमध्ये

NDM = महिन्यातील दिवसांची संख्या

NDY = वर्षातील दिवसांची संख्या

PAFM = संबंधित महिन्यात साध्य केलेला प्लॅन उपलब्धता फॅक्टर, टक्केवारी मध्ये

४६.३ PAFM ची परिगणना खालील सूत्राप्रमाणे करण्यात येईल.

$$PAFM = 10000 \times \sum_{i=1} DC_i / \{ N \times IC \times (100 - AUX) \} \%$$

जेथे

AUX = प्रमाणानुसार सहाय्यकारी ऊर्जा वापर टक्केवारी मध्ये

DC = महिन्यातील $i^{th}$ दिवसाकरीता केंद्राने कमीत कमी तीन (३) तासांसाठी पाठवावयाची (एक्स-बस मेगावॅट मधील) घोषित क्षमता, जी महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राने तो दिवस संपल्यानंतर प्रमाणित केली असेल.

IC = संपूर्ण निर्मिती केंद्राची (मेगावॅट मधील) स्थापित क्षमता

N = महिन्यातील दिवसांची संख्या

१३.१ प्रत्येक लाभधारकाला, परिगणना करण्यात आलेल्या ऊर्जा आकाराच्या दराने लाभधारकाला विद्युत केंद्रापासून एका कॅलेंडर महिन्यात पुरवठा करण्यात आलेल्या एकूण ऊर्जेसाठी ऊर्जा आकार भरणा करावे लागतील. एक महिन्यासाठी निर्मिती कंपनीला देय होणारे ऊर्जा आकार खालीलप्रमाणे असतील.

(Energy Charge Rate in Rs. / kWh) x { Energy (ex-bus)} for the month in kWh

४६.४ एक्स विद्युत संयंत्रापासूनच्या तत्वावर ऊर्जा आकारांचा दर प्रति युनिट रुपयांमध्ये, जल-विद्युत निर्मिती केंद्राकरिता, तीन दशांश स्थळांपर्यंत, खालील सूत्रानुसार निश्चित करण्यात येईल.

ECR = AFC x 0.5 x 10 / { DE x ( 100 – AUX )

जेथे,

DE = जल-विद्युत निर्मिती केंद्राकरिता विनिर्दिष्ट केलेली वार्षिक डिझाईन ऊर्जा MW/h मध्ये, खालील विनिमय ४६.६ मधील तरतुदींना अधीन राहून.

४६.५ जल-विद्युत निर्मिती केंद्राची एका वर्षात प्रत्यक्ष एकूण निर्माण झालेली ऊर्जा, जर निर्मिती केंद्राच्या नियंत्रणाबाहेरील कारणामुळे, डिझाईन ऊर्जेपेक्षा कमी असेल तर, या संदर्भात खालीलप्रमाणे कार्यवाही **रोलिंग तत्वावर** करण्यात येईलः

(एक) जर निर्मिती केंद्र वाणिज्यिकरित्या सुरु झाल्याच्या दिनांकापासून दहा वर्षाच्या आत वीज निर्मितीमध्ये तूट आली तर, ज्या वर्षी वीज निर्मितीत तूट आली असेल त्या वर्षाच्या पुढील वर्षाच्या ऊर्जा आकारांच्या दराही परिगणना विनियम ४६.५मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सूत्राच्या आधारे करण्यात येईल, असे करताना फेरबदल करुन त्या वर्षाची डिझाइन एनर्जी (डीई ) ही तूट आलेल्या वर्षातील प्रत्यक्ष ऊर्जा निर्मिती इतकी, मागील वर्षातील

ऊर्जा आकारातील तूट भरुन येईपर्यंत, विचारात घेण्यात येईल, आणि त्यानंतर नेहमीचा ऊर्जा आकाराचा दर लागू राहील;

(दोन) निर्मिती केंद्राचे वाणिज्यिकरित्या कामकाज सुरु झाल्याच्या दिनांकापासून दहा वर्षानंतर वीज निर्मितीमध्ये तूट आली तर या संबंधात खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येईलः

समजा, केंद्राची विनिर्दिष्ट करण्यात आलेली वार्षिक डिझाईन एनर्जी (DE) ही DE MWh, आहे आणि संबंधित पहिल्या आणि दुसऱ्या आर्थिक वर्षांत प्रत्यक्ष निर्माण झालेली ऊर्जा ही A1 and A2 MWh इतकी अनुक्रमे आहे, आणि A1 ही DE पेक्षा कमी आहे, त्यानंतर, तिसऱ्या आर्थिक वर्षाकरिता ऊर्जा आकारांच्या दराची परिगणना करण्यासाठी विचारात घ्यावयाची डिझाईन एनर्जी ही (A1 + A2 – DE) MWh , कमाल DE MWh आणि किमान A1 MWh. अधीन राहून इतकी संयमित करण्यात येईल;

(तीन) केंद्राकडून बाहेर पाठवण्यात आलेल्या नक्त मीटरवर नोंदलेल्या ऊर्जेला 100 / (100 – AUX) ने गुणून, प्रत्यक्ष निर्माण झालेली ऊर्जा (e.g., A1, A2) काढण्यात येईल;

४६.६ जर, विद्युत निर्मिती केंद्रांचा ऊर्जा आकारांचा दर, वरील विनियम **१३.५** मध्ये परिगणना केल्याप्रमाणे प्रति युनिट ८० पैशांनी जास्त असेल, आणि प्रत्यक्ष विक्री योग्य ऊर्जा एका वर्षात { DE x ( 100 – AUX ) / 10000 } MWh, पेक्षा जास्त असेल तर, वरील पेक्षा जास्त असलेल्या ऊर्जेसाठी देयकात फक्त प्रति युनिट ऐशी (८०) पैसे ऊर्जा आकार लावण्यात येईल;

परंतु असे की, ज्या वर्षात एकूण ऊर्जेची निर्मिती ही डिझाईन ऊर्जेपेक्षा निर्मिती कंपनीच्या नियंत्रणाबाहेरील कारणामुळे कमी झाली असेल त्याच्या पुढील वर्षात तर मागील वर्षाच्या ऊर्जा आकारातील तूट भरुन काढल्यानंतर ऊर्जा आकार दर प्रति युनिट ऐशी (८०) पैसे **पर्यंत** कमी करण्यात येईल.

४६.७ महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र लाभधारकांशी विचार-विनिमय करुन, उपलब्ध म्हणून घोषित करण्यात आलेल्या सर्व ऊर्जेचा **जास्तीत जास्त** उपयोग करण्यासाठी, जलविद्युत निर्मिती केंद्रांच्या वेळापत्रकास अंतिम स्वरुप देईल. ज्याची **आखणी** सर्व लाभधारकांना विद्युत केंद्रातील करण्यात आलेल्या त्यांच्या संबंधित वाटपांच्या प्रमाणात करण्यात येईल.

## ४७ घोषित क्षमता सिध्द करुन दाखविणे

४७.१ राज्यभार प्रेषण केंद्राला जेव्हा पाहिजे असेल तेव्हा विद्युत निर्मिती कंपनीला त्यांच्या निर्मिती केंद्राची घोषित क्षमता सिध्द करुन दाखवावी लागेल. जर निर्मिती कंपनी घोषित क्षमता सिध्द करुन दाखवू शकली नाही, तर निर्मिती कंपनीला देय असलेला क्षमता आकार, दंड म्हणून कमी करण्यात येईल.

४७.२ दिवसाच्या कोणत्याही कालावधीत/गटाकरिता पहिल्या चुकीच्या घोषणेकरिता दंडाचे परिमाण हे दोन दिवसाच्या स्थिर आकाराइतके असेल. दुसऱ्या चुकीच्या घोषणेसाठी दंड चार दिवसांच्या स्थिर आकारांइतका तर वर्षातील पुढील चुकीच्या घोषणांसाठी दंड **भूमितीय** प्रमाणात वाढता राहील.

४७.३ विद्युत निर्मिती केंद्रांची कामाची नोंदवही महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राला पुर्नविलोकनासाठी उपलब्ध राहील. या नोंदवहीमध्ये यंत्राच्या कामाची व देखभालीची माहिती ठेवण्यात येईल.

## ४८ देयक तयार करणे आणि आकारांचा भरणा करणे

४८.१ औष्णिक विद्युत निर्मिती केंद्रांकरिता वार्षिक स्थिर आकार, ऊर्जा आकार, इंधन अधिभार समायोजन आणि प्रोत्साहन अधिभार यांची देयके तयार करणे व त्यांचा भरणा, मासिक तत्वावर, वर्षाच्या अखेरीस करण्यात यावयाच्या समायोजनांना अधीन राहून, करण्यात येईल.

४८.२ जल-विद्युत निर्मिती केंद्रांच्या क्षमता आकारांची आणि ऊर्जा आकारांची देयके तयार करणे व त्यांचा भरणा मासिक तत्वावर करण्यात येईल.

## भाग- जी : पारेषण

## ४९ व्याप्ती

**४९.१** या विनियमांच्या अधिसूचनेच्या दिनांकाच्या दिवशी किंवा त्यानंतर पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याबरोबर करण्यात आलेल्या ठोक वीज पारेषण करार किंवा अन्य व्यवस्थेच्या संदर्भात पारेषण परवानाधारकाच्या राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेत प्रवेश आणि वापरासाठीचे दर निश्चित करण्याकरिता या भागात करण्यात आलेले विनियम लागू राहतील.

परंतु असे की, प्रकरणाची परिस्थिती लक्षात घेऊन योग्य वाटल्यास या भागात नमूद केलेल्या निकषांपेक्षा वेगळे निकष आयोग स्वीकारु शकेल किंवा विशिष्ट प्रकरणी पर्यायी निकष ठरवून देऊ शकेल;

परंतु आणखी असे की, असे वेगळे निकष स्वीकारण्याबाबतची कारणे लेखी नोंदवण्यात येतील;

परंतु आणखी असे की, विद्यमान पारेषण यंत्रणेच्या बाबतीत, आयोग, अशा पारेषण यंत्रणेची मागील कामगिरी विचारात घेऊन आणि व्यवसाय आराखडा आणि पारेषण परवानाधारकाने एकूण महसुली गरज निश्चित करण्यासाठी नियंत्रण कालावधीच्या सुरुवातीला सादर केलेल्या अर्जाच्या आधारे, कामगिरीत सुधारणा करण्यास योग्य संधी, असल्यास, देऊन, दर निश्चित करेल.

परंतु आणखी असे की, नियंत्रण कालावधी संपण्यापूर्वी विद्यमान यंत्रणेमध्ये जर नवीन पारेषण परवानाधारकाने नवीन पारेषण यंत्रणा उभारली तर, आयोग, नियंत्रण कालावधीतील उर्वरित वर्षांकरिता अशा पारेषण यंत्रणेची वार्षिक कामगिरी विचारात घेऊन आणि व्यवसाय आराखड्याच्या आणि नियंत्रण कालावधीतील उरलेल्या उर्वरित वर्षांकरिता एकूण महसुली गरज निश्चित करण्यासाठी पारेषण परवानाधारकाने सादर केलेला अर्जाच्या आधारे, दरांची फेर-निश्चिती करेल.

४९.२ अधिनियमांच्या कलम ३६च्या परंतुकाखाली, मधली पारेषण सुविधा वापरण्यासाठी परवानाधारकाने सादर केलेल्या अर्जाच्या संदर्भात, दर, आकार, अटी आणि शर्ती ठरविताना या भागात अंतर्भूत असलेल्या अटी व शर्तींचे आयोग मार्गदर्शन घेईल.

## ५० वीज दराचे भाग

५०.१ पारेषण परवानाधारकांच्या राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेमध्ये प्रवेश मिळविण्याकरीता व यंत्रणेचा वापर करण्यासाठी निश्चित करावयाच्या पारेषण आकारांमध्ये खालील पैकी कोणत्याही भागांचा किंवा खालील पैकी एकत्रीत केलेल्या भागाच्या संयोगांचा समावेश असेल.

(ए) पारेषण यंत्रणा प्रवेश आकार;

(बी) वार्षिक पारेषण आकार;

(सी) पारेषित केलेल्या ऊर्जेसाठी प्रति युनिट आकार; आणि

(डी) रिॲक्टीव्ह ऊर्जा आकार;

## पारेषण यंत्रणा प्रवेश आकार

५०.२ राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेमध्ये प्रवेश मिळविण्यासाठी अर्ज करण्याकरीता पात्र असलेल्या कोणत्याही व्यक्तीस वेळोवेळी सुधारणा केलेल्या महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (पारेषण मुक्त प्रवेश) विनियम, २००५ नुसार प्रवेश मिळविण्याचा हक्क राहील आणि या विनियमात असा प्रवेश मिळविण्यासाठी विनिर्दिष्ट केलेला आकारांचा भरणा करण्यास तो जबाबदार राहील.

स्पष्टीकरण- या विनियमांच्या प्रयोजनार्थ, अशी व्यक्ति, जिने पारेषण मुक्त प्रवेशासाठी पात्र असल्यामुळे पारेषण क्षमता हक्कांचे वाटप करण्यासाठी अर्ज केला आहे आणि जिने असा प्रवेश मिळविण्यासाठी कामे करण्याचे मान्य केले आहे, अशा व्यक्तीस येथून पुढे 'इच्छुक पारेषण यंत्रणा उपयोगकर्ता' म्हणून संबोधण्यांत येईल, आणि त्यात, ज्याने वाटप करण्यात आलेल्या पारेषण क्षमता हक्कांमध्ये वाढ करण्यासाठी अर्ज केला आहे अशा विद्यमान पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्यांचाही, समावेश होऊ शकेल.

५०.३ जेव्हा इच्छूक पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याच्या राज्यांतर्गत प्रवेशासाठी जर अशा उपयोगकर्त्यासाठी स्वतंत्र पारेषण वाहिन्या किंवा इतर पारेषण मत्ता उभारण्याचे काम करावे लागले तर, पारेषण परवानाधारकास अशा इच्छूक पारेषण यंत्रणा उपायोगकर्त्यास प्रवेश देण्यासाठी केलेल्या सर्व वाजवी कामांवर झालेला खर्च पारेषण यंत्रणा प्रवेश आकाराद्वारे वसूल करण्याचा हक्क राहील.

५०.४ जेव्हा इच्छूक पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याच्या प्रवेशामुळे, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेशी संबंधित परंतु विनियम ५०.२ खाली न येणारी अशी कामे करणे आवश्यक असेल तेव्हा पारेषण परवानाधारक अशा कामांवर झालेला खर्च, खालील विनियम ५०.१० नुसार, वार्षिक पारेषण आकारांद्वारे नियंत्रण कालावधीतील प्रत्येक वर्षात वसूल करेल.

५०.५ जर प्रवेश मिळविण्यासाठीची कोणतीही कामे इच्छूक पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याने केलेली असतील तर पारेषण परवानाधारकास अशी कामे करुन घेण्यासाठी लावलेल्या कामगारांवरील खर्चाच्या १५% दराने पर्यवेक्षण आकार वसूल करण्याचा हक्क राहील आणि इच्छूक पारेषण यंत्रणा

उपयोगकर्त्याने करुन घेतलेल्या अशा कामासंबंधात त्याला अन्य कोणताही खर्च वसूल करण्याचा हक्क असणार नाही.

५०.६ राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेत द्यावयाच्या प्रवेशासाठी केलेल्या कामांची देखभाल, पारेषण परवानाधारक आणि पारेषण यंत्रणा उपयोगकर्ता यांच्यातील ठोक वीज पारेषण कराराच्या कालावधीत, पारेषण परवानाधारकाकडून करण्यात येईल.

५०.७ राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेतील प्रवेशासाठी केलेल्या कामासाठीच्या खर्चाची रक्कम जर पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याने अदा केली असेल तर ठोक वीज पारेषण कराराच्या समाप्तीनंतर पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याचा त्याने खर्च केलेल्या अशा कामांच्या **घटीत** मूल्यावर हक्क राहील;

परंतु असे की, पारेषण परवानाधारकाच्या राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेत प्रवेश मिळावा म्हणून जर पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याने कामे केली असतील तर ठोक वीज पारेषण कराराच्या समाप्तीनंतर अशी कामे ठेवून घेण्याचा त्याला हक्क राहील.

५०.८ ठोक वीज पारेषण करारांतील अटीनुसार, पारेषण यंत्रणा प्रवेश आकार खालीलपैकी कोणत्याही एका पद्धतीने वसूल करता येऊ शकतील :-

(ए) प्रवेश मिळविण्याच्या वेळी पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याने एकदाच रक्कम अदा करुन; किंवा

(बी) ठोक वीज पारेषण कराराच्या कालावधीत अनेक **हप्त्यात** रक्कम अदा करुन; किंवा

(सी) वरील (ए) आणि (बी) च्या कोणत्याही संयोगाद्वारे.

५०.९ पारेषण परवानाधारक आणि इच्छूक पारेषण यंत्रणा उपयोगकर्ता यांच्यात इच्छूक पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्यास प्रवेश देण्यासाठी करावयाच्या कामांसंबंधी किंवा पारेषण यंत्रणा प्रवेश आकाराबाबत जर कोणताही वाद निर्माण झाला तर तो आयोगाकडे किंवा ठरवून देण्यात येईल अशा अन्य मंचाकडे अभिनिर्णयासाठी संबोधण्यात येईल.

**<u>नियंत्रण कालावधीतील प्रत्येक वर्षाकरीता वार्षिक पारेषण आकार</u>**

५०.१० नियंत्रण कालावधीतील प्रत्येक आर्थिक वर्षाच्या वार्षिक पारेषण आकारातून नियंत्रण कालावधीतील संबंधित आर्थिक वर्षाकरीता पारेषण परवानाधारकाच्या आयोगाने मान्यता दिलेल्या एकूण महसूली गरजेच्या रक्कमेमधून वीज दरा व्यतिरिक्त उत्पन्न आणि अन्य व्यवसायापासून मिळालेले उत्पन्न वजा करुन

उरलेली रक्कम वसूल करण्याची तरतूद असेल आणि त्यामध्ये खालील बाबींचा समावेश असेलः-

एकूण महसूली गरज :

(ए) गुंतवलेल्या भांडवलावरील परतावा;

(बी) घसारा;

(सी) संचालन व देखभाल खर्च;

(डी) खेळते भांडवल आणि पारेषण यंत्रणा उपयोग कर्त्यांच्या ठेवीवरील व्याज; आणि

(इ) आकस्मिक निधीच्या वर्गणीचे समायोजन;

वार्षिक पारेषण आकार = वरील प्रमाणे एकूण महसूली गरज, वजा :

(एफ) वीज दरा व्यतिरिक्त उत्पन्न; आणि

(जी) या विनियमात विनिर्दिष्ट केलेल्या मर्यादेपर्यंत, अन्य व्यवसायापासूनचे उत्पन्न

परंतु असे की, अधिनियमाच्या कलम ६३ आणि पारेषणासाठी स्पर्धात्मक बोली करीता मार्गदर्शक सूत्रानुसार, स्पर्धात्मक पद्धतीने **मंजूर** करण्यात आलेल्या पारेषण यंत्रणा प्रकल्पांकरीता, वार्षिक पारेषण आकार हे स्पर्धात्मक पद्धतीने मंजूर करण्यात आलेल्या पारेषण प्रकल्पानी बोलीत नमूद केलेल्या वार्षिक पारेषण सेवा आकारांप्रमाणे असतील.

५०.११ या विनियमांच्या भाग-सी नुसार पारेषण परवानाधारकाने एकूण महसूली गरज निश्चित करण्यासाठी केलेला अर्ज किंवा स्पर्धात्मक पद्धतीने **मंजूर** करण्यात आलेल्या पारेषण यंत्रणा प्रकल्पांच्या बाबतीत वार्षिक पारेषण आकार स्वीकारण्यासाठी केलेला अर्ज, जसे असेल तसे, यांच्या आधारे आयोगाकडून पारेषण परवानाधारकाचे वार्षिक पारेषण आकार निश्चित करण्यात येतील.

## ५१ बहु-वर्षीय वीज दर

५१.१ आयोगाने सूट दिलेली असल्यास अशी प्रकरणे वगळून, या विनियमाच्या भाग-सी मध्ये अंतर्भूत असलेले विनियम १ एप्रिल, २०११ पासून राज्यातील सर्व पारेषण परवानाधारक आणि पारेषण यंत्रणा उपयोगकर्ते, यांना लागू राहतील.

## ५२ वित्तीय तत्त्वे

५२.१ आयोगाने सूट दिलेली असल्यास अशी प्रकरणे वगळून, या विनियमाच्या भाग-इ मध्ये अंतर्भूत असलेले विनियम १ एप्रिल, २०११ पासून राज्यातील सर्व पारेषण परवानाधारकाना लागू राहतील.

## ५३ व्यवसाय आराखडा

५३.१ या विनियमांच्या भाग-बी मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या पद्धतीनुसार, प्रत्येक परवानाधारक आयोगाने वेळोवेळी ठरवून दिलेल्या तपशीलासह व्यवसाय आराखडा सादर करेल.

## ५४ भांडवल गुंतवणूक योजना

५४.१ पारेषण परवानाधारक व्यवसाय आराखड्यासह भांडवल गुंतवणूक योजना त्याच्या प्रस्तावित भांडवली खर्चाच्या प्रकल्पांच्या तपशीलासह आयोगाला सादर करेल;

परंतु असे की, भांडवल गुंतवणूक योजना दुसऱ्या नियंत्रण कालावधीच्या प्रत्येक वर्षासाठी सादर करण्यात येईल.

५४.२ पारेषण परवानाधारकाची राज्यांतर्गत पारेषण यंत्रणा मजबुत करण्यासाठी व त्यात वाढ करण्यासाठी करावा लागणाऱ्या गुंतवणूकीसाठीची कमीत कमी खर्चाची भांडवल गुंतवणूक योजना असेल.

५४.३ भांडवल गुंतवणूकीच्या योजनेमध्ये रुपये दहा (१०) कोटीपेक्षा अधिक रकमेच्या सर्व भांडवली खर्च प्रकल्पांचा समावेश असेल आणि आयोग वेळोवेळी ठरवून देईल त्या नमुन्यामध्ये योजना तयार करण्यात येतील.

५४.४ भांडवल गुंतवणूक योजनेमध्ये आवश्यक असलेली सर्व माहिती, तपशील आणि दस्तऐवजांचा समावेश असेल व ही माहिती फक्त, बेजची संख्या, नाव, अंतर्गत भागांची रचना आणि ग्रिडच्या उप-केंद्रांची ठिकाणे, उप-केंद्रांची क्षमता (एमव्हीए), पारेषण वाहिनीची लांबी (सीकेटी-केएम) ज्यावरुन प्रस्तावित गुंतवणूकीची गरज स्पष्ट होईल, विचारात घेतलेले पर्याय, खर्च/लाभ विश्लेषण आणि ज्यांचा पारेषण आकाराशी संबंध येत असेल अशा अन्य बाबी, यांच्यापुरती मर्यादीत राहणार नाही.

५४.५ पारेषण परवानाधारकाची भांडवल गुंतवणूक योजना, वेळोवेळी सुधारित केलेल्या महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (पारेषण मुक्त प्रवेश) विनियम,२००५ नुसार राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेसाठी विकसित केलेल्या पारेषण यंत्रणा योजनेशी सुसंगत असेल.

५४.६ आयोग, प्रस्तावित खर्चाची योग्यायोग्यता आणि विनियम ७ नुसार पारेषण आकारावरील अंदाजित परिणाम विचारात घेऊन, पारेषण परवानाधारकाने व्यवसाय आराखड्यासह सादर केलेल्या भांडवल गुंतवणूक योजनेचा आढावा घेईल.

५४.७ पारेषण परवानाधारक, एकूण महसूली गरज निश्चित करण्यासाठीच्या अर्जासोबत किंवा कामगिरीच्या मध्यवधी आढाव्यासाठीच्या अर्जासोबत, जसे असेल तसे, आयोगाला भांडवली खर्च प्रकल्पांच्या प्रगतीचा पडताळणी घेण्यासाठी आवश्यक अशी माहिती म्हणजेच भांडवली खर्च प्रकल्पांची प्रगती व त्यासह अन्य माहिती, तपशील व दस्तऐवज सादर करेल.

## ५५ भांडवली खर्च

५५.१ वीज दराच्या निश्चितीकरणाच्या प्रयोजनासाठी, पारेषण प्रकल्पाचा भांडवली खर्च आणि त्याचे अतिरिक्त भांडवलीकरण, यांना अनुक्रमे विनियम २६ आणि विनियम २७ अंतर्गत असलेल्या तरतूदीनुसार **परवानगी** देण्यात येईल.

५५.२ भांडवली खर्चाच्या प्रकल्पांचा मूळ खर्च आणि/किंवा भांडवलीकृत केलेल्या स्थिर मत्तांचा मूळ खर्च निश्चित करण्यासाठी, भारतीय सनदी लेखापालांच्या संस्थेच्या स्थिर मत्तांसाठीच्या लेखे या संबंधातील-लेखा मानक (एएस-१०) मधील वेळोवेळी सुधारीत केलेल्या तरतूदी, या विनियमांशी विसंगत नसतील त्या मर्यादेपर्यंत, लागू राहतील.

५५.३ विनियम २९ मधील विनियमित बेस दराची परिगणना करण्याच्या प्रयोजनासाठी, अशा प्रकल्पाच्या मूळ खर्चामधून, पारेषण यंत्रणा उपयोग कर्त्याने पारेषण परवानाधारकाच्या राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेमध्ये प्रवेश मिळण्यासाठी केलेल्या कामावरील खर्चाची रक्कम वजा करण्यात येईल.

## ५६ काम करण्याचे निकष

५६.१ वार्षिक पारेषण आकारांच्या पूर्ण वसुलीसाठी उपलब्धता लक्ष्य

(ए) ए सी यंत्रणा : ९८ %

(बी) एच व्ही डी सी बाय-पोल्स लिंक्स आणि
एच व्ही डी सी बॅक टू बॅक केंद्रे : ९५ %

**टिपणी १ :**

उपलब्धता लक्ष्यापेक्षा कमी पातळीवरील वार्षिक पारेषण आकारांची वसूली ही **यथा-प्रमाण** तत्त्वावर करण्यात येईल. उपलब्धता शून्य असताना, कोणतेही पारेषण आकार देय नसतील.

**टिपणी २ :**

उपलब्धता लक्ष्याची परिगणना या विनियमांच्या सोबत जोडलेल्या **जोडपत्र २** मधील कार्यपद्धतीनुसार करण्यात येईल आणि ती महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्रातर्फे प्रमाणित करण्यात येईल.

५६.२ पारेषण परवानाधारकाला उपलब्धता लक्ष्यांच्या पलिकडे वार्षिक उपलब्धता साध्य करण्यासाठी, खाली नमूद केलेल्या सूत्रानुसार, प्रोत्साहन-अधिदान मिळण्याचा हक्क राहील.

प्रोत्साहन-अधिदान = वार्षिक पारेषण आकार x (साध्य केलेली वार्षिक उपलब्धता - उपलब्धता लक्ष्य) / उपलब्धता लक्ष्य;

जेथे,

वार्षिक पारेषण आकार हे राज्यातील विशिष्ट पारेषण परवानाधारकाकरिता नियंत्रण कालावधीतील प्रत्येक वर्षाच्या एकूण महसूली गरजेशी सुसंगत असतील, जसे असेल तसे ;

परंतु असे की, ए सी यंत्रणेकरीला ९९.७५ % पेक्षा आणि एच व्ही डी सी यंत्रणेकरीता ९८.५ % जास्त असलेल्या उपलब्धतेसाठी कोणतेही प्रोत्साहन-अधिदान देय नसेल;

परंतु आणखी असे की, द्यावयाच्या/ न द्यावयाच्या प्रोत्साहन-अधिदानांची परिगणना कामगिरीच्या मध्यावधी आढाव्याच्या वेळी आणि नियंत्रण कालावधीच्या अखेरीस हाती घेण्यात येईल.

## ५७ एकूण महसूली गरजेची परिगणना

५७.१ एकूण महसूली गरजेच्या परिगणनेत खालील बाबी समाविष्ट असतील.

(ए) गुंतवलेल्या भांडवलावरील परतावा;

(बी) घसारा;

(सी) संचालन व देखभाल खर्च;

(डी) खेळते भांडवल आणि पारेषण यंत्रणा उपयोग कर्त्याच्या ठेवीवरील व्याज; आणि

(इ) आकस्मिक निधीच्या वर्गणीचे समायोजन; वजा :

(एफ) वीज दरा व्यतिरिक्त उत्पन्न; आणि

(जी) या विनियमात विनिर्दिष्ट केलेल्या मर्यादेपर्यंत, अन्य व्यवसायापासूनचे उत्पन्न

५७.२ गुंतविलेल्या भांडवलावरील परतावा

५७.२.१ या विनियमांच्या विनियम २९ मध्ये विनिर्दिष्ट केल्या प्रमाणे वितरण परवानाधारकाला त्याने गुंतविलेल्या भांडवलावर परतावा अनुज्ञेय असेल.

५७.३ घसारा

५७.३.१ या विनियमांतील विनियम ३० मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे पारेषण व्यवसायात वापरलेल्या स्थिर मत्तांच्या मूल्यावरील घसाऱ्याची वसूली करण्यास पारेषण परवानाधारकाला परवानगी देण्यात येईल.

५७.४ संचालन व देखभाल खर्च

५७.४.१ विद्युमान आणि नवीन पारेषण परवानाधारकांकरीता नियंत्रण कालावधीसाठी पारेषण परवानाधारकाच्या पारेषण वाहिन्यांची सर्कीट किलोमीटर मधील **लांबी**, आणि बेसची संख्या यांच्या आधारे खाली दाखविल्याप्रमाणे संचालन व देखभाल खर्चाचे निकष ठरविण्यात आले आहेतः

**स्पष्टीकरण :** या विनियमांतर्ग प्रमाणानुसार संचालन व देखभाल खर्च निश्चित करण्यासाठीच्या प्रयोजनासाठी, 'बे' याचा अर्थ उपकरणांचा संच जे वितरण परवानाधारकाच्या उप-केंद्रातील बसच्या ठिकाणापासून निघणाऱ्या विद्युत उपकरण जसे पारेषण वाहिनी, बस सेक्शन ब्रेकर्स, पोटेन्शिअल ट्रान्सफर्मार, पॉवर ट्रान्सफॉर्मर्स्, कॅपॅसिर्टस् आणि ट्रान्सफर ब्रेकर आणि फीडर यांना जोडण्यासाठी आवश्यक असतील. तसेच येथे संबोधित करण्यात आलेल्या बे मध्ये फक्त पारेषण उप-केंद्रात असलेल्या बे चा समावेश असेल आणि त्यातून निर्मिती केंद्रातील स्विचयार्ड मधील कोणतीही बे, ज्याची देखभाल करण्याची जबाबदारी नेहमी निर्मिती कंपनीची असते, वगळण्यात येतील.

५७.५ विद्यमान पारेषण परवानाधारक

## महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लि. ( महापारेषण कंपनी)

| व्होल्टेज पातळी | नियंत्रण कालावधीतील पहिले वर्ष (आर्थिक वर्ष २०११-१२) | नियंत्रण कालावधीतील दुसरे वर्ष (आर्थिक वर्ष २०१२-१३) | नियंत्रण कालावधीतील तीसरे वर्ष (आर्थिक वर्ष २०१३-१४) | नियंत्रण कालावधीतील चवथे वर्ष (आर्थिक वर्ष २०१४-१५) | नियंत्रण कालावधीतील पाचवे वर्ष (आर्थिक वर्ष २०१५-१६) |
|---|---|---|---|---|---|
| **रुपये लाख/सीकेटी कि.मी** | | | | | |
| एचडीव्हीसी रु.१ लाखात | १४९२ | १५७७ | १६६७ | १७६३ | १८६३ |
| ७६५ केव्ही | ०.६४ | ०.६८ | ०.७२ | ०.७६ | ०.८० |
| ४०० केव्ही | ०.४६ | ०.४८ | ०.५१ | ०.५४ | ०.५७ |
| > ६६ केव्ही आणि < ४०० केव्ही | ०.१८ | ०.१९ | ०.२० | ०.२२ | ०.२३ |
| ६६ केव्ही आणि त्यापेक्षा कमी | ०.११ | ०.१२ | ०.१२ | ०.१३ | ०.१४ |
| **रु लाख/बे** | | | | | |
| ७६५ केव्ही | १२१.३५ | १२८.२९ | १३५.६३ | १४३.३९ | १५१.५९ |
| ४०० केव्ही | ८६.६९ | ९१.६५ | ९६.८९ | १०२.४३ | १०८.२९ |
| > ६६ केव्ही आणि < ४०० केव्ही | १२.५६ | १३.२८ | १४.०४ | १४.८५ | १५.६९ |
| ६६ केव्ही आणि त्यापेक्षा कमी | २.६३ | २.७८ | २.९३ | ३.१० | ३.२८ |

**टाटा पॉवर कं.- पारेषण (टीपीसी - टी)**

| व्होल्टेज पातळी | नियंत्रण कालावधीतील पहिले वर्षे (आर्थिक वर्षे २०११-१२) | नियंत्रण कालावधीतील दुसरे वर्षे (आर्थिक वर्षे २०१२-१३) | नियंत्रण कालावधीतील तीसरे वर्षे (आर्थिक वर्षे २०१३-१४) | नियंत्रण कालावधीतील चवथे वर्षे (आर्थिक वर्षे २०१४-१५) | नियंत्रण कालावधीतील पाचवे वर्षे (आर्थिक वर्षे २०१५-१६) |
|---|---|---|---|---|---|
| **रुपये लाख/सीकेटी कि.मी** | | | | | |
| > ६६ केव्ही आणि < ४०० केव्ही | १.०८ | १.१४ | १.२१ | १.२८ | १.३५ |
| **रु लाख/बे** | | | | | |
| > ६६ केव्ही आणि < ४०० केव्ही | ३१.५८ | ३३.३८ | ३५.२९ | ३७.३१ | ३९.४५ |
| ६६ केव्ही आणि त्यापेक्षा कमी | ६.६० | ६.९८ | ७.३८ | ७.८० | ८.२४ |

रिलायन्स इन्फास्ट्रक्चर लि.-पारेषण (आर-इन्फ्रा-टी)

| व्होल्टेज पातळी | नियंत्रण कालावधीतील पहिले वर्ष (आर्थिक वर्ष २०११-१२) | नियंत्रण कालावधीतील दुसरे वर्ष (आर्थिक वर्ष २०१२-१३) | नियंत्रण कालावधीतील तीसरे वर्ष (आर्थिक वर्ष २०१३-१४) | नियंत्रण कालावधीतील चवथे वर्ष (आर्थिक वर्ष २०१४-१५) | नियंत्रण कालावधीतील पाचवे वर्ष (आर्थिक वर्ष २०१५-१६) |
|---|---|---|---|---|---|
| **रुपये लाख/सीकेटी कि.मी** | | | | | |
| > ६६ केव्ही आणि < ४०० केव्ही | ०.३३ | ०.३५ | ०.३७ | ०.३९ | ०.४१ |
| **रु लाख/बे** | | | | | |
| > ६६ केव्ही आणि < ४०० केव्ही | १५.४२ | १६.३० | १७.२३ | १८.२२ | १९.२६ |
| ६६ केव्ही आणि त्यापेक्षा कमी | ३.२२ | ३.४१ | ३.६० | ३.८१ | ४.०३ |

५७.६ नवीन पारेषण परवानाधारकासाठी संचालन व देखभालीचे निकष

५७.६.१ नवीन पारेषण परवानाधारकांसाठी , महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण लि.करिता ठरवून देण्यात आलेले वर्ष-निहाय संचालन व देखभालीचे निकष हे अशा नवीन परवानाधारकाने पुढील नियंत्रण कालावधीतील संबंधित वर्षात भर घातलेल्या पारेषण मत्तांसाठी लागू असतील.

परंतु असे की, हे निकष स्पर्धात्मक बोली प्रक्रियेच्या आधारे **मंजूरी** दिलेल्या नवीन प्रकल्पांना लागू नसतील.

स्पष्टीकरण - ''नवीन पारेषण परवानाधारक'' म्हणजे पारेषण परवानाधारक ज्याला या विनियमांच्या प्रभावी दिनांकापूर्वी किंवा त्यानंतर आयोगाने पारेषण परवाना मंजूर केला आहे आणि ज्याच्या पारेषण प्रकल्पातील मत्ता ३१ मार्च २०१० नंतर कार्यान्वित झाल्या आहेत.

५७.७ खेळते भांडवलावरील व्याज

५७.७.१ या विनियमातील विनियम ३१ मध्ये ठरवून देण्यात आलेल्या अंदाजित खेळते भांडवलावर पारेषण परवानाधारकाला व्याज अनुज्ञेय राहील.

५७.८ आस्कमिक निधीच्या वर्गणीचे समायोजन

५७.८.१ या विनयमांच्या विनियम ३२ मध्ये विनिर्दिष्ट केल्या प्रमाणे, पारेषण परवानाधारकाला राखीव निधीच्या संबंधात एकूण महसूली गरजेमध्ये समायोजन करण्यास परवानगी देण्यात येईल.

## ५८ वीज दरा व्यतिरिक्त उत्पन्न

५८.१ पारेषण व्यवसायाच्या संबंधात आयोगाने मान्यता दिलेली लीज दरा व्यतिरिक्त उत्पन्नाची रक्कम, पारेषण परवानाधारकाचे वार्षिक पारेषण आकार निश्चित करताना एकूण महसूली गरजेतून कमी करण्यात येईल;

परंतु असे की, पारेषण परवानाधारक एकूण महसूली गरज निश्चित करण्यासाठी सादर करावयाच्या अर्जासोबत व्याज दरा व्यतिरिक्त उत्पन्नाचा पूर्ण तपशील आयोगाला सादर करेल.

## ५९ अन्य व्यवसायापासूनचे उत्पन्न

५९.१ पारेषण परवानाधारक जर अन्य कोणताही व्यवसाय करीत असेल तर, अशा अन्य व्यवसायापासून मिळालेल्या महसूलातून अशा अन्य व्यवसायाशी संबंधित असलेले सर्व प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष खर्च वजा करुन उरलेल्या रकमेच्या एक-तृतियांश इतकी रक्कम, पारेषण परवानाधारकाच्या वार्षिक पारेषण आकारांची परिगणना करताना एकूण महसूली गरजेतून कमी करण्यात येईल;

परंतु असे की, पारेषण परवानाधारक संयुक्त व सामायिक खर्चाचे वाटप पारेषण व्यवसाय आणि अन्य व्यावसायात वाजवी आधारास अनुसरुन करेल आणि याबाबतचे वाटप विवरणपत्र, वीज दराची निश्चिती करण्यासाठीच्या अर्जासोबत आयोगास सादर करेल;

परंतु आणखी असे की, जेव्हा अशा अन्य व्यवसायाच्या प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष खर्चांची एकूण बेरीज ही अशा अन्य व्यवसायापासून मिळणाऱ्या महसूलापेक्षा जास्त असेल तर, अशा अन्य व्यवसायाच्या कारणास्तव पारेषण परवानाधारकाच्या एकूण महसूली गरजेत कोणतीही रक्कम वाढविण्यास परवानगी देण्यात येणार नाही.

## ६० राज्यांतर्गत पारेषण दर निश्चितीकरण

६०.१ एकूण पारेषण यंत्रणा खर्चाचे (टी टी एस सी) निश्चितीकरण

६०.१.१ सर्व पारेषण परवानाधारकांच्या अपेक्षित वार्षिक महसूलाच्या बेरजेतून, नियंत्रण कालावधीसाठी आयोगाने मान्यता दिलेल्या सर्व वजावटी कमी केल्यानंतर

उरलेली रक्कम हा राज्यातंर्गत पारेषण यंत्रणेचा ''एकूण पारेषण यंत्रणा खर्च (टीटीएससी)'' असेल व त्याची वसूली नियंत्रण कालावधीच्या संबंधित वर्षात पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याकडून (टीएसयु) खालील सूत्रानुसार करण्यात येईल.

$$TTSC_{(t)} = \sum_{i=1}^{n} (ARR_i - NT_i - O_i) - STR_{(t-1)}$$

जेथे,

$TTSC_{(t)}$ = नियंत्रण कालावधीतील (t) वर्षातील एकत्रित केलेला एकूण पारेषण यंत्रणा खर्च

n = पारेषण परवानाधारकांची संख्या

$ARR_i$ = नियंत्रण कालावधीतील (t) वर्षाच्या कालावधीकरीता $i^{th}$ परवानाधारकासाठी आयोगाने मान्यता दिलेली वार्षिक महसूली गरज

$NT_i$ = नियंत्रण कालावधीतील (t) वर्षाच्या कालावधीकरीता $i^{th}$ परवानाधारकासाठी मान्यता दिलेले वीज दरा व्यतिरिक्त उत्पन्न

$O_i$ = नियंत्रण कालावधीतील (t) वर्षाच्या कालावधीकरीता $i^{th}$ परवानाधारकासाठी मान्यता दिलेले अन्य व्यवसायापासूनचे उत्पन्न

$STR_{(t-1)}$ = मागील वर्षाच्या कालावधीत (t-1) अल्प कालावधीतील मुक्त प्रवेश आकारांपासून मिळालेला महसूल

परंतु असे की, नियंत्रण कालावधीतील प्रत्येक वर्षाच्या कालावधीत अल्प-कालिन मुक्त प्रवेश आकारांपासून मिळालेला महसूल हा नियंत्रण कालावधी सुरु होण्यापूर्वीच्या वार्षिक कालावधीतील प्रचलित महसूलाइतकाच धरण्यात येईल. तथापि, अल्पकालिन मुक्त प्रवेश आकारापासून मिळालेल्या प्रत्यक्ष महसूलानुसार येणाऱ्या तफावतीसाठी समायोजन मध्यावधी आढाव्याच्या वेळी आणि नियंत्रण कालावधीच्या अखेरीस करण्यात येईल.

६०.२ बेस पारेषण क्षमता आकार

६०.२.१ नियंत्रण कालावधीच्या प्रत्येक (t) वर्षातील १२ महिन्यांच्या कालावधीकरीता पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याच्या कोइन्सिडंट सर्वोच्च मागणी आणि कोइन्सिडंट नसलेल्या सर्वोच्च मागणीच्या सरासरी इतक्या असलेल्या ''बेस पारेषण क्षमता हक्कांना'' आयोग मंजूरी देईल, जे राज्यांतर्गत पारेषण

यंत्रणेचा ''क्षमता वापर'' **निर्देशित** करतील आणि त्याकरिता त्याप्रमाणे वार्षिक ''बेस पारेषण दर'' निश्चित करण्यात येईल.

Base Transmission Capacity Rights (Base TCR) for the yearly period (t) $= \sum_{u=1}^{n}((\mathbf{CPD}(t) + \mathbf{NCPD}(t))/\mathbf{2})$

जेथे,

$CPD_{(t)}$ = प्रत्येक दीर्घ-कालिन पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्यासाठी नियंत्रण कालावधीतील $_{(t)}$ वर्षाच्या कालावधीकरीता मासिक अंदाजित कोइन्सिडंट सर्वोच्च मागणीची सरासरी

$NCPD_{(t)}$ = प्रत्येक दीर्घ-कालिन पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्यासाठी नियंत्रण कालावधीतील $_{(t)}$ वर्षाच्या कालावधीकरीता मासिक अंदाजित कोइन्सिडंट नसलेल्या सर्वोच्च मागणीची सरासरी

परंतु असे की, नियंत्रण कालावधीच्या पहिल्या वर्षाकरीता, सर्व दीर्घ-कालिन पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्यांसाठी बेस पारेषण क्षमता हक्कांची निश्चिती, या विनियमांच्या प्रभावी दिनांकाच्यापूर्वीच्या बारा महिन्यात दीर्घ-कालिन पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्यांच्या CPD आणि NCPD च्या **असलेल्या** मासिक सरासरीच्या आधारे करण्यात येईल

परंतु आणखी असे की, व्यवसाय आराखड्याचा एक भाग म्हणून राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेशी जोडलेल्या विविध दीर्घ-कालिन पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्यांच्या अंदाजित मागणीच्या आधारे आणि मागील **बदलांच्या आधारे,** नियंत्रण कालावधीच्या सुरुवातीला, पुढील वार्षिक बेस पारेषण क्षमता अधिकार निश्चित करण्यासाठी विचारात घ्यावयाच्या CPD आणि NCPD ची परिगणना करण्यात येईल.

परंतु आणखी असे की, नियंत्रण कालावधीतील प्रत्येक वर्ष पूर्ण झाल्यानंतर, राज्य भार प्रेषण केंद्र प्रत्येक दीर्घकालिन पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याच्या मागील बारा मासिक कालावधीतील नोंदलेल्या CPD आणि NCPD ची माहिती सादर करेल आणि त्या माहितीच्या आधारे बेस पारेषण क्षमता हक्कांमध्ये, कामगिरीच्या मध्यावधी आढाव्यावेळी आणि नियंत्रण कालावधीच्या अखेरीस, योग्य त्या सुधारणा करण्यात येतील.

६०.३ बेस पारेषण दर

६०.३.१ प्रत्येक आर्थिक वर्षाकरिता बेस पारेषण दर हा राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेकरिता मान्यता दिलेले 'एकूण पारेषण यंत्रणा खर्च (टी टी एस सी)' आणि मान्यता दिलेले 'बेस पारेषण क्षमता हक्क' यांचे गुणोत्तर म्हणून निश्चित करण्यात येईल आणि ते ''रुपये/किलोवॅट/महिना'' मध्ये (दीर्घ-कालिन / मध्यम-कालिन वापरासाठी) किंवा 'रुपये/प्रति युनिट मध्ये (अल्प-कालिन **बायलॅटरल** मुक्त प्रवेश व्यवहारांच्या वापरासाठी, पॉवर एक्सचेंजमधील अल्प-कालिन **एकत्रित** व्यवहारांकरिता आणि नूतनशील उर्जा व्यवहारांकरिता) खालील पध्दतीने दाखवण्यात येतील.

| | |
|---|---|
| Base Transmission $Tariff_{(t)}$ (long term/medium term) (Rs/kW/month or Rs/MW/day) | $= TTSC_{(t)} \Big/ \sum_{u=1}^{n}((\mathbf{CPD}(t) + \mathbf{NCPD}(t))/\mathbf{2})$ |

| | |
|---|---|
| Base Transmission $Tariff_{(t)}$ (Short term) (Rs/kWh) | $= \dfrac{TTSC_{(t)}}{\sum_{i=1}^{n} (\text{Energy Transmitted by Tx i})}$ |

जेथे,

$TTSC_{(t)}$ = नियंत्रण कालावधीतील वार्षिक कालावधीकरिता (t) राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेसाठी एकत्रित केलेला खर्च.

$CPD_{(t)}$ = नियंत्रण कालावधीतील वार्षिक कालावधीकरिता (t) दीर्घ-कालिन पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्यांच्या मासिक कोइन्सिडंट सर्वोच्च मागणीची सरासरी

$NCPD_{(t)}$ = नियंत्रण कालावधीतील वार्षिक कालावधीकरीता(t) दीर्घ-कालिन पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्यांच्या मासिक अंदाजित कोइन्सिडंट नसलेल्या सर्वोच्च मागणीची सरासरी

n = नियंत्रण कालावधीतील विशिष्ट वर्षातील पारेषण परवानाधारकांची एकूण संख्या

$Tx_i$ = $i^{th}$ पारेषण परवानाधारक

परंतु असे की, प्रत्येक परवानाधारकाने पारेषित केलेले ऊर्जा युनिट्स हे पारेषण परवानाधारकाने त्याच्या व्यवसाय आराखड्याचा भाग म्हणून आणि आयोगाने मान्यता दिलेल्या अंदाजांवर आधारित असतील.

परंतु असे की, विनियम ४५.२ आणि ४५.३ मध्ये निश्चित केलेल्या बेस पारेषण क्षमता हक्क आणि बेस पारेषण दर यामध्ये, प्रत्यक्ष आणि मान्यता दिलेले सी पी डी आणि एन सी पी डी यातील तफावतीमुळे किंवा यंत्रणेमध्ये नवीन पारेषण परवानाधारकांची भर पडल्यामुळे, कोणत्याही सुधारणा कामकाजाच्या मध्यावधी आढाव्याच्या वेळी आणि नियंत्रण कालावधीच्या अखेरीस करण्यात येतील.

## ६१ दीर्घ-कालिन पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्यांमध्ये एकूण पारेषण यंत्रणा आकारांची विभागणी

६१.१ पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्यांमध्ये राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेच्या एकूण पारेषण खर्चाची विभागणी, प्रत्येक पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याच्या बेस पारेषण क्षमता हक्कांशी, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेत वाटप केलेल्या एकूण बेस पारेषण क्षमता हक्कांच्या असलेल्या गुणोत्तराच्या प्रमाणात करण्यात येईल.

६१.२ दीर्घ- कालिन पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याने देय असलेल्या वार्षिक पारेषण आकारांची परिगणना खालील सूत्रांनुसार करण्यात येईल :-

$$ATC(u)_{(t)} = TTSC_{(t)} \times ([Base\ TCR(u)]_{(t)} / \sum_{i=1}^{n} [Base\ TCR(u)]_{(t)})$$

जेथे,

$ATC(u)_{(t)}$ = दीर्घ-कालिन पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्यांमध्ये विभागणी करावयाचे वार्षिक पारेषण आकार

$Base\ TCR(u) = [CPD(u)_{(t)} + NCPD(u)_{(t)}]/2$

बेस पारेषण क्षमता हक्क, हे प्रत्येक दीर्घ-कालिन पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याचे वार्षिक कालावधीतील बेस पारेषण क्षमता हक्क दाखवितात.

$CPD(u)_{(t)}$= वार्षिक कालावधीकरिता$_{(t)}$ दीर्घ-कालिन पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याच्या कोइन्सिडंट सर्वोच्च मागणीची सरासरी

$NCPD(u)_{(t)}$= वार्षिक कालावधीकरीता$_{(t)}$ दीर्घ-कालिन पारेषण उपयोगकर्त्याच्या कोइन्सिडंट नसलेल्या सर्वोच्च मागणीची सरासरी

## ६२ राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचा वापर

६२.१ महाराष्ट्रातील राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेच्या वापराच्या प्रयोजनासाठी, मुक्त प्रवेश व्यवहारांचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करता येईलः

ए) दीर्घ-कालिन प्रवेशः सात (७) वर्षापेक्षा जास्त परंतु पंचवीस (२५) वर्षापेक्षा जास्त नसलेला कालावधीकरिता

बी) मध्यम-कालिन प्रवेशः एक (१) वर्षापेक्षा जास्त परंतु सात (७) वर्षापेक्षा जास्त नसलेला कालावधीकरिता

सी) अल्प-कालिन प्रवेश : एक वर्षा पर्यंतच्या कालावधीकरिता.

परंतु असे की, **जास्त** मागणी असेल तेव्हा प्रथम अल्प-कालिन व नंतर मध्यम-कालिन आणि त्यानंतर दीर्घ-कालिन मुक्त प्रवेशाचे व्यवहार कमी करण्यात येतील. ग्राहकांच्या विशिष्ट वर्गवारीच्या संबंधात, ही कपात 'यथा-प्रमाण' तत्वावर करण्यात येईल. परंतु त्यात अट अशी राहील की विशिष्ट वर्गवारीमध्ये जे व्यवहार **वेळापत्रकापेक्षा** जास्त असतील ते प्रथम त्यांच्या निर्धारित गरजेपर्यंत कमी करण्यात येतील आणि त्यानंतर 'यथा-प्रमाण' तत्वानुसार कपात करण्यात येईल.

६२.२ राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेमधील दीर्घ-कलिन, मध्यम-कालिन किंवा अल्प-कालिन प्रवेशाकरिता आकारांमध्ये **कोणताही फरक (भेदभाव) नसेल.**

परंतु असे की, विनियम ४५.३ मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे दीर्घ-कालिन/मध्यम-कालिन प्रवेशाच्या पारेषण दरापासून मिळणारा **महसूल,** रुपये/किलोवॅट/महिना किंवा आयोग ठरवून देईल त्या योग्य अशा **युनिटमध्ये** दाखविण्यात येईल.

६२.३ विनियम ४५.३ मध्ये विनिर्दिष्ट केलेले राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेतर्फे येणा-या वर्षात हाताळल्यात यावयाचे ऊर्जा युनिट्स विचारात घेऊन, पॉवर एक्सचेंजद्वारे करावयाचे अल्प-कालिन **बायलॅटरल** व्यवहार आणि अल्प-कालिन एकत्रित व्यवहार आणि नुतनशील ऊर्जा व्यवहारांकरिता पारेषण दर रुपये/युनिट (प्रति युनिट तत्वावर) दाखविण्यात येतील.

६२.४ राज्यांतर्गत पारेषण वापरासाठीचे आकार विविध पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्यांमध्ये खालील पध्दतीनुसार विभागण्यात येतीलः

- विद्यमान दीर्घकालिन पारेषण यंत्रणा उपयोगकर्ते, ज्यांची नोंदणीकृत मागणी बेस पारेषण क्षमता हक्कांपर्यंत (म्हणजेच सी पी डी आणि एन

सी पी डी ची सरासरी) असेल तर त्यांना अल्प-कालिन पारेषण आकार भरावे लाग्णार नाहीत.

- दीर्घ- कालिन पारेषण यंत्रणा उपयोगकर्ते ज्यांची नोंदणीकृत मागणी ही बेस पारेषण क्षमता हक्कांपेक्षा जास्त परंतु करारांतर्गत क्षमतेपेक्षा कमी असेल तर त्यांना बेस पारेषण क्षमता हक्कांपेक्षा जास्त असलेल्या नोंदणीकृत मागणीकरिता अल्प-कालिन पारेषण आकार भरावे लागतील.
- दीर्घ-कालिन पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्यांची नोंदणीकृत मागणी करारांतर्गत क्षमतेपेक्षा (ज्यास पारेषण क्षमता हक्क - टी सी आर म्हणून संबोधण्यात आले आहे) जास्त असेल तर, पारेषण यंत्रणा उपयोगर्त्याला वेळोवेळी सुधारणा केलेल्या महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (पारेषण मुक्त प्रवेश) विनियम २००५ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेले अतिरिक्त पारेषण आकार भरावे लागतील.

## ६३ भरणा करण्याची पध्दत

६३.१ मागील महिन्यातील पारेषण आकारांसाठी महिन्याच्या पहिल्या कामाच्या दिवशी प्रत्येक पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याच्या राज्यांतर्गत पारेषण आकारांसाठी राज्य पारेषण कंपनी मासिक तत्वावर देयक पाठवेल.

६३.२ प्रत्येक कॅलेंडर महिन्यातील पारेषण दराचे मासिक देयक पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याने पुढील कॅलेंडर महिन्याच्या चौदाव्या दिवशी देय राहील.

६३.३ सर्व पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्यांनी त्यांच्या पारेषण दरांचा भरणा राज्य पारेषण यंत्रणेकडे वेळेवर करण्यात येईल, याची खात्री करावी ज्यामुळे राज्य पारेषण कंपनीला पारेषण परवानाधारकाने केलेली मागणी वेळीच चुकती करणे शक्य होईल.

६३.४ कोणत्याही पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याने पारेषण आकारांचा भरणा करण्यास विलंब केल्यास, विलंब भरणा अधिभार प्रति महिना किंवा त्याच्या भागास १.२५ % दराने लागू राहील.

## ६४ पारेषण हानि

६४.१ पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याने राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचा वापर ज्या प्रमाणात केला असेल त्या प्रमाणात त्याला राज्य भार प्रेषण केंद्राने

निश्चित केलेली आणि आयोगाने मान्यता दिलेली पारेषण परवानाधारकाच्या पारेषण यंत्रणेतील ऊर्जा हानि, सहन करावी लागेल.

परंतु असे की, पारेषण परवानाधारकाला लागू असलेल्या बहुवर्षीय वीज दर चौकटीचा एक भाग म्हणून विनियम ९ नुसार आयोग पारेषण हानिसाठी एक मार्गदर्शिका ठरवून देऊ शकेल.

परंतु असे की, राज्य भार प्रेषण केंद्राने निश्चित केलेल्या प्रत्यक्ष पारेषण हानिची पातळी आणि मान्यताप्राप्त पातळी यात कोणतीही तफावत उद्‌भवली तर ती, विनियम १०मध्ये करण्यात आलेल्या **कार्यपधतीनुसार** कामगिरीच्या मध्यावधी आढाव्याचा एक भाग म्हणून हाताळण्यात येईल.

## ६५ रिॲक्टींव्ह ऊर्जा आकार

६५.१ राज्य भार प्रेषण केंद्राने दिलेल्या निर्देशांनुसार निर्मिती केंद्र ग्रीडमध्ये रिॲक्टीव्ह ऊर्जेचा पुरवठा करेल किंवा वापरेल. असा पुरवठा/वापर यंत्राच्या क्षमतेवर आणि राज्य भार प्रेषण केंद्राने दिलेल्या निर्देशांनुसार हाती घेण्यात येईल. रिॲक्टीव्ह ऊर्जेची देवाण-घेवाण, जर फक्त, राज्य भार प्रेषण केंद्राच्या निर्देशानुसार करण्यात आलेली असेल तर लागू असलेल्या कालावधीसाठी (पुरवठा किंवा वापर) निर्मिती केंद्राला, आर्थिक वर्ष २०१० करिता १०.०० paise/kVArh प्रमाणे व नियंत्रण कालावधीतील पुढील प्रत्येक वर्षात वार्षिक ०.५ paise/kVArh प्रमाणे वाढ या दराने, आयोगाने त्यात सुधारणा केली नाही तर, लेव्ही आकारण्यात येईल किंवा भरपाई करण्यात येईल.

६५.२ पारेषण परवानाधारकांना आणि पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्यांना पारेषण यंत्रणेमध्ये रिॲक्टीव्ह ऊर्जा शिल्लक ठेवण्यासाठी खालीलप्रमाणे प्रोत्साहन - अधिदान देण्यात येईल किंवा देण्यात येणार नाही.

| **रिॲक्टीव्ह ऊर्जेच्या भरपाईसाठी जबाबदार व्यक्ति / संस्था** | **सुरुवातीची कामगिरी** | **आंतरबदलाच्या ठिकाणी ($V_p$) व्होल्टेज** | **भरपाईचा दर** |
|---|---|---|---|
| पारेषण परवानाधारक | आयईजीसी/ राज्य ग्रीड संहितेनुसार व्होल्टेजमधील अनुज्ञेय बदल | - जर $V_p > 103\%$ of $V_{nom}$<br>- जर $V_p < 97\%$ of $V_{nom}$<br>- जर $97\% < V_p < 103\%$ | - रु.0.10/RkVAhदराने अतिरिक्त पुरवठ्यासाठी दंड<br>- रु.0.10/RkVAhदराने अतिरिक्त पुरवठ्यासाठी प्रोत्साहन - अधिदान<br>- निरंक |
| पारेषण यंत्रणा उपयोगकर्ता (वितरण परवानाधारक/राज्य पारेषण जाळ्याशी थेट जोडलेले मुक्त प्रवेश उपयोगकर्ते ) | पॉवर फॅक्टर ०.९ इतका प्रत्येक आंतरबदलाच्या ठिकाणी मर्यादित करावयाचा कमाल रिॲक्टीव्ह ऊर्जेचा वापर | - जर $V_p > 103\%$ of $V_{nom}$<br>- जर $V_p < 97\%$ of $V_{nom}$<br>- जर $97\% < V_p < 103\%$ | - रु.0.10/RkVAhदराने अतिरिक्त वापरासाठी प्रोत्साहन - अधिदान<br>- रु.0.10/RkVAhदराने अतिरिक्त वापराला दंड<br>- निरंक |

जेथे,

$V_p$ = आंतर बदलाच्या ठिकाणचे व्होल्टेज

$V_{nom}$ = व्होल्टेजचे नाममात्र मूल्य

## भाग- एचः वितरण वायर व्यवसाय

### ६६ लेख्यांचे अलगिकरण

६६.१ प्रत्येक वितरण परवानाधारक खालील बाबीं निश्चित करण्यासाठी वेगवेगळे अर्ज करेल :-

(ए) वितरण वायर व्यवसाय;

(बी) किरकोळ वीज पुरवठा;

परंतु असे की, अशा रितीने वितरण परवानाधारकाकडून वेगवेगळे अर्ज प्राप्त झाल्या नंतर आयोगाला वीज दर निश्चित करणे शक्य व्हावे यासाठी प्रत्येक वितरण परवानाधारक वितरण वायर व्यवसाय आणि किरकोळ पुरवठा व्यवसाय याकरिता वेगवेगळे अभिलेखे ठेवेल आणि एक वाटप विवरणपत्र तयार करेल.

### ६७ व्याप्ती

६७.१ या भागांतर्गत असलेले विनियम वितरण परवानाधारकाच्या वितरण वायर्सचा उपयोग करण्यासाठी वितरण यंत्रणा उपयोगकर्त्याने द्यावयाचे दर निश्चित करण्यासाठी लागू राहतील.

### ६८ वितरण वायर व्यवसायाकरीता लागणा-या एकूण महसूली गरजेचे भाग

६८.१ वितरण परवानाधारकाच्या वितरण वायर व्यवसायाकरीता वहन आकारातून विनियम ७३ मध्ये तरतूद करण्यात आलेली एकूण महसूली गरज वसूल होऊ शकेल आणि एकूण महसूली गरजेचे खालील प्रमाणे भाग असतीलः

एकूण महसूली गरज :-

(ए) गुंतवलेल्या भांडवलावरील परतावा;

(बी) घसारा;

(सी) संचालन व देखभाल खर्च;

(डी) खेळते भांडवल आणि ग्राहक व पारेषण यंत्रणा उपयोग कर्त्याच्या ठेवीवरील व्याज; आणि

(इ) आकस्मिक निधीच्या वर्गणीचे समायोजन;

**वहन आकार** = **वरील प्रमाणे एकूण महसूली गरज, वजा**

(एफ) वीज दरा व्यतिरिक्त उत्पन्न; आणि

(जी) या विनियमात विनिर्दिष्ट केलेल्या मर्यादेपर्यंत, अन्य व्यवसायापासूनचे उत्पन्न

(एच) वहन आकारावरील अतिरिक्त अधिभारामुळे मिळणारा होणाऱ्या जमा रकमा

६८.२ आयोग, या विनियमातील भाग-सी नुसार वितरण परवानाधारकाने दर निश्चितीसाठी केलेल्या अर्जाच्या आधारे वितरण परवानाधारकाचे वहन आकार निश्चित करेल;

परंतु असे की, वितरण यंत्रणा उपयोगकर्त्याकडून वहन आकार वसूल करण्यासाठी वहन आकार हे रुपये/युनिट मध्ये किंवा रुपये/किलो वॅट/ महिना मध्ये किंवा आयोग वेळोवेळी ठरवुन देईल त्या **प्रमाणात (युनिटमध्ये)** निश्चित करण्यात येतील.

## ६९ बहु-वर्षीय वीज दर

६९.१ आयोगाने सूट दिलेली आहे अशी प्रकरणे वगळून, या विनियमाच्या भाग-सी मध्ये असलेले विनियम राज्यातील सर्व वितरण परवानाधारकांना १ एप्रिल २०११ पासून लागू होतील.

## ७० व्यवसाय आराखडा

७०.१ या विनियमांच्या भाग-बी मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या पद्धती नुसार, आयोग ठरवुन देईल अशा पूर्ण तपशीलासह वितरण परवानाधारक त्याचा व्यवसाय आराखडा आयोगाला सादर करेल.

## ७१ भांडवल गुंतवणूक योजना

७१.१ वितरण परवानाधारक त्याच्या व्यवसाय आराखड्याचा एक भाग म्हणून, प्रस्तावित भांडवली खर्चाच्या प्रकल्पाच्या पूर्ण तपशीलासह भांडवल गुंतवणूक योजना आयोगास मान्यतेसाठी सादर करेल.

७१.२ भांडवल गुंतवणूक योजनेत रु.दहा (१०) कोटी पेक्षा अधिक रकमेच्या सर्व भांडवली खर्चाच्या प्रकल्पांचा समावेश असेल आणि ते आयोग वेळोवेळी ठरवून देईल त्या नमुन्यामध्ये सादर करण्यात येतील.

७१.३ वितरण परवानाधारक भांडवल गुंतवणूकीची योजना या विनियमातील विनियम ७ नुसार सादर करेल.

७१.४ आयोग या विनियमांमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या तत्त्वांनुसार व्यवसाय आराखडा मंजूर करेल.

## ७२ भांडवली खर्च

७२.१ १ एप्रिल २०११ रोजी किंवा त्यानंतर सुरु झालेल्या रुपये दहा (१०) कोटी पेक्षा जास्त भांडवली खर्च प्रकल्पाचा प्रत्येक आर्थिक वर्षाकरीता वार्षिक अनुज्ञेय भांडवली खर्च निश्चित करण्यासाठी वितरण परवानाधारकाचा मान्यता प्राप्त व्यवसाय आराखडा आधार राहील.

७२.२ प्रकल्पाच्या आरंभापासून ते प्रकल्प सुरु होईपर्यंत, प्रत्येक भांडवली खर्चाच्या प्रकल्पाकरीता, एकूण वार्षिक अनुज्ञेय भांडवली खर्चाची बेरीज हा त्या प्रकल्पाचा मूळ खर्च राहील;

७२.३ भांडवली खर्च प्रकल्पांचा मूळ खर्च आणि / किंवा भांडवलीकृत केलेल्या स्थिर मत्तांचा मुळ खर्च निश्चित करताना, भारतीय सनदी लेखापालांच्या स्थिर मत्तांचे लेखे या संबंधातील लेखा मानक (एएस१०) विवरणपत्र मधील तरतुदी, या विनियमांशी विसंगत नसतील त्या मर्यादे पर्यंत, लागू राहतील.

७२.४ विनियम २६ मधील तरतुदी नुसार भांडवली खर्च अनुज्ञेय राहील.

७२.५ वितरण परवानाधारकाच्या वितरण यंत्रणेमध्ये प्रवेश मिळण्यासाठी ग्राहकांनी आणि वितरण यंत्रणा उपयोगकर्त्यांनी कामांसाठी भरलेली वर्गणीची कोणतीही रक्कम अशा प्रकल्पाच्या मूळ खर्चातून, विनियमित बेस दराची परिगणना करण्याच्या प्रयोजनासाठी, विनियम ३० मधील तरतूदीनुसार कमी करण्यात येईल.

## ७३ एकूण महसूली गरजेची परिगणना

७३.१ गुंतविलेल्या भांडवलावरील परतावा

७३.१.१ वितरण परवानाधारकाला, या विनियमतातील विनियम २९ मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, वितरण वायर व्यवसायामध्ये गुंतविलेल्या भांडवलावर परतावा अनुज्ञेय असेल.

७३.२ घसारा.

७३.२.१ या विनियमातील विनियम ३० मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे वितरण व्यवसायात वापरलेल्या स्थिर मत्तांच्या मूल्यावर घसारा वसूल करण्यास वितरण परवानाधारकाला परवानगी देण्यात येईल.

७३.३ संचालन व देखभाल खर्च

७३.३.१ वितरण परवानाधारकाला वितरण वायर व्यवसायाशी संबंधित संचालन व देखभाल खर्चांची, नियंत्रण कालावधीतील प्रत्येक वर्षात खालील विनिर्दिष्ट केलेल्या निकषांप्रमाणे, वसुली करण्यास परवानगी देण्यात येईल.

**आर्थिक वर्ष २०११-१२**

| संचालन व देखभाल खर्च | महावितरण | आरइन्फ्रा-डी | बेस्ट | टीपीसी-डी | मुळा प्रवरा सोसायटी |
|---|---|---|---|---|---|
| वहन केलेल्या ऊर्जेसाठी (पैसे/युनिट) | ११ | १० | १० | ११ | ११ |
| वायर व्यवसायातील ग्राहकांसाठी* (रुपये लाख/'००० ग्राहक) | ६ | १० | १० | लागू नाही | ६ |
| वायर व्यवसायाच्या एकूण स्थिर मत्तांसाठी (सुरुवातीच्या एकूण स्थिर मत्तांच्या % मध्ये) | ४.०५% | ४.०५% | ४.०५% | १.३५% | ४.०५% |

**आर्थिक वर्ष २०१२-१३**

| संचालन व देखभाल खर्च | महावितरण | आरइन्फ्रा-डी | बेस्ट | टीपीसी-डी | मुळा प्रवरा सोसायटी |
|---|---|---|---|---|---|
| वहन केलेल्या ऊर्जेसाठी (पैसे/युनिट) | १० | ९ | ९ | १२ | १० |
| वायर व्यवसायातील ग्राहकांसाठी* (रुपये लाख/'००० ग्राहक) | ६.५० | १०.०६ | १०.०६ | लागू नाही | ६.५० |
| वायर व्यवसायाच्या एकूण स्थिर मत्तांसाठी (सुरुवातीच्या एकूण स्थिर मत्तांच्या % मध्ये) | ४.०५% | ४.०५% | ४.०५% | १.३५% | ४.०५% |

**आर्थिक वर्ष २०१३-१४**

| संचालन व देखभाल खर्च | महावितरण | आरइन्फ्रा-डी | बेस्ट | टीपीसी-डी | मुळा प्रवरा सोसायटी |
|---|---|---|---|---|---|
| वहन केलेल्या ऊर्जेसाठी (पैसे/युनिट) | ८ | ७ | ७ | १३ | ८ |
| वायर व्यवसायातील ग्राहकांसाठी* (रुपये लाख/'००० ग्राहक) | ६.९ | १०.६ | १०.६ | लागू नाही | ६.९ |
| वायर व्यवसायाच्या एकूण स्थिर मत्तांसाठी (सुरुवातीच्या एकूण स्थिर मत्तांच्या % मध्ये) | ४.०५% | ४.०५% | ४.०५% | १.३५% | ४.०५% |

**आर्थिक वर्ष २०१४-१५**

| **संचालन व देखभाल खर्च** | **महावितरण** | **आरइन्फ्रा-डी** | **बेस्ट** | **टीपीसी-डी** | **मुळा प्रवरा सोसायटी** |
|---|---|---|---|---|---|
| वहन केलेल्या ऊर्जेसाठी (पैसे/युनिट) | ७ | ५ | ५ | १३ | ७ |
| वायर व्यवसायातील ग्राहकांसाठी* (रुपये लाख/'००० ग्राहक) | ७.३ | ११.२ | ११.२ | लागू नाही | ७.३ |
| वायर व्यवसायाच्या एकूण स्थिर मत्तांसाठी (सुरुवातीच्या एकूण स्थिर मत्तांच्या % मध्ये) | ४.०५% | ४.०५% | ४.०५% | १.३५% | ४.०५% |

**आर्थिक वर्ष २०१५-१६**

| **संचालन व देखभाल खर्च** | **महावितरण** | **आरइन्फ्रा-डी** | **बेस्ट** | **टीपीसी-डी** | **मुळा प्रवरा सोसायटी** |
|---|---|---|---|---|---|
| वहन केलेल्या ऊर्जेसाठी (पैसे/युनिट) | ५ | ४ | ४ | १४ | ५ |
| वायर व्यवसायातील ग्राहकांसाठी* (रुपये लाख/'००० ग्राहक) | ७.७ | ११.९ | ११.९ | लागू नाही | ७.७ |
| वायर व्यवसायाच्या एकूण स्थिर मत्तांसाठी (सुरुवातीच्या एकूण स्थिर मत्तांच्या % मध्ये) | ४.०५% | ४.०५% | ४.०५% | १.३५% | ४.०५% |

टिपणी : * वायर व्यवसायाचा वापर करणारे ग्राहक म्हणजे वितरण परवानाधारकाच्या वितरण जाळ्याचा वापर करणारे ग्राहक. उदा. आरइन्फ्रा-डीच्या बाबतीत, आरइन्फ्राच्या ग्राहकांमध्ये, आरइन्फ्राच्या वायर त्याचप्रमाणे पुरवठा सेवांचा देखील वापर करणा-या आरइन्फ्राच्या ग्राहकांचा आणि आरइन्फ्रा-डीच्या फक्त वायरच्या जाळ्यांचा विजेच्या वहनासाठी वापर करणा-या टीपीसी-डीच्या ग्राहकांचा समावेश होतो.

७३.४ <u>खेळते भांडवलावरील व्याज</u>

७३.४.१ वितरण परवानाधारकाला, या विनियमातील विनियम ३१ नुसार अंदाजित खेळते भांडवलावर व्याज अनुज्ञेय राहील.

७३.५ <u>आकस्मिक निधीच्या वर्गणीचे समायोजन</u>

७३.५.१ या विनियमातील विनियम ३२ मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, **महसूली मर्यादा** निश्चित करताना **त्यामध्ये** वितरण परवानाधारकाच्या आकस्मिक राखीव निधीचे समायोजन करण्यात येईल.

## ७४ वीज दरा व्यतिरिक्त उत्पन्न

७४.१ आयोगाने मान्यता दिलेले वितरण व्यवसायाशी संबंधीत वीज दरा व्यतिरिक्त उत्पन्न हे एकूण महसूली गरजेतून, वितरण परवानाधारकाच्या वितरण वायर व्यवसायाचे वहन आकार निश्चित करताना, वजा करण्यात येतील;

परंतु असे की, वितरण परवानाधारक वहन आकार निश्चित करण्यासाठी अर्ज सादर करताना त्या सोबत वीज दरा व्यतिरिक्त उत्पन्नाच्या पूर्व-अनुमानांचा पूर्ण तपशील सादर करेल.

## ७५ अन्य व्यवसायापासून उत्पन्न

७५.१ वितरण परवानाधारक जर अन्य कोणताही व्यवसाय करीत असेल तर, अशा अन्य व्यवसायापासून मिळालेल्या महसूलातून अशा अन्य व्यवसायाशी संबंधित असलेले सर्व प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष खर्च वजा करुन उरलेल्या रकमेच्या एक-तृतियांश इतकी रक्कम, वितरण परवानाधारकाच्या वितरण वायर व्यवसायाचे वहन आकार निश्चित करताना एकूण महसूली गरजेतून कमी करण्यात येईल;

परंतु असे की, वितरण परवानाधारक संयुक्त व सामायिक खर्चांचे वाटप वितरण व्यवसाय आणि अन्य व्यावसायात वाजवी आधारास अनुसरुन करेल आणि याबाबतचे वाटप विवरणपत्र, वहन आकारांची निश्चिती करण्यासाठीच्या अर्जासोबत आयोगास सादर करेल;

परंतु आणखी असे की, जेव्हा अशा अन्य व्यवसायाच्या प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष खर्चांची एकूण बेरीज ही अशा अन्य व्यवसायापासून मिळणाऱ्या महसूलापेक्षा जास्त असेल तर, अशा अन्य व्यवसायाच्या कारणास्तव वितरण परवानाधारकाच्या एकूण महसूली गरजेत कोणतीही रक्कम वाढविण्यास परवानगी देण्यात येणार नाही.

## ७६ वहन आकारांचे निश्चितीकरण

७६.१ आयोग, अधिनियमाच्या कलम ६४ च्या उप-कलम (३) खाली पारित केलेल्या आदेशात वितरण परवानाधारकाच्या वितरण वायर्स व्यवसायाचे वहन आकार विनिर्दिष्ट करेल.

परंतु असे की, भाग एच खाली वितरण यंत्रणा उपयोगकर्त्याने देय असलेल्या आकारांमध्ये, आयोगाने अशा आदेशात विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे स्थिर/मागणी आकार आणि अस्थिर आकार यांचे कोणतेही संयोग, समाविष्ट असेल.

## ७७ अतिरिक्त अधिभारामुळे जमा होणा-या रकमा

वेळोवेळी सुधारणा केलेल्या महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण मुक्त प्रवेश) विनियम, २००५ नुसार आयोगाने मान्यता दिलेल्या वितरण वायर्स व्यवसायाच्या आकारांवरील अतिरिक्त अधिभार म्हणून वितरण परवानाधारकाला, वितरण परवानाधारकाच्या वायर्सना जोडलेल्या ग्राहकांकडून मिळालेल्या रकमा, अशा वितरण परवानाधारकाच्या वहन आकारांची परिगणना करताना, एकूण महसूली गरजेतून वजा करण्यात येतील.

## ७८ वहन हानि

७८.१ वितरण परवानाधारकाला, वितरण यंत्रणा चालविताना उद्भवणाऱ्या मान्यता दिलेल्या तांत्रिक हानीची वसूली, वस्तु रुपात, करण्यास परवानगी देण्यात येईल.

परंतु असे की, आयोग, वितरण परवानाधारकाने दाखल केलेल्या व्यवसाय आराखड्यावरील आदेशाचा एक भाग म्हणून, विनियम ७ नुसार वहन आकारांसाठी एक मार्गदर्शिका विनिर्दिष्ट करेल;

परंतु असे की, वितरण हानीची प्रत्यक्ष पातळी आणि मान्यता देण्यात आलेली पातळी यामधील कोणतीही तफावत, कामगिरीच्या मध्यावधी आढाव्याचा एक भाग म्हणून, विनियम १० मध्ये तरतूद करण्यात आलेल्या **कार्यपध्दतीनुसार,** हाताळण्यात येईल.

## ७९ वायर्सची उपलब्धता

७९.१ वायर्स व्यवसायाकरिता गुंतविलेलेल्या भांडवलावरील परताव्याच्या पूर्ण वसुलीसाठी वायर्स उपलब्धतता लक्ष्य खालीलप्रमाणे राहील-

(ए) ग्रामीण क्षेत्र ९० टक्के

(बी) नगरे व शहरे ९५ टक्के

परंतु असे की आयोग, वितरण परवानाधारकाने दाखल केलेल्या व्यवसाय आराखड्यावरील आदेशाचा एक भाग म्हणून वितरण परवानाधारकाने वायर्स व्यवसायाकरिता साध्य करावायाच्या उपलब्धता लक्ष्यासाठी, एक मार्गदर्शिका विनिर्दिष्ट करेल;

परंतु असे की, वायर्स उपलब्धता लक्ष्यापेक्षा प्रत्येक एक (१) टक्का कमी साध्यतेसाठी, गुंतविलेल्या भांडवलावरील परताव्याचा दर ०.१ टक्क्याने कमी करण्यात येईल.

परंतु असे की, वायर्स उपलब्धता लक्ष्यापेक्षा प्रत्येक एक (१) टक्का जादा साध्यतेसाठी, गुंतविलेल्या भांडवलावरील परताव्याचा दर ०.१ टक्क्याने वाढविण्यात येईल.

७९.२ खालील सूत्रानुसार वायर्स उपलब्धतेची परिगणना करण्यात येईल.-

$$\text{Wires Availability} = (1 - (\text{SAIDI} / 8760)) \times 100$$

जेथे,

SAIDI = सर्व ग्राहक व्यत्ययांच्या कालावधीची बेरीज/सेवा पुरविण्यात आलेल्या एकूण ग्राहकांची संख्या

७९.३ वायर्स उपलब्धतेचे मोजमाप वर्षभरात घेण्यात येईल आणि ते टक्केवारीत दाखविण्यात येईल.

## भाग- आयः किरकोळ विद्युत पुरवठा

### ८० व्याप्ती

८०.१ वितरण परवानाधारकांने त्याच्या ग्राहकांना करावयाच्या किरकोळ वीज पुरवठ्याचे दर निश्चित करण्यासाठी हे विनियम लागू राहतील.

### ८१ वीज दराचे भाग

८१.१ वितरण परवानाधारकाने करावयाच्या विजेच्या किरकोळ वीज पुरवठ्याच्या दरामधून, नियंत्रण कालावधीतील प्रत्येक वर्षाकरिता वितरण परवानाधारकाच्या आयोगाने मान्यता दिलेल्या एकूण महसूली गरजेची पूर्ण वसूली **करता येईल** आणि एकूण महसूली गरजेचे भाग खालीलप्रमाणे असतील.-

एकूण महसूली गरज

(ए) गुंतविलेल्या भांडवलावरील परतावा;

(बी) घसारा;

(सी) स्वतःच्या वीज निर्मितीचा खर्च/वीज खरेदीचा खर्च

(डी) पारेषण आकार

(इ) संचालन व देखभाल खर्च

(एफ) खेळते भांडवल आणि ग्राहक सुरक्षा ठेवींवरील व्याज., आणि

(जी) आकस्मिक निधीच्या वर्गणीचे समायोजन

विजेच्या विक्रीपासून मिळणा-या महसूलाची गरज = वरीलप्रमाणे एकूण महसूली गरज, वजा;

(एच) वीज दरा व्यतिरिक्त उत्पन्न

(आय) या विनियमात विनिर्दिष्ट केलेल्या मर्यादेपर्यंत, अन्य व्यवसायापासूनचे उत्पन्न

(जे) क्रॉस-सबसिडीवरील अधिभारामुळे जमा होणा-य रकमा;

८१.२ या विनियमांच्या भाग सी नुसार वितरण परवानाधारकाने दर निश्चितीसाठी केलेल्या अर्जाच्या आधारे आयोगाकडून वितरण परवानाधारकाच्या किरकोळ वीज पुरवठ्याचे दर निश्चित करण्यात येतील.

८१.३ आयोगाने निश्चित केलेल्या दरावर आणि आकारांवर ग्राहकांना रिबेट देण्यास वितरण परवानाधारकाला परवानगी देण्यात येईल :

परंतु असे की, वितरण परवानाधारकाने दिलेल्या अशा रिबेटचा तपशील आयोगाने वेळोवेळी विनिर्दिष्ट केलेल्या पद्धतीनूसार व नमून्यामध्ये दर तिमाहीला वितरण परवानाधारक आयोगाला सादर करेल :

परंतु असे की, अशा रिबेटचे होणारे परिणाम पूर्णपणे वितरण परवानाधारकाला सहन करावे लागतील आणि अशा रिबेटचे परिणाम कोणत्याही स्वरुपात ग्राहकांकडून वसूल करण्यास आयोगाकडून परवानगी दिली जाणार नाही.

परंतु असे की, असे रिबेट कोणत्याही निवडक ग्राहकाला/ग्राहकांना देण्यात येणार नाहीत आणि ते संपूर्ण ग्राहक वर्गवारी/उप-वर्गवारी/वापर टप्प्यांनुसार, भेदभाव-रहित पद्धतीने द्यावे लागतील.

## ८२ बहु-वर्षीय वीज दर

८२.१ आयोगाने सूट दिली असल्यास अशी प्रकरणे वगळून, या विनियमांच्या भाग सी मध्ये अंतर्भूत असलेले विनियम राज्यातील सर्व वितरण परवानेधारकांना १ एप्रिल २०११ पासून लागू राहतील.

## ८३ व्यवसाय आराखडा

८३.१ या विनियामाच्या भाग बी मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या पद्धतीनुसार, आयोगाने वेळोवेळी विनिर्दिष्ट केलेल्या पूर्ण तपशीलासह वितरण परवानाधारक व्यवसाय आराखडा सादर करेल.

## ८४ भांडवल गुंतवणूक योजना

८४.१ वितरण परवानाधारक त्याच्या व्यवसाय आराखड्याचा एक भाग म्हणून, प्रस्तावित भांडवली खर्चाच्या प्रकल्पाच्या पूर्ण तपशीलासह भांडवल गुंतवणूक योजना आयोगास मान्यतेसाठी सादर करेल.

८४.२ भांडवल गुंतवणूक योजनेत रु.दहा (१०) कोटी पेक्षा अधिक रकमेच्या सर्व भांडवली खर्चाच्या प्रकल्पांचा समावेश असेल आणि ते आयोग वेळोवेळी ठरवून देईल त्या नमुन्यामध्ये सादर करण्यात येतील.

८४.३ वितरण परवानाधारक भांडवल गुंतवणूकीची योजना या विनियमातील विनियम ७ नुसार सादर करेल.

८४.४ आयोग या विनियमामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या तत्त्वांनुसार व्यवसाय आराखडा मंजूर करेल.

## ८५ भांडवली खर्च

८५.१ १ एप्रिल २०११ रोजी किंवा त्यानंतर सुरु झालेल्या रुपये दहा (१०) कोटी पेक्षा जास्त भांडवली खर्च प्रकल्पाचा प्रत्येक आर्थिक वर्षाकरीता वार्षिक अनुज्ञेय भांडवली खर्च निश्चित करण्यासाठी वितरण परवानाधारकाचा मान्यता प्राप्त व्यवसाय आराखडा आधार राहील.

८५.२ प्रकल्पाच्या आरंभापासून ते प्रकल्प सुरु होईपर्यंत, प्रत्येक भांडवली खर्चाच्या प्रकल्पाकरीता, एकूण वार्षिक अनुज्ञेय भांडवली खर्चाची बेरीज हा त्या प्रकल्पाचा मूळ खर्च राहील;

८५.३ भांडवली खर्च प्रकल्पांचा मूळ खर्च आणि / किंवा भांडवलीकृत केलेल्या स्थिर मत्तांचा मुळ खर्च निश्चित करताना, भारतीय सनदी लेखापालांच्या स्थिर मत्तांचे लेखे या संबंधातील लेखा मानक (एएस १०) विवरणपत्र मधील वेळोवेळी सुधारणा केलेल्या तरतुदी, या विनियमांशी विसंगत नसतील त्या मर्यादेपर्यंत, लागू राहतील.

८५.४ वितरण परवानाधारकाच्या ग्राहकांनी आणि वितरण यंत्रणा उपयोगकर्त्यांनी किरकोळ वीज पुरवठ्याच्या कामांसाठी भरलेली वर्गणीची कोणतीही रक्कम अशा प्रकल्पाच्या मूळ खर्चातून, विनियमित बेस दराची परिगणना करण्याच्या प्रयोजनासाठी, विनियम २९ मधील तरतुदीनुसार कमी करण्यात येईल.

८५.५ विनियम २६ मधील तरतुदीनुसार भांडवली खर्च अनुज्ञेय राहील.

## ८६ विक्रीचे पूर्व-अनुमान

८६.१ वितरण परवानाधारक, वीज दरातील प्रत्येक वर्गवारीत/उप-वर्गवारीत आणि अशा वीज दरातील वर्गवारी/उप-वर्गवारी अंतर्गत प्रत्येक वीज दराच्या टप्प्यासाठी, विजेच्या विक्रीचे मासिक पूर्व-अनुमान, या विनियमात विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, आयोगास व्यवसाय आराखड्यासह मान्यतेसाठी पाठवेल.

८६.२ वितरण परवानाधारक, व्यवसाय आराखड्यातील मान्यता दिलेल्या विक्रीच्या पूर्व-अनुमानावर आधारित, वीज दराच्या निश्चितीकरणासाठी आयोगाला अर्ज सादर करेल.

८६.३ विक्रीचे पूर्व-अनुमान हे, या विनियमतातील **भाग-डी** अतंर्गत दीर्घ-कालिन वीज प्राप्ती योजनेचा एक भाग म्हणून तयार केलेला विद्युत भाराच्या पूर्व-अनुमानांशी सुसंगत असतील आणि ते मागील माहिती-संग्रहावर आणि भविष्यांविषयी वाजवी गृहितांवर आधारित असतील;

परंतु असे की, आयोगाने जर वीज दरातील एखाद्या विशिष्ट वर्गवारीसाठी विक्रीचे पूर्व-अनुमान तयार करण्याकरता पद्धत विनिर्दिष्ट केली असेल तर, वितरण परवानाधारक अशा वीज दरातील वर्गवारीकरीता विक्रीचे पूर्व-अनुमान तयार करताना या पद्धतीचा समावेश करेल.

## ८७ एकूण महसूली गरजेची परिगणना

८७.१ <u>गुंतविलेल्या भांडवलावरील परतावा</u>

८७.१.१ वितरण परवानाधारकाला, या विनियमतातील विनियम २९ मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, गुंतविलेल्या भांडवलावर परतावा अनुज्ञेय असेल.

८७.२ <u>घसारा.</u>

८७.२.१ या विनियमातील विनियम ३० मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे वितरण व्यवसायात वापरलेल्या स्थिर मत्तांच्या मूल्यावर घसारा वसूल करण्यास वितरण परवानाधारकाला परवानगी देण्यात येईल.

८७.३ <u>वीज निर्मिती /वीज खरेदीचा खर्च</u>

८७. ४ वितरण परवानाधारकाला, निर्मिती व्यवसायाने निर्माण केलेल्या विजेचा खर्च किंवा विनियम ७ प्रमाणे आणि या विनियमातील भाग-डी मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या पद्धतीनुसार, व्यवसाय आराखड्यावरील आदेशाचा एक भाग म्हणून मान्यता दिलेल्या, वितरण परवानाधारकाच्या वीज प्राप्ती योजनेवर आधारित मान्यता प्राप्त स्त्रोतांकडून ग्राहकांना पुरवठा करण्यासाठी केलेल्या वीज खरेदीवरील खर्च, वसूल करण्यास परवानगी देण्यात येईल.

८७.५ <u>पारेषण आकार</u>

८७.५.१ वितरण परवानाधारकाला, या विनियमाच्या भाग-जी अंतर्गत आयोगाने मान्यता दिलेल्या दरांनुसार, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेमध्ये प्रवेशासाठी आणि वापरासाठी पारेषण आकार वसूल करण्यास परवानगी देण्यात येईल.

८७.६ <u>संचालन व देखभाल खर्च</u>

८७.६.१ वितरण परवानाधारकाला किरकोळ वीज पुरवठ्याशी संबंधीत संचालन व देखभाल खर्चांची, नियंत्रण कालावधीतील प्रत्येक वर्षात खालील विनिर्दिष्ट केलेल्या निकषांप्रमाणे, वसुली करण्यास परवानगी देण्यात येईल.

**आर्थिक वर्ष २०११-१२**

| **संचालन व देखभाल खर्च** | **महावितरण** | **आरइन्फ्रा-डी** | **बेस्ट** | **टीपीसी-डी** | **मुळा प्रवरा सोसायटी** |
|---|---|---|---|---|---|
| पुरवठा व्यवसायातील विक्री करीता (पैसे/युनिट) | ८ | ७ | ७ | ९ | ८ |
| पुरवठ्या व्यवसायातील ग्राहकांसाठी* (रुपये लाख/'००० ग्राहक) | ४.६ | ८.० | ८.० | लागू नाही | ४.६ |
| पुरवठा व्यवसायाच्या एकूण स्थिर मत्तांसाठी (सुरुवातीच्या एकूण स्थिर मत्तांच्या % मध्ये) | ०.४५% | ०.४५% | ०.४५% | ०.१५% | ०.४५% |

**आर्थिक वर्ष २०१२-१३**

| संचालन व देखभाल खर्च | महावितरण | आरइन्फ्रा-डी | बेस्ट | टीपीसी-डी | मुळा प्रवरा सोसायटी |
|---|---|---|---|---|---|
| पुरवठा व्यवसायातील विक्री करीता (पैसे/युनिट) | ७ | ६ | ६ | ९ | ७ |
| पुरवठ्या व्यवसायातील ग्राहकांसाठी* (रुपये लाख/'००० ग्राहक) | ४.८८ | ८.४४ | ८.४४ | लागू नाही | ४.८८ |
| पुरवठा व्यवसायाच्या एकूण स्थिर मत्तांसाठी (सुरुवातीच्या एकूण स्थिर मत्तांच्या % मध्ये) | ०.४५% | ०.४५% | ०.४५% | ०.१५% | ०.४५% |

**आर्थिक वर्ष २०१३-१४**

| संचालन व देखभाल खर्च | महावितरण | आरइन्फ्रा-डी | बेस्ट | टीपीसी-डी | मुळा प्रवरा सोसायटी |
|---|---|---|---|---|---|
| पुरवठा व्यवसायातील विक्री करीता (पैसे/युनिट) | ६ | ५ | ५ | १० | ६ |
| पुरवठ्या व्यवसायातील ग्राहकांसाठी* (रुपये लाख/'००० ग्राहक) | ५.२ | ८.९ | ८.९ | लागू नाही | ५.२ |
| पुरवठा व्यवसायाच्या एकूण स्थिर मत्तांसाठी (सुरुवातीच्या एकूण स्थिर मत्तांच्या % मध्ये) | ०.४५% | ०.४५% | ०.४५% | ०.१५% | ०.४५% |

**आर्थिक वर्ष  २०१४-१५**

| संचालन व देखभाल खर्च | महावितरण | आरइन्फ्रा-डी | बेस्ट | टीपीसी-डी | मुळा प्रवरा सोसायटी |
|---|---|---|---|---|---|
| पुरवठा व्यवसायातील विक्री करीता (पैसे/युनिट) | ६ | ५ | ५ | १० | ६ |
| पुरवठ्या व्यवसायातील ग्राहकांसाठी* (रुपये लाख/'००० ग्राहक) | ५.५ | ९.४ | ९.४ | लागू नाही | ५.५ |
| पुरवठा व्यवसायाच्या एकूण स्थिर मत्तांसाठी (सुरुवातीच्या एकूण स्थिर मत्तांच्या % मध्ये) | ०.४५% | ०.४५% | ०.४५% | ०.१५% | ०.४५% |

**आर्थिक वर्ष २०१५-१६**

| संचालन व देखभाल खर्च | महावितरण | आरइन्फ्रा-डी | बेस्ट | टीपीसी-डी | मुळा प्रवरा सोसायटी |
|---|---|---|---|---|---|
| पुरवठा व्यवसायातील विक्री करीता (पैसे/युनिट) | ५ | ५ | ५ | ११ | ५ |
| पुरवठ्या व्यवसायातील ग्राहकांसाठी* (रुपये लाख/'००० ग्राहक) | ५.८ | १०.० | १०.० | लागू नाही | ५.८ |
| पुरवठा व्यवसायाच्या एकूण स्थिर मत्तांसाठी (सुरुवातीच्या एकूण स्थिर मत्तांच्या % मध्ये) | ०.४५% | ०.४५% | ०.४५% | ०.१५% | ०.४५% |

८७.७ खेळते भांडवलावरील व्याज

८७.७.१ वितरण परवानाधारकाला, या विनियमातील विनियम ३१ नुसार अंदाजित खेळते भांडवलावर व्याज अनुज्ञेय राहील.

८७.८ आकस्मिक निधीच्या वर्गणीचे समायोजन

८७.८.१ या विनियमातील विनियम ३२ मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, **महसूली मर्यादा** निश्चित करताना **त्यामध्ये** वितरण परवानाधारकाच्या आकस्मिक राखीव निधीचे समायोजन करण्यात येईल.

## ८८ वीज दरा व्यतिरिक्त उत्पन्न

८८.१ आयोगाने मान्यता दिलेले किरकोळ वीज पुरवठा व्यवसायाशी संबंधीत वीज दरा व्यतिरिक्त उत्पन्न हे एकूण महसूली गरजेतून, वितरण परवानाधारकाच्या किरकोळ वीज पुरवठा व्यवसायासाठी वीज दराची परिगणना करताना, वजा करण्यात येईल.

परंतु असे की, वितरण परवानाधारक वीज दर निश्चितीकरण्यासाठी अर्ज सादर करताना त्यासोबत वीज दरा व्यतिरिक्त उत्पन्नाच्या पूर्व-अनुमानांचा पूर्ण तपशील सादर करेल.

## ८९ अन्य व्यवसायापासून उत्पन्न

८९.१ वितरण परवानाधारक जर अन्य कोणताही व्यवसाय करीत असेल तर, अशा अन्य व्यवसायापासून मिळालेल्या महसूलातून अशा अन्य व्यवसायाशी संबंधित असलेले सर्व प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष खर्च वजा करुन उरलेल्या रकमेच्या एक-तृतियांश इतकी रक्कम, वितरण परवानाधारकाच्या किरकोळ वीज पुरवठ्यासाठी वीज दर निश्चित करताना एकूण महसूली गरजेतून कमी करण्यात येईल;

परंतु असे की, वितरण परवानाधारक संयुक्त व सामायिक खर्चांचे वाटप वितरण व्यवसाय आणि अन्य व्यावसायात वाजवी आधारास अनुसरुन करेल आणि याबाबतचे वाटप विवरणपत्र, वीज दर निश्चितीकरणासाठीच्या अर्जासोबत आयोगास सादर करेल;

परंतु आणखी असे की, जेव्हा अशा अन्य व्यवसायाच्या प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष खर्चांची एकूण बेरीज ही अशा अन्य व्यवसायापासून मिळणाऱ्या महसूलापेक्षा जास्त असेल तर, अशा अन्य व्यवसायाच्या कारणास्तव वितरण परवानाधारकाच्या एकूण महसूली गरजेत कोणतीही रक्कम वाढविण्यास परवानगी देण्यात येणार नाही.

परंतु असेही की, या विनियमात काहीही असले तरी ते, अधिनियमाची सुरुवात होण्यापूर्वी वीज वितरणाच्या व्यवसायात गुंतलेल्या स्थानिक प्राधिकरणास लागू राहणार नाही.

## ९० क्रॉस सबसिडी अधिभारामुळे जमा होणा-या रकमा

वेळोवेळी सुधारणा केलेल्या महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण मुक्त प्रवेश) विनियम, २००५ नुसार आयोगाने मान्यता दिलेल्या क्रॉस सबसिडी अधिभार म्हणून वितरण परवानाधारकाला मिळालेल्या रकमा, अशा वितरण परवानाधारकाच्या किरकोळ वीज पुरवठ्यासाठी वीज दराची परिगणना करताना, एकूण महसूली गरजेतून वजा करण्यात येतील.

## ९१ वितरण हानि

९१.१ वितरण परवानाधारकाला, किरकोळ वीज पुरवठ्यापासून उद्‌भवणाऱ्या मान्यता दिलेल्या वितरण हानीची, वहन हानी वगळून, वसूली करण्यास परवानगी देण्यात येईल;

परंतु असे की, आयोग, वितरण परवानाधारकाने दाखल केलेल्या व्यवसाय आराखड्यावरील आदेशाचा एक भाग म्हणून, या विनियमांनुसार किरकोळ वीज पुरवठ्यातील वितरण हानीसाठी एक मार्गदर्शिका विनिर्दिष्ट करेल;

परंतु असे की, वितरण हानीची प्रत्यक्ष पातळी आणि मान्यता देण्यात आलेली पातळी यामधील कोणतीही तफावत, कामगिरीच्या मध्यावधी आढाव्याचा एक भाग म्हणून, आणि नियंत्रण कालावधीच्या अखेरीस अंतिम अचूक समायोजनेच्या वेळी, हाताळण्यात येईल.

## ९२ वीज पुरवठ्याची उपलब्धता

९२.१ वीज पुरवठ्याच्या उपलब्धतेमध्ये खालील मापदंड खाली नमुद केलेल्या प्रमाणात समाविष्ट असतील.

(ए) बेस लोड वीज पुरवठ्याची उपलब्धता ७५ टक्के

(बी) सर्वोच्च भाराच्या वेळची वीज पुरवठ्याची उपलब्धता २५ टक्के

९२.२ किरकोळ वीज पुरवठ्यासाठी गुंतविलेल्या भांडवलावरील परताव्याच्या पूर्ण वसुलीसाठी वीज पुरवठा उपलब्धता लक्ष्य ९५ टक्के राहील;

परंतु असे की आयोग, वितरण परवानाधारकांनी दाखल केलेल्या व्यवसाय आराखड्यावरील आदेशाचा एक भाग म्हणून, वितरण परवानाधारकाने किरकोळ वीज पुरवठ्याकरीता साध्य करावायाच्या वीज पुरवठा उपलब्धता लक्ष्याकरीता, एक मार्गदर्शिका विनिर्दिष्ट करेल;

परंतु असे की, वीज पुरवठा उपलब्धता लक्ष्यापेक्षा प्रत्येक एक (१) टक्का कमी साध्यतेसाठी, गुंतविलेल्या भांडवलावरील परताव्याचा दर ०.१ टक्क्याने कमी करण्यात येईल;

परंतु असे की, वीज पुरवठा उपलब्धता लक्ष्यापेक्षा प्रत्येक एक (१) टक्का जादा साध्यतेसाठी, गुंतविलेल्या भांडवलावरील परताव्याचा दर ०.१ टक्क्याने वाढविण्यात येईल.

९२.३ बेस लोड वीज पुरवठा उपलब्धतेची परिगणना खालील सुत्रा नुसार करण्यात येईल :-

$$= \frac{(\text{प्रत्यक्ष करांतर्गत बेस लोड वीज पुरवठा मेगावॅट मध्ये}) \times (\text{सर्वोच्च मागणी नसलेल्या तासांची संख्या})}{(\text{बेस लोड मेगावॅट मध्ये}) \times (\text{सर्वोच्च मागणी नसलेल्या तासांची संख्या})}$$

९२.४ पीक लोड वीज पुरवठा उपलब्धतेची परिगणना खालील सूत्रानुसार करण्यात येईल :-

$$= \frac{(\text{प्रत्यक्ष करांतर्गत पीक लोड वीज पुरवठा मेगावॅट मध्ये}) \times (\text{सर्वोच्च मागणी असलेल्या तासांची संख्या})}{(\text{पीक लोड मेगावॅट मध्ये}) \times (\text{सर्वोच्च मागणी असलेल्या तासांची संख्या})}$$

## भाग-जे : राज्य शासनाने सबसिडी देणे बाबत

## ९३ राज्य शासनाने सबसिडीसाठी तरतूद करण्याची पद्धत

९३.१ एप्रिल २०११ च्या पहिल्या दिवसापासून, राज्य शासनास कोणत्याही ग्राहकांस किंवा ग्राहकांच्या वर्गास आयोगाने निश्चित केलेल्या वीज दरात कोणतीही सबसिडी द्यावयाची असेल तर राज्य शासन, आयोगाच्या पूर्व संमतीने, सबसिडीच्या मंजुरीने बाधित होणाऱ्या वितरण परवानाधारकास/व्यक्तीस भरपाईची रक्कम या विनियमात विहित केलेल्या पद्धतीनुसार, आगाऊ अदा करेल.

९३.२ राज्य शासनाने सबसिडी द्यावयाची ठरविलेली रक्कम राज्य शासनाकडून मदतीच्या स्वरुपात देण्यात येईल.

९३.३ राज्य शासनाने वितरण परवानाधारकाची एकूण गरज असलेली रक्कम ज्या प्रमाणात अदा केलेली असेल त्या प्रमाणात सबसिडीची रक्कम पात्र ग्राहकांच्या वीज देयकात जमा करण्यात येईल.

परंतु असे की, चुकीच्या अंदाजामुळे किंवा अन्य कोणत्याही कारणामुळे सबसिडी प्रत्यक्ष देण्यात जर काही तूट आली तर ही तूट ग्राहकांच्या देयकात स्पष्टपणे दाखविण्यात येईल आणि ती, जो पर्यंत कमी होत नाही तो पर्यंत किंवा संपेपर्यंत, संबंधित पात्र ग्राहकांमध्ये यथा प्रमाणात विभागण्यात येईल.

९३.४ वितरण परवानाधारक ग्राहकांच्या देयकात (अ) आयोगाने निश्चित केलेला वीज दर; (ब) राज्य शासनाच्या सबसिडीची रक्कम, दर व कालावधी; (क) निव्वळ देय रक्कम, या बाबी स्पष्टपणे दाखवेल.

## भाग-के : संकीर्ण

## ९४ दुरुस्ती करण्याचे अधिकार

९४.१ आयोग कोणत्याही वेळी, या विनियमातील कोणत्याही तरतूदीमध्ये बदल, फेरफार, फेरबदल किंवा सुधारणा करु शकेल.

## ९५ अडचणी दूर करण्याचे अधिकार

या विनियमातील तरतूदींची अंमलबजावणी करताना जर कोणतीही अडचण आली तर, आयोग साधारण किंवा विशिष्ट आदेशाने, अडचण दूर करण्यासाठी त्यास आवश्यक वाटेल अशा, अधिनियमातील तरतूदींशी विसंगत नसणाऱ्या, तरतूदी करु शकेल.

## ९६ अपवाद आणि रद्द करणे

९६.१ या विनियमात अन्यथा जे नमूद केले असेल त्याखेरीज, ''महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज दराच्या अटी व शर्ती) विनियम २००५,'' याद्वारे रद्द करण्यात आले आहेत.

९६.२ वरीलप्रमाणे विनियम रद्द केले असले तरी, आयोगापुढे फेर-आढावा याचिकांसह आर्थिक वर्ष २०१०-११ पर्यंतच्या कालावधीशी संबधित असणाऱ्या कोणत्याही कामकाजाचे नियमन महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज दराच्या अटी व शर्ती ) विनियम, २००५ द्वारे करण्यात येईल.

**जोडपत्र - १**

## घसा-याची अनुसूची

| मत्तेचा तपशील | | घसारा (थेट पद्धतीने) % |
|---|---|---|
| | | |
| ए | पूर्ण मालकीची जागा | - |
| बी | भाडेपट्ट्यावर (लीजवर) घेतलेली जागा | - |
| ए) | जागेतील गुंतवणूकीसाठी | ३.३४ |
| बी) | जागा साफ करण्यासाठीचा खर्च | ३.३४ |
| सी) | जल-विद्युत निर्मिती केंद्राच्या बाबतीत रिझर्वायरसाठी जागा | ३.३४ |
| | | |
| सी. | नवीन खरेदी केलेल्या मत्ता : | |
| ए. | विद्युत निर्मिती केंद्रातील प्लँटच्या पायासह प्लँट व मशिनरी | |
| | एक) जल-विद्युत | ५.२८ |
| | दोन) बाष्प-विद्युत | ५.२८ |
| | एन एच आर एस आणि वाया जाणारी उष्णता परत मिळविणारे बॉयलर्स/प्लँट्स | |
| | तीन) डिसेल-विद्युत आणि गॅस प्लँट्स | ५.२८ |
| बी. | कुलिंग टॉवर्स आणि सर्कुलेटिंग पाण्याची यंत्रणा | ५.२८ |
| सी. | जल-विद्युत यंत्रणेचा भाग असलेली खालील | |

| | | |
|---|---|---|
| | कामांसह जलसंबंधित कामे :- | |
| | एक) धरणे, कालवे, spillways,weirs, reinforced concrete flumes and siphons | ५.२८ |
| | दोन) re-inforced concrete pipelines and surge tanks, steel pipelines, sluice gates, steel surge (tanks) hydraulic control valves and other hydraulic works | ५.२८ |
| डी. | कायम स्वरुपाची स्थापत्य व बांधकाम अभियांत्रिकी कामे | |
| | एक) कार्यालये आणि शो-रुम्स | ३.३४ |
| | दोन) औष्णिक-विद्युत निर्मिती प्लँट्स **करिता** | ३.३४ |
| | तीन) जल-विद्युत निर्मिती प्लँट्स **करिता** | ३.३४ |
| | चार) लाकडी **बांधकामांसारखी** तात्पुरती कामे | १०० |
| | पाच) कच्चे रस्ते सोडून इतर रस्ते | ३.३४ |
| | सहा) इतर | ३.३४ |
| इ. | ट्रान्सफॉर्मर्स, ट्रान्सफॉर्मर्स (किसॉक्स) उप-केंद्रांतील साहित्य व इतर स्थिर साधने (प्लँट्च्या पायासह) | |
| | एक) १०० किलो व्होल्ट अँपिअर्स आणि त्या वरील क्षमतेचे ट्रान्सफॉर्मर्स (पायासह) | ५.२८ |
| | दोन) इतर | ५.२८ |
| फ. | केबल जोडण्यांसह स्विच-गिअर्स | ५.२८ |
| जी. | वीज निरोधक | |

| | | |
|---|---|---|
| | एक) स्टेशन टाइप | ५.२८ |
| | दोन) पोल टाइप | ५.२८ |
| | तीन) Synchronous Condensor | ५.२८ |
| एच. | बॅटरीज | ५.२८ |
| | एक) Underground cables including joint boxes and disconnected boxes | ५.२८ |
| | दोन) Cable duct system | ५.२८ |
| आय. | Overhead lines including supports | - |
| | एक) Lines on fabricated steel operatinge at nominal voltages hingher than 66 KV | ५.२८ |
| | दोन) Lines on steel support operating at nominal voltages hinger than 13.2 kilovolts but not exceeding 66 kilovolts | ५.२८ |
| | तीन) Lines on steel or re-inforced concrete supports | ५.२८ |
| | चार) Lines on treated wood supports | ५.२८ |
| जे. | मीटर्स | ५.२८ |
| के. | स्वयं-चलित वाहने | ९.५० |
| एल. | वातानुकुलिन प्लँट्स | |

| | | |
|---|---|---|
| | एक) स्थिर | ५.२८ |
| | दोन) हातवाही (पोर्टेबल) | ९.५० |
| एम. | | |
| | एक) कार्यालयीन फर्निचर आणि फिटिंग्स | ६.३३ |
| | दोन) कार्यालयीन साधन-सामग्री | ६.३३ |
| | तीन) फिटिंग्स आणि साधनांसह अंतर्गत वायरिंग | ६.३३ |
| | चार) रस्त्यांवरील दिव्यांची फिटिंग्स | ५.२८ |
| एन. | भाड्यावर दिलेली साधने | |
| | एक) मोटर्स सोडून इतर | ९.५० |
| | दोन) मोटर्स | ६.३३ |
| ओ. | संपर्क-साधने | |
| | एक) रेडिओ आणि उच्च वारंवारता वाहक यंत्रणा | ६.३३ |
| | दोन) दूरध्वनी वाहिन्या व दूरध्वनी | ६.३३ |
| पी. | माहिती तंत्रज्ञान साधने | १५ |
| क्यू. | खरेदी केलेल्या वापरलेल्या मत्ता, आणि अनुसूचित अन्यथा तरतूद नसलेल्या मत्ता | ५.२८ |

## जोडपत्र -२

## पारेषण यंत्रणेच्या उपलब्धतेची परिगणना करण्याची कार्यपध्दती

१. प्रत्येक पारेषण यंत्रणेकरिता पारेषण यंत्रणेच्या उपलब्धतेची परिगणना स्वतंत्रपणे करण्यांत येईल. पारेषण यंत्रणांच्या उपलब्धतेची परिगणना करण्यासाठी पारेषण भागांची खालीलप्रमाणे वर्गवारी करण्यांत येईल.

एक) एसी पारेषण वाहिन्याः एसी पारेषण वाहिन्याचे प्रत्येक सर्किट हे एक भाग समजण्यांत येईल.

दोन) इंटर-कनेक्टींग ट्रान्सफॉर्मर्स (आयसिटीज): प्रत्येक आयसिटी बँक हा (तीन सिंगल फेज ट्रान्सफॉर्मर्स एकत्र) एक भाग असेल.

तीन) स्टॅटिक व्हीएआर कॉम्पेन्सेटर (एसव्हीसी):एसव्हीसी ट्रान्सफॉर्मर्ससह एसव्हीसी हा एक भाग असेल. तथापि, त्यापैकी क्रेडिट इंडक्टिव्ह ५० टक्के आणि ५० टक्के कॅपॅसिटिव्ह याप्रमाणे रेटिंग्स असेल.

चार) स्विच्ड बस रिॲक्टर : प्रत्येक स्विच्ड बस रिॲक्टर हा एक भाग मानण्यांत येईल.

पाच) एचव्हीडीसी बाय-पोल लिंक्स : एचव्हीडीसीच्या दोन्ही बाजूला संलग्न साहित्य असलेला प्रत्येक खांब हा एक भाग मानण्यांत येईल.

सहा) एचव्हीडीसी बॅक-टु-बॅक स्टेशनः एचव्हीडीसी बॅक-टु-बॅक स्टेशनचा प्रत्येक ब्लॉक हा एक भाग मानण्यांत येईल. जर संलग्न एसी वाहिनी (एचव्हीडीसी बॅक-टु-बॅक स्टेशनमधून आंतर-प्रांतिय विजेच्या हस्तांतरणासाठी आवश्यक असलेली) उपलब्ध नसेल तर एचव्हीडीसी बॅक-टु-बॅक स्टेशन ब्लॉक सुध्दा उपलब्ध नाही, असे मानण्यांत येईल.

२. पारेषण यंत्रणेच्या एसी आणि एचव्हीडीसी भागांच्या उपलब्धतेची परिगणना खालीलप्रमाणे करण्यांत येईल :-

एसी यंत्रणेसाठी % यंत्रणा उपलब्धता

$$= \frac{o \times AV_o + p \times AV_p + q \times AV_q + r \times AV_r}{o + p + q + r} \times 100$$

एचव्हीडीसी यंत्रणेसाठी % यंत्रणा उपलब्धता

$$= \frac{s \times AV_s + t \times AV_t}{s + t} \times 100$$

जेथे

- $o$ म्हणजे एकूण एसी वाहिन्यांची संख्या
- $AV_o$ म्हणजे $o$ इतक्या संख्येतील एसी वाहिन्यांची उपलब्धता
- $p$ म्हणजे एकूण स्विच्ड बस रिॲक्टर्सची संख्या .
- $AV_p$ म्हणजे $p$ इतक्या संख्येतील स्विच्ड बस रिॲक्टर्सची उप्लब्धता
- $q$ म्हणजे एकूण आयसिटीजची संख्या
- $AV_q$ म्हणजे $q$ इतक्या संख्येतील आयसिटीजची उपलब्धता
- $r$ म्हणजे एकूण एसव्हीसीची संख्या
- $AV_r$ म्हणजे $r$ इतक्या संख्येतील एसव्हीसीची उपलब्धता
- $s$ म्हणजे एकूण एचव्हीडीसी खांबांची संख्या
- $AV_s$ म्हणजे $s$ इतक्या संख्येतील एचव्हीडीसी खांबांची उपलब्धता
- $t$ म्हणजे एकूण एचव्हीडीसी बॅक-टु-बॅक स्टेशन्स ब्लॉक्सची संख्या
- $AV_t$ म्हणजे $t$ इतक्या संख्येतील एचव्हीडीसी बॅक-टु-बॅक स्टेशन ब्लॉक्सची उपलब्धता

३. पारेषण भागांच्या प्रत्येक वर्गवारीसाठी व्हेटेज फॅक्टर खालीलप्रमाणे राहीलः-

एक) एसी वाहिनीच्या प्रत्येक सर्किटसाठी - सर्ज इम्पिडन्स लोडींग फॉर अनकॉम्पेन्सेटेड लाइन (एसआयएल)मल्टीप्लाइड बाय सर्किट किलो मी.

दोन) या परिशिष्टाच्या जोडपत्र-२ मध्ये विविध व्होल्टेज लेव्हल्स आणि कंडक्टर कॉन्फिगुरेशन्सकरिता एसआयएल रेटिंग देण्यांत आले आहे. तथापि, जी व्होल्टेज लेव्हल्स आणि/ किंवा कंडक्टर कॉन्फिगुरेशन्स या जोडपत्र-२ मध्ये देण्यांत आलेली नाहीत अशा प्रकरणी पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्यांना कल्पना देऊन, तांत्रिक बाबींचा विचार करुन उपलब्धतेची परिगणना करण्यासाठी उचित एसआयएलचा उपयोग करावा.

तीन) प्रत्येक एचव्हीडीसी खांबाकरिता- द रेटेड MW कपॅसिटी X सर्किट किलो मी.

चार) प्रत्येक आयसीटी बँककरिता - द रेटेड MVA कपॅसिटी

पाच) एसव्हीसीकरिता - द रेटेड एमव्हीएआर कपॅसिटी (इंडक्टिव्ह आणि कॅपॅसिटीव्ह)

सहा) स्विच्ड बस रिॲक्टरकरिता- द रेटेड एमव्हीएआर कपॅसिटी

दोन पारेषण यंत्रणा जोडणाऱ्या एचव्हीडीसी बॅक-टु-बॅक स्टेशन्सकरिता - प्रत्येक ब्लॉकची रेटेड MW कपॅसिटी

४. पारेषण भागांच्या प्रत्येक वर्गवारीच्या उपलब्धतेची परिगणना, व्हेटेज फॅक्टर, विचारांत घेतलेले एकूण तास आणि त्या वर्गवारीतील प्रत्येक भाग उपलब्ध नसलेले तास, यांच्या आधारे करण्यांत येईल. पारेषण भागांच्या प्रत्येक वर्गवारीच्या उपलब्धतेची परिगणना करण्यासाठीची सूत्रे या जोडपत्र -२ च्या परिशिष्ट -१ प्रमाणे आहेत.

५. पारेषण परवानाधारकाशी संबंध जोडता येणार नाही अशा खालील कारणांमुळे बंद असलेले पारेषण भाग हे उपलब्ध आहेत असे मानण्यांत येईलः-

एक) देखभाल करण्यासाठी किंवा त्यांची पारेषण यंत्रणा उभारण्यासाठी इतर अभिकरणाने/अभिकरणांकडे असलेले पारेषण भाग बंद ठेवणे.

दोन) भार जास्त वाढल्यामुळे वाहिनी स्वतः खंडीत करणे किंवा राज्य भार प्रेषण केंद्राच्या निदेशांप्रमाणे स्विच्ड बस रिॲक्टर स्वतः खंडीत करणे.

६. विचाराधीन कालावधीकरिता भागाच्या असलेल्या एकूण वेळेतून, पारेषण भाग बंद असण्याचा काल खालील परिस्थितीत, वगळण्यांत येईल-

एक) दैवी प्रकोप किंवा दैवी आपत्तीच्या घटनांमुळे पारेषण परवानाधारकाच्या नियंत्रणा बाहेर असलेला भाग बंद असल्याचा कालावधी. तथापि, भागांचा हा बंद असण्याचा कालावधी हा डिझाईनच्या अपयशामुळे नसून तो वरील घटनांमुळे होता, याबाबत आयोगाची किंवा आयोग विहीत करेल अशा इतर कोणत्याही मंचाची/अभिकरणाची खात्री पटविण्याची जबाबदारी ही पारेषण परवानाधारकाची राहील. भाग पुन्हा पूर्ववत सुरु करण्यासाठी आयोगाकडून किंवा आयोग विहीत करेल अशा मंच/अभिकरणाकडून वाजवी कालावधी देण्यांत येईल आणि पारेषण परवानाधारकाने भाग पुर्ववत सुरु करण्यासाठी वाजवी कालावधीपेक्षा घेतलेला कोणताही जादा कालावधी हा पारेषण परवानाधारकाशी संबंध जोडता येईल असा बंद असण्याचा कालावधी म्हणून मानण्यांत येईल. आयोग अथवा आयोग विहीत करेल असा मंच/अभिकरण भाग पुर्ववत सुरु करण्यासठी लागणाऱ्या वेळेचा अंदाज घेण्यासाठी पारेषण परवानाधारकाशी किंवा तज्ज्ञाशी विचार-विनिमय करेल. ईआरएस (इमर्जन्सी रिस्टोरेशन सिस्टीम) द्वारा पुर्ववत केलेले सर्किट्स हे उपलब्ध म्हणून विचारांत घेतले जातील.

दोन) पारेषण परवानाधारकाशी संबंध जोडता येणार नाही अशा ग्रीडमधील घटनेमुळे/अडथळ्यांमुळे उद्‌भवलेला बंदचा कालावधी, उदा. अन्य अभिकरणाच्या मालकीच्या असलेल्या उप-केंद्रांतील किंवा बे मधील दोष, ग्रीडमधील अडथळ्यांमुळे पारेषण परवानाधारकाचे भाग बंद होणे, वाहिन्या, आयसीटीज, एचव्हीडीसी बॅक-टु-बॅक स्टेशन्स इ. खंडीत होणे. तथापि, ग्रीडमधील अडथळ्यांनंतर यंत्रणा वाजवी वेळेत नेहमीच्या स्थितीत आणत असताना जर, एसएलडीसीकडून सूचना प्राप्त झाल्यानंतर भाग पूर्वस्थितीत आले नाही तर, तो भाग बंद असण्याचा संपूर्ण कालावधीत उपलब्ध नाही असे मानण्यांत येईल व बंद असण्याचा कालावधी हा पारेषण परवानाधरकाशी जोडण्यायोग्य राहील.

७. कोणताही भाग बंद असल्यामुळे जर राज्यांतील वीज निर्मिती केंद्रातील वीज निर्मितीची हानी झाली तर, ज्या दिवशी किंवा ज्या दिवसांत वीज निर्मितीची हानी झाली असेल त्या दिवशी भाग प्रत्यक्ष बंद असण्याचा जो कालावधी असेल त्याच्या दुप्पट कालावधीकरीता तो बंद असल्याचे, मानण्यांत येईल.

## परिशिष्ट-१

# पारेषण भागांच्या प्रत्येक वर्गवारीच्या उपलब्धतेची परिगणना करण्यासाठीची सूत्रे

$$AV_o\text{(Availability of } o \text{ no. of AC lines)} = \sum_{i=1}^{o} \frac{Wi(Ti - T_{NA}i)}{Ti} \Big/ \sum_{i=1}^{o} Wi$$

$$AV_p\text{(Availability of } p \text{ no. of HVDC pole)} = \sum_{j=1}^{p} \frac{Wj(Tj - T_{NA}j)}{Tj} \Big/ \sum_{j=1}^{p} Wj$$

$$AV_q\text{(Availability of } q \text{ no. of ICTs)} = \sum_{K=1}^{q} \frac{Wk(Tk - T_{NA}k)}{Tk} \Big/ \sum_{k=1}^{q} Wk$$

$$AV_r\text{(Availability of r no. of SVCs)} = \left[ \sum_{l=1}^{r} 0.5 W_I l \frac{(T_I l - T_{NAI} l)}{T_I l} + \sum_{l=1}^{r} 0.5\, W_C l \frac{(T_C l - T_{NAC} l)}{T_C l} \right] \Big/ \left[ \sum_{l=1}^{r} 0.5\, W_I l + \sum_{l=1}^{r} 0.5\, W_C l \right]$$

$$AV_s\text{(Availability of } s \text{ no. of Switched Bus reactors)} = \sum_{m=1}^{s} \frac{Wm(Tm - T_{NA}m)}{Tm} \Big/ \sum_{m=1}^{s} Wm$$

$$AV_t\text{(Availability of } t \text{ no. of HVDC Back-to-back Blocks)} = \sum_{n=1}^{t} \frac{Wn(Tn - T_{NA}n)}{Tn} \Big/ \sum_{n=1}^{t} Wn$$

Where

| | | |
|---|---|---|
| W$i$ | = | Weightage factor for $i^{th}$ transmission line |
| W$j$ | = | Weightage factor for $j^{th}$ HVDC pole |
| W$k$ | = | Weightage factor for $k^{th}$ ICT |
| $W_I l$ & $W_C l$ | = | Weightage factors for inductive & capacitive operation of $l^{th}$ SVC |
| W$m$ | = | Weightage factor for $m^{th}$ bus reactor |
| W$n$ | = | Weightage factor for $n^{th}$ HVDC back to back block. |

| | |
|---|---|
| T$i$, T$j$, T$k$, $T_I l$, $T_C l$, T$m$ & T$n$ | The total hours of $i^{th}$ AC line, $j^{th}$ HVDC pole, $k^{th}$ ICT, $l^{th}$ SVC (Inductive Operation), $l^{th}$ SVC (Capacitive Operation), $m^{th}$ Switched Bus Reactor & $n^{th}$ HVDC back-to-back block during the period under consideration (excluding time period for outages not attributable to transmission licensee for reasons given in Para 6 of the procedure) |
| $T_{NA}i$ , $T_{NA}j$ , $T_{NA}k$, $T_{NAI}l$, $T_{NAC}l$, $T_{NA}m$, | The non-availability hours (excluding the time period for outages not attributable to transmission licensee taken as deemed availability as per Para 5 of the procedure) for $i^{th}$ AC line, $j^{th}$ HVDC pole, $k^{th}$ ICT , $l^{th}$ SVC (Inductive Operation), $l^{th}$ SVC (Capacitive Operation), $m^{th}$ Switched Bus Reactor & $n^{th}$ HVDC back-to-back block. |

परिशिष्ट-२

## एसी वाहिन्यांचे सर्ज इम्पिडन्स लोडींग (एसआयएल)

| अनुक्रमांक | वाहिनीचा भार (kv) | कंडक्टर कॉन्फिगुरेशन्स | (एसआयएल) (MW) |
|---|---|---|---|
| १ | ७६५ | क्वॅड बर्सिमिस | २२५० |
| २ | ४०० | क्वॅड बर्सिमिस | ६९१ |
| ३ | ४०० | ट्विन मूस | ५१५ |
| ४ | ४०० | ट्विन एएएसी | ४२५ |
| ५ | ४०० | क्वॅड झेब्रा | ६४७ |
| ६ | ४०० | क्वॅड एएएसी | ६४६ |
| ७ | ४०० | ट्रिपल स्नो बर्ड | ६०५ |
| ८ | ४०० | एसीकेसी (५००/२६) | ५५६ |
| ९ | ४०० | ट्विन एसीएआर | ५५७ |
| १० | २२० | ट्विन झेब्रा | १७५ |
| ११ | २२० | सिंगल झेब्रा | १३२ |
| १२ | १३२ | सिंगल पँथर | ५० |
| १३ | ६६ | सिंगल डॉग | १० |

(के.एन.खवारे)
सचिव
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

मुंबई
दिनांक ऑगस्ट २०१०